# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र

### बी. ए. भाग ३ : मराठी

### सत्र ५ व ६ Major Mandatory

# साहित्यशास्त्र

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार सुधारित अभ्यासक्रम
शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२६
बी.ए. भाग ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** २००

■

**प्रकाशक :**

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर : ४१६ ००४

■

ISBN- 978-93-47370-39-7

★ दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (महाराष्ट्र)

# दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ज्योती जाधव**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) प्रकाश पवार**
राज्यशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. विद्याशंकर**
कुलगुरू, केएसओयू,
मुक्तगंगोत्री, म्हैसूर, कर्नाटक-५७० ००६

**डॉ. राजेंद्र कांकरिया**
जी-२/१२१, इंदिरा पार्क,
चिंचवडगांव, पुणे-४११ ०३३

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**डॉ. संजय रत्नपारखी**
डी-१६, शिक्षक वसाहत, विद्यानगरी, मुंबई विद्यापीठ,
सांताक्रुझ (पु.) मुंबई-४०० ०९८

**प्रा. (डॉ.) कविता ओझा**
संगणकशास्त्र अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) चेतन आवटी**
तंत्रज्ञान अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) व्ही. व्ही. मैंदरगी**
प्र. अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एस. देशमुख**
प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) आर. व्ही. गुरव**
प्र. अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. बी. साळी**
प्र. अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. ए. एन. जाधव**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्रीमती सुहासिनी सरदार पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटणकर** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ अभ्यासमंडळ : मराठी ■

अध्यक्ष : **डॉ. रणधीर शिंदे**
मराठी अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ **डॉ. नंदकुमार विष्णू मोरे**
मराठी विभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

■ **डॉ. शीतल सचिन गोर्डे-पाटील**
विलिंग्डन कॉलेज, सांगली

■ **डॉ. अरुण कृष्णा शिंदे**
नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स ॲण्ड कॉमर्स, कोल्हापूर

■ **डॉ. गोमटेश्वर पाटील**
महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

■ **डॉ. संदीप मारुती दळवी**
श्रीमती मथुबाई गरवारे कन्या महाविद्यालय, सांगली

■ **डॉ. सागर अशोक पाटील**
कन्या महाविद्यालय, मिरज, जि. सांगली

■ **डॉ. श्यामसुंदर मिरजकर**
कला व वाणिज्य महाविद्यालय, मायणी

■ **डॉ. प्रकाश महादेव दुकळे**
देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस ॲण्ड
सायन्स कॉलेज, चिखली, ता. शिराळा, जि. सांगली.

■ **डॉ. सर्जेराव सदाशिव जाधव**
यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर,
जि. कोल्हापूर

■ **डॉ. गोविंद गंगाराम काजरेकर**
गोगटे-वाळके महाविद्यालय, बांदा, ता. सावंतवाडी,
जि. सिंधुदुर्ग

■ **डॉ. रमेश साळुंखे**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर, जि. कोल्हापूर

■ **डॉ. अशोक सदाशिव तवर**
लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स
ॲण्ड कॉमर्स, सातारा.

■ **डॉ. तातोबा कल्लाप्पा बदामे**
पद्मभूषण डॉ. वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,
तासगांव, जि. सांगली.

## संपादकीय

विद्यार्थी मित्रहो,

'साहित्यशास्त्र' या अभ्यासपत्रिकेची स्वयंअध्ययन पुस्तिका आपल्या हाती देताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. साहित्य हा आपल्या समाज जीवनाचा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. हे ध्यानात घेऊन प्राचीन काळापासून साहित्याच्या संदर्भातील विचार सखोलपणाने आपल्या साहित्य संस्कृतीत करण्यात आला आहे. भरत, भामह, दंडी, आनंदवर्धन, अभिनवगुप्त इत्यादी पौवात्य आणि प्लेटो, ॲरिस्टॉटल, वर्डस्वर्थ, मॅथ्यू अर्नोल्ड, क्रोचे अशा पाश्चात्य विचारवंतांनीही साहित्याच्या निर्मितीप्रक्रियेविषयी नेमके भाष्य केले आहे.

कथा, कविता, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र असे साहित्यप्रकार आपणास ज्ञात आहेत. ते आपण अभ्यासलेही आहेत. तथापि साहित्याची निर्मिती कशी होते, साहित्याचे स्वरूप कशाप्रकारचे असते, साहित्यनिर्मितीचा हेतू कोणता असतो, शब्दांचे साहित्यातील स्थान कशाप्रकारचे असते, साहित्याच्या वाचनातून लेखकाला, वाचकाला आणि समीक्षकांनाही निश्चितच आनंद होत असतो, अशा प्रकारच्या काव्यानंदाचे स्वरूप कशाप्रकारचे असते; अशा घटकांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक असते. त्याशिवाय भाषेचा अभ्यास परिपूर्ण होऊ शकत नाही. हा हेतू ध्यानात घेऊन 'साहित्यशास्त्र' ही पुस्तिका आपणास अभ्यासावयाची आहे.

ही अभ्यासपुस्तिका अभ्यासताना आपणास साहित्याच्या स्वरूपाचा, लक्षणांचा परिचय होईल. पौर्वात्य आणि पाश्चात्त्य साहित्य मीमांसकांनी साहित्याच्या व्याख्या केल्या आहेत; तेही समजून घेता येईल. यासोबतच साहित्यनिर्मितीच्या कारणांचा म्हणजेच प्रयोजनांचाही विचार करता येईल. कोणत्याही भाषेतील साहित्यनिर्मिती ही शब्दांच्या आधाराने होत असते. त्यामुळे शब्दशक्तीचे स्वरूपही तपशीलाने या अभ्यासपत्रिकेत आपणास अभ्यासता येईल. साहित्याचा व्यवहार हा प्रबोधनाबरोबरच आनंदासाठीही असतो. साहित्यनिर्मिती म्हणजे भावनांची अभिव्यक्ती असते. त्यामुळे साहित्यनिर्मितीचे आणि आस्वादाचे स्वरूप नेमके कशाप्रकारचे असते, हेही आपणास समजून येईल. साहित्याच्या स्वरूपाचा आणि त्यामागील कारणांचा अभ्यास विद्यार्थ्यांना अभ्यासासोबतच सृजनशीलतेलाही प्रेरणा देणारा ठरू शकतो.

या पुस्तकातील सर्वच लेखन अत्यंत अभ्यासपूर्ण झाले असून या अभ्यास घटकांसोबतच विद्यार्थ्यांनी इतरही संदर्भग्रंथांचे अवश्य वाचन करावे आणि ही अभ्यासपत्रिका सखोलपणे समजून घ्यावी. या पुस्तकाच्या निर्मितीत सहकार्य करणारे शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, प्रा.(डॉ.)रणधीर शिंदे, अभ्यास मंडळातील सर्व सदस्य तसेच विविध घटकांचे लेखन करणारे लेखक यांचे आभार.

**■ संपादक ■**

**प्रा. डॉ. रमेश सांळुखे**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर व्हाया निपाणी
ता. कागल जि. कोल्हापूर

**डॉ. प्रवीण लोंढे**
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

सत्र ५ व ६ : साहित्यशास्त्र
बी.ए.भाग ३ : मराठी

| लेखकाचे नाव | घटक क्रमांक | |
|---|---|---|
| | सत्र ५ | सत्र ६ |
| **(डॉ.) सीमा मुसळे**<br>प्लॅट पीएल ५ बी १३/रुम नं ११ तीर्थराज सेक्टर नं ९ खंडा कॉलनी, न्यू पनवेल ४१० २०६ | **१ व २** | – |
| **डॉ. नम्रता हत्तलगे**<br>विलिंग्ड कॉलेज, सांगली<br>जि. सांगली | – | **१ व २** |

■ **संपादक** ■


**प्रा. डॉ. रमेश सांळुखे**
देवचंद कॉलेज, अर्जुननगर व्हाया निपाणी
ता. कागल जि. कोल्हापूर

**डॉ. प्रवीण लोंढे**
दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्र
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका

## सत्र ५ व ६ : साहित्यशास्त्र
## बी.ए.भाग ३ : मराठी

■ सत्र ५ : साहित्यशास्त्र


विभाग १ : साहित्याची लक्षणे आणि प्रयोजने (१)

विभाग २ : साहित्यनिर्मितीची कारणे (२४)


■ सत्र ६ : साहित्यशास्त्र


विभाग १ : शब्दशक्ती (३७)

विभाग २ : रसविचार आणि काव्यानंदाची चर्चा (५९)

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२६-२७ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# विभाग १
# साहित्याची लक्षणे आणि प्रयोजने

**१.० उद्दिष्टे:**

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचे वाचन केल्यानंतर तुम्हाला पुढील उद्देश साध्य करता येतील.

१. साहित्यशास्त्राची संकल्पना व स्वरूप याचे आकलन होईल.

२. साहित्याची विविध लक्षणे समजून घेता येतील.

३. काव्यलक्षणांच्या आधारे साहित्याची व्याख्या करता येईल.

४. साहित्यनिर्मितीमागे असणाऱ्या विविध प्रयोजनांचा परिचय होईल.

५. साहित्य निर्मितीमागील प्राचीन भारतीय व पाश्चात्त्य प्रयोजनांचे स्वरूप ध्यानात येईल.

६. तसेच या दोन्ही प्रयोजन विचारातील सहसंबंध समजून घेता येईल.

**१.१ प्रास्ताविक :**

आपण अभ्यास करत असलेल्या अभ्यास पत्रिकेचे नाव 'साहित्यशास्त्र' असे आहे. प्राचीन काळापासून त्याला 'काव्यशास्त्र' म्हणून ओळखले जाते. मराठीमध्ये 'वाङ्मय', 'साहित्य' असे शब्दप्रयोग वापरले जातात. वाङ्मय म्हणजे वाणीने युक्त असा कोणताही व्यवहार होय. आपल्या दैनंदिन व्यवहारात सर्व प्रकारचे औपचारिक आणि अनौपचारिक स्वरूपाचे बोलणे, चर्चा व्याख्याने यांचा समावेश वाङ्मयात होतो. पण साहित्य ही संज्ञा त्याच्या पुढे जाऊन जे जे लिहिले आहे किंवा छापले आहे त्याचा अंतर्भाव साहित्य या संज्ञेमध्ये होतो. पण यामध्ये वर्तमानपत्रातल्या बातम्या, पत्रे, नियतकालिकेतील जाहिराती, इतिहास लेखन किंवा भूगोलातील वर्णने यांचा समावेश छापील मजकूर म्हणून होतो. त्याला साहित्य म्हणता येत नाही. तर साहित्य म्हणजे काय हे आपल्याला विस्ताराने पहावे लागते. आणि म्हणूनच उपरोक्त प्रकारापेक्षा साहित्यामध्ये नेमक्या कोणत्या वैशिष्ट्यांचा, गुणधर्मांचा विशेष साहित्याला 'साहित्य' ठरवत असतो, ते पाहणे महत्त्वाचे ठरते. म्हणूनच अनेक अभ्यासक साहित्य म्हणजे काय, हे सांगतांना गुणधर्मांचा, लक्षणांचा उल्लेख आपल्या विवेचनात करतात. साहित्याच्या जन्माबरोबरच साहित्याचे शास्त्रही जन्माला येत असते. साहित्याच्या आकलनासाठी साहित्यशास्त्र अत्यंत महत्त्वाचे असते. वसंत पाटणकर या साहित्यशास्त्राचे महत्त्व अधोरेखित करताना म्हणतात की, आपल्यापुढील विशिष्ट साहित्यकृतीच्या मागे त्या त्या साहित्य परंपरेची एक साहित्यिक व्यवस्था असते. ही साहित्यिक व्यवस्था जर आपल्याला परिचयाची नसेल, तिचे जर आपल्याला भान नसेल, तर विशिष्ट साहित्यकृतीचे आकलन आपल्याला होणार नाही. (वसंत पाटणकर, २००६, पृ.४) म्हणजेच एखाद्या साहित्यकृतीचे विश्लेषण किंवा तिचे आकलन होण्यासाठी साहित्यशास्त्र माहीत असणे अत्यंत गरजेचे आहे.

साहित्य हे मानवी जीवनातील भावना, विचार, अनुभव आणि कल्पनाशक्ती यांचे कलात्मक प्रकटीकरण करणारे प्रभावी माध्यम आहे. साहित्याच्या माध्यमातून समाजजीवन, मानवी स्वभाव, सौंदर्यदृष्टी आणि जीवनमूल्ये यांचे दर्शन घडते. त्यामुळे साहित्याचे स्वरूप, त्याची वैशिष्ट्ये आणि त्यातील सौंदर्यतत्त्व समजून घेण्यासाठी विविध अभ्यासकांनी साहित्याच्या व्याख्या आणि लक्षणांचा सखोल अभ्यास केलेला आहे. प्राचीन भारतीय तसेच पाश्चात्त्य साहित्यशास्त्रज्ञांनी शब्द, अर्थ, ध्वनी, रस, भावना, कल्पना आणि अभिव्यक्ती यांच्या आधारे साहित्याचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्याच्या या विविध व्याख्या आणि लक्षणांमधून साहित्याची व्यापकता, कलात्मकता आणि मानवी जीवनाशी असलेला जवळचा संबंध स्पष्ट होतो.

साहित्य ही मानवी जीवनाशी निगडित असलेली एक महत्त्वाची कला आहे. साहित्य केवळ मनोरंजनासाठी नसून ते मानवी भावना, विचार, अनुभव आणि समाजजीवनाचे प्रतिबिंब व्यक्त करणारे प्रभावी माध्यम आहे. साहित्यनिर्मितीमागे विविध हेतू आणि प्रयोजने कार्यरत असतात. लेखक आपल्या अनुभवविश्वातून साहित्य निर्माण करतो, तर वाचक त्यातून आनंद, ज्ञान, मार्गदर्शन आणि जीवनदृष्टी प्राप्त करतो. भारतीय आणि पाश्चात्त्य साहित्यचिंतकांनी साहित्याच्या प्रयोजनांचा सखोल विचार केलेला दिसून येतो. यामध्ये यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, उपदेश, आनंद, आत्माविष्कार, जिज्ञासापूर्ती, पलायनवाद, इच्छापूर्ती, जीवनानुभूती आणि समाजप्रबोधन अशा विविध प्रयोजनांचा समावेश होतो. त्यामुळे साहित्य हे केवळ कलात्मक अभिव्यक्ती नसून मानवी जीवन अधिक समृद्ध, संवेदनशील आणि प्रगल्भ बनवणारे महत्त्वपूर्ण साधन आहे.

### १.२ विषय विवेचन :

साहित्य म्हणजे काय? या प्रश्नाला केंद्रवर्ती ठेवून त्याच्याशी निगडित अनेक तात्विक प्रश्नांची चर्चा या अभ्यासपत्रिकेच्या अनुषंगाने समोर येते. त्यातील साहित्याची एकच एक व्याख्या देता येते का? हा प्रश्न इथे महत्त्वाचा ठरतो. तर त्याचे उत्तर नाही असेच येते. कारण साहित्यकृतीतील जीवनचित्रण हे विशिष्ट असत नाही तर ते सार्वत्रिक असते. तिच्या आशयानुसार तिचा घाट बदलत असतो आणि म्हणूनच साहित्याला केवळ एकाच दृष्टिकोनातून पाहणे किंवा त्याचे विश्लेषण करणे हे अन्यायकारक ठरू शकते. साहित्याच्या प्राचीन भारतीय अभ्यासकांनी-पंडितांनी व पाश्चात्त्य अभ्यासकांनी साहित्य ही संकल्पना कोणकोणत्या दृष्टिकोनातून स्पष्ट केली आहे हे पाहणे महत्त्वाचे ठरते. म्हणूनच या अभ्यासकांच्या साहित्य म्हणजे काय ही संकल्पना स्पष्ट करणाऱ्या व्याख्या प्रथमत: पाहणे गरजेचे ठरते.

### १.२.१ साहित्याच्या व्याख्या :

साहित्य म्हणजे काय हे सांगत असताना त्याच्या लेखनाची वैशिष्ट्ये, त्याचे स्वरूप सांगणे किंवा त्याची व्यवच्छेदक तत्त्वे सांगणे होय. संस्कृत साहित्यपरंपरेत 'काव्य' ही संज्ञा 'ललित साहित्य' या व्यापक अर्थाने वापरली जात होती. त्यामुळे प्राचीन भारतीय परंपरेत साहित्याऐवजी 'काव्य' ही संज्ञाच येईल. ही साहित्य संकल्पना अतिशय गुंतागुंतीची आणि व्यामिश्र अशी आहे. त्यामुळे साहित्य या संकल्पनेची व्याख्या करत असताना अनेक अभ्यासकांच्या मतांमध्ये परस्परविरोधी भूमिका घेतलेली पाहायला मिळते. या भूमिका नेमक्या काय आहेत ते आपण इथे ध्यानात घेणार आहोत.

साहित्याचे सर्व गुणविशेष एकत्र येणे किंवा एखाद्या व्याख्येमध्ये समाविष्ट होणे हे अवघड असते. व्याख्या ही अलंकारिक किंवा भावात्मक नसावी अशी पथ्ये काव्याची व्याख्या करत असताना पाळावी लागतात. कधी कधी काव्याचे गुणधर्म, स्वरूप आणि वैशिष्ट्ये विस्ताराने सांगणे सोपे ठरते. या अर्थाने संस्कृत व पाश्चात्त्य

साहित्यशास्त्रातील कितीतरी व्याख्या ह्या अपूर्ण वाटू शकतात; पण याचा अर्थ असा नाही की या सर्वच व्याख्या अर्थपूर्ण नाहीत. एखाद्या व्याख्येत साहित्याचे सर्व गुणधर्म एकत्रित होऊ शकत नाहीत. काव्याचा एखादा विशेष व्याख्येतून प्रकट होतो आणि ही त्या व्याख्येची मर्यादा असते. भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरेत साहित्याच्या या सत्त्वशोधनाचा प्रयत्न केलेला आहे. या व्याख्यांचा आणि त्यामधून त्यांनी व्यक्त केलेल्या साहित्याच्या स्वरूप, गुणधर्माचा विचार आपण इथे करू.

**१.२.१.१. प्राचीन भारतीय अभ्यासकांच्या व्याख्या :**

व्याख्या करणे म्हणजे कमीत कमी शब्दात सारतत्व सांगणे होय. या साररूपामध्ये त्या संकल्पनेचे स्वरूप, मूल्यविशेष, गुणधर्म व वैशिष्ट्ये यांचा अंतर्भाव झाला असणे अपेक्षित असतो. म्हणूनच अशी व्याख्या करणे हे महत्त्वाचे कार्य असते. आपण यापूर्वी पाहिले त्याप्रमाणे साहित्य ही अत्यंत गुंतागुंतीची गोष्ट आहे; मग अशा साहित्याला एकाच व्याख्येमध्ये बांधणे कठीण काम आहे. प्राचीन काव्यशास्त्राने काव्याला त्याचे शरीर मानले आणि त्याचा आत्मा म्हणजे काव्यतत्त्व असल्याचे वर्णन केलेले आहे. शरीर व आत्मा हे रूपक म्हणून वापरलेले आहे. मानवी शरीरापेक्षा आत्मा महत्त्वाचा किंवा मूलभूत स्वरूपाचा व इतरांपेक्षा त्याचे वेगळेपण दाखवणारा असतो. ते माणसाचे स्थिरतत्त्व किंवा साररूप मानले जाते. एखाद्या वस्तूचे शरीर हे प्रत्यक्ष, जड किंवा सहजपणे ज्याचे आकलन होऊ शकते अशी गोष्ट असते. तर आत्मा हा अत्यंत सूक्ष्म आणि अप्रत्यक्ष अशा गोष्टींनी भारलेला व सहज लक्षात न येणारा असा प्रकार असतो. म्हणूनच काव्याची व्याख्या करत असताना काव्याचे शरीर आणि त्याचा आत्मा या दोन्हीतून उद्भूत होणाऱ्या गुणविशेषणाची मांडणी व्याख्येत असावी लागते. या दोन्हीचे एकत्रित्व म्हणजेच काव्य होय. या अनुषंगाने प्राचीन भारतीय अभ्यासकांनी केलेल्या या व्याख्यांचा आपण प्रथम परिचय करून घेऊ.

**भामह – 'शब्दार्थो सहितो काव्यम्।'**

भामहने केलेल्या या व्याख्येचा अर्थ शब्द आणि अर्थ यांचे सहितत्त्व म्हणजे काव्य होय. भामह हा संस्कृत काव्यशास्त्रज्ञ असून त्याचा कालखंड हा सातव्या शतकामधला आहे. भामह यांनी इ.स. ६०० ते इ.स. ७०० या काळामध्ये 'काव्यालंकार' नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये त्यांनी काव्याचे वरील लक्षण निर्देशित करून काव्याची व्याख्या केलेली आहे. त्याच्या या व्याख्येवरून त्याला काव्याच्या शब्द आणि अर्थ म्हणजेच काव्याचे शरीर आणि त्याचा आत्मा या दोन्ही गोष्टी अभिप्रेत असल्याचे ध्यानात येते. एखाद्या कवीच्या अंत:करणातील भाव हा शब्दाद्वारे व्यक्त केला जातो. हा काव्यातून येणारा शब्द फक्त वाच्यार्थ असत नाही तर त्याच्यातून विविध रस प्रवर्तित होत असतात.

**मम्मट – 'तद्दोषौ शब्दार्थौ सगुनौ अनलंकृती पुन:क्वापि।'**

'तद्दोषौ' म्हणजे दोषरहित, 'शब्दार्थौ' म्हणजे शब्द आणि अर्थ, 'सगुनौ' म्हणजे गुणसहित व 'अनलंकृती पुन:क्वापि' म्हणजे कधी कधी अलंकाररहित होय. गुणसहित म्हणजे काव्यातील प्रसाद, ओज, माधुर्य यासारखे गुण असावेत. जे रसास्वादात मदत करतात. एकूणच दोषरहित, गुणसहित व कधी कधी अलंकाररहित असे शब्द आणि अर्थ म्हणजे काव्य होय. म्हणजेच अलंकार हे काव्याला शोभा देत असतात, पण ते अनिवार्य असत नाहीत. जर एखाद्या ठिकाणी स्पष्ट अलंकार नसले तरीही ते काव्यच मानले जाईल. या व्याख्येमध्ये काव्याचे शरीर, आत्मा किंवा ध्वनी व रसाचा उल्लेख येत नाही. पण तरीही त्याला शब्दार्थापेक्षा ध्वनी आणि रसाचे महत्त्व मान्य होते.

**आनंदवर्धन – 'काव्यस्य आत्मा ध्वनि'**

संस्कृत साहित्यशास्त्राच्या विकासामध्ये काव्याचा आत्मा शोधण्याचा प्रयत्न नेहमीच झालेला आहे. असा एक प्रयत्न आनंदवर्धन यांनी देखील केला. आनंदवर्धनाने ध्वनी कल्पना काढून शब्दार्थात असलेल्या शक्तीचा शोध घेतलेला दिसतो. एखाद्या कलेचे सौंदर्य हे तिच्या आविष्काराच्या मार्गातूनच जाणवणार असते. आनंदवर्धनाने ध्वनीतत्त्व हेच काव्याचा आत्मा असल्याचे नमूद केले. आनंदवर्धनाने त्याच्या 'ध्वन्यालोक' (इ. स.८५०) या ग्रंथामध्ये या संदर्भाने मांडणी केलेली आहे. इतर शास्त्रांमध्ये शब्दांचा केवळ वाच्यार्थ अपेक्षित असतो पण काव्यामध्ये केवळ वाच्यार्थ महत्त्वाचा नसून त्याच्याही पलीकडे जाऊन सूचित करावयाचा अर्थ अपेक्षित असतो. या सूचित अर्थालाच आनंदवर्धन 'ध्वनी' असे म्हणतो. यालाच तो पुढे जाऊन रसध्वनी अशीही संज्ञा वापरतो. स.रा. गाडगीळ आनंदवर्धनाच्या या मताचे स्पष्टीकरण देताना म्हणतात, आनंदवर्धनाच्या मते, रस हे प्रत्यक्ष तत्त्व नसून शब्दार्थादी घटकांद्वारे ध्वनीत होणारे तत्त्व आहे. यालाच तो रसध्वनी असे म्हणतो. (स.रा. गाडगीळ, १९६५, पृ. १०) म्हणजेच काव्यात केवळ शब्दार्थ उपयोगाचा नाही तर तिथे व्यंग्यार्थाला म्हणजेच ध्वनीत होणाऱ्या अर्थालाही महत्त्व असते. 'काय सांगितले आहे' यापेक्षा 'काय सुचविले आहे' यावर काव्यसौंदर्य ठरत असते. प्रत्यक्ष सांगण्यापेक्षा सांगण्याच्या पलीकडे जाऊन जे काही सुचवले आहे ते अपेक्षित असते. म्हणूनच आनंदवर्धन 'ध्वनी'ला काव्याचा आत्मा मानतो.

एका अर्थाने आनंदवर्धन काव्यसौंदर्याचा संबंध शब्दशक्तीशी जोडताना दिसतो. प्राचीन काव्यशास्त्रामध्ये प्रारंभापासूनच या शब्दशक्तीचा विचार केलेला आपल्याला पाहायला मिळतो. काव्याचे वेगळेपण शोधत असताना या शब्दशक्तीकडे वळावेच लागते आणि म्हणूनच काव्यातील सौंदर्य हे शब्दार्थाशी निगडित असते. आनंदवर्धनाने या सूचित करण्याचा जो संबंध दर्शवला आहे तो वरवरचा नसून तो रसापर्यंत जाऊन पोहोचतो. एखादा अनुभव प्रत्यक्ष सांगण्यापेक्षा किंवा वर्णन करण्यापेक्षा तो ध्वनीत करण्याने किंवा सूचविण्याने अधिक परिणामकारक होतो हे आपण कित्येकदा पाहिलेले आहे. तसे तर मानवी मनातील अनेक भावभावना अशा आहेत की ज्या केवळ शब्दातून व्यक्त होऊ शकत नाहीत. मग अशा भावनांचे सूचन केले जाते. म्हणजेच जे शब्दांच्या चिमटीत पकडू शकत नाही असे अनुभव सूचित केले जातात किंवा तिथे भाषेची मर्यादा असल्याचे दिसून येते. म्हणूनच या सूचवण्याला किंवा ध्वनीत करण्याला आनंदवर्धन अधिक महत्त्व देतो.

**विश्वनाथ – 'वाक्यं रसात्मकं काव्यम्।'**

रसयुक्त वाक्य म्हणजे काव्य असा अर्थ विश्वनाथाच्या या व्याख्येचा आहे. 'नाट्यशास्त्र' या ग्रंथांमध्ये नाट्यकलेच्या अनुषंगाने भरतमुनींनी प्रथमतः 'रसा'चा विचार मांडला. पण पुढे जाऊन नाट्यकलेसोबतच काव्यशास्त्रामध्येसुद्धा रसाचा विचार केंद्रवर्ती आला. हा विचार विश्वनाथाने प्रथमतः मांडला. संस्कृत मधील महत्त्वाचा काव्यशास्त्रज्ञ म्हणूनही विश्वनाथाकडे पाहिले जाते. इसवी सन १३०० ते १३५० या कालावधीमध्ये त्यांनी लिहिलेल्या 'साहित्यदर्पण' या ग्रंथामध्ये याची चर्चा केलेली आहे. त्याच्या या व्याख्येनुसार काव्याचा आत्मा हा रस आहे. रस म्हणजे भावना होय. एखादे काव्य वाचनानंतर रसिकाच्या किंवा वाचकाच्या मनामध्ये जी भावना जागृत होते ती भावना म्हणजे रस होय. शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर इ. यासारख्या भावनांचा तो एक अनुभव असतो. या प्रत्येक भावना सुखदायक किंवा आल्हाददायक असतात आणि म्हणूनच त्यामुळे एखादे काव्य रमणीय ठरत असते. म्हणूनच वाचकाच्या किंवा रसिकाच्या मनात भावजागृतीसाठी शब्दार्थ कारणीभूत ठरतात. असे शब्दार्थ म्हणजे काव्य होय.

### १.२.१.२ पाश्चात्त्य अभ्यासकांच्या व्याख्या

पाश्चात्त्य साहित्यामध्ये एकूणच अभिजातवादाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. या अभिजातवादाला प्रतिक्रिया म्हणून पुढे रोमांचवाद (रोमँटिसीझम) ही संकल्पना पुढे आली आणि त्याच्यातून नवी काव्य संकल्पना प्रचलित झाली. या परंपरेतील अनेक साहित्यशास्त्रज्ञाने सौंदर्य हे काव्याचे तत्त्व किंवा सत्व मानले आहे. त्यामुळे भावना-आविष्काराला यात अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले गेले. सौंदर्य हे ललितकलांचे प्राणतत्त्व मानून त्यांनी काव्याच्या व्याख्या केलेल्या आहेत. या व्याख्यांमधील वर्डस्वर्थ, कोर्ट्होप, मॅथ्यू अर्नोल्ड, कार्लाइल यांच्या व्याख्यांचा परिचय आपण इथे करून घेऊ.

**वर्डस्वर्थ –** Poetry is the spontaneous overflow of powerful feeling. It takes its origin from emotion recollected in tranquillity.

उत्कट भावनांचा उत्स्फूर्तपणे केलेला आविष्कार म्हणजे कविता होय.

या व्याख्येनुसार वर्डस्वर्थने भावना आणि त्याचा आविष्कार याला महत्त्व दिलेले आहे. त्यांच्या या भूमिकेनुसार ‘काव्य हा भावनांचा आविष्कार असतो’ किंवा ‘काव्य हा आत्माविष्कार असतो.’ या उत्कट भावना म्हणजे नेमक्या कोणत्या प्रकारच्या भावना हे स्पष्ट करताना वर्डस्वर्थ म्हणतो, Emotion recollected in tranquillity. म्हणजेच कवीच्या मनात येणाऱ्या कोणत्याही प्रकारच्या भावनांचा आविष्कार याला कविता असे म्हणता येणार नाही. मग कोणत्या भावनांना कविता म्हणावे हे सांगताना तो म्हणतो की, या भावना चिंतन-मननातून फुललेल्या असाव्या. आणि म्हणूनच त्यासाठी कवीची मनोवृत्ती ही चिंतनशील असावी. आपल्या अनुभवातील चांगल्या किंवा वाईट, तात्कालीक किंवा शाश्वत स्वरूपाच्या भावनांकडे विवेकशीलपणे पाहून त्याचे चिंतनशील रूप त्याने कवितेतून प्रकट केलेले असावे. या चिंतनातूनच चांगल्या आणि शाश्वत अशा भावनांचा आविष्कार कवी आपल्या काव्यातून करेल. मग त्याचा हा अनुभव केवळ वैयक्तिक न ठरता तो वैश्विक ठरतो. अशाच भावना कवितेतून व्यक्त होणे किंवा व्यक्त झालेल्या असणे हे वर्ड्स्वर्थला अपेक्षित आहे. भावनेच्या आवेगाने कविता जन्माला येत असते. भावनेचा तो सहजस्फूर्त उद्रेक असतो. अर्थात वर्डस्वर्थने घेतलेली ही भूमिका कविता आणि भावकविता या साहित्यप्रकारांना अधिकतेने लागू पडते. उदा. केशवसुतांची ‘कविता आणि कवी’ ही कविता-

अशी असावी कविता, फिरून
तशी नसावी कविता, म्हणून
सांगावया कोण तुम्ही कवीला
अहांत मोठे?- पुसतों तुम्हाला.

(‘केशवसुतांची कविता’, २००७, पृ. आठ)

या कवितेतून उमटलेला सहजस्फूर्त उद्रेक आहे. वर्डस्वर्थची ही भूमिका मात्र इतर साहित्य प्रकारांना जशीच्या तशी लागू पडत नाही. कारण कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र या साहित्यप्रकाराच्या निर्मितीत उत्कट भावनेचा हा सहजस्फूर्त उद्रेक सातत्याने टिकून राहत नाही.

**कोर्टहॉप –** The art of producing pleasure by the just expression of imaginative thought and feeling in metrical Language.

कल्पनाशील विचार आणि भावनांची छंदोबद्ध भाषेतून योग्य अभिव्यक्ती करून निर्माण केलेला आनंद म्हणजे कविता होय.

या व्याख्येमध्ये कोर्टहॉप विचार व भावना या दोन्हीचा उल्लेख करतो; पण हे दोन्हीही कल्पनारम्य असले पाहिजेत आणि या विचार भावनांचा आविष्कार करणारी भाषा ही वृत्त-छंदबद्ध अशी असावी असे तो म्हणतो. म्हणजेच इथे कोर्टहॉपला निव्वळ भावनांची अभिव्यक्ती अपेक्षित नाही; तर या भावनांची कल्पनाशक्तीद्वारे होणारा आविष्कार अभिप्रेत आहे. तसेच त्यावर केवळ बुद्धीचे नियंत्रण त्याला अपेक्षित नाही. अशा भावनांचा छंदोबद्ध आविष्कार वाचकाच्या मनाला आनंदाचा अनुभव देत असतो. म्हणजेच कल्पनेला स्वैर होऊ न देता त्यावर काहीएक बुद्धीचे नियंत्रण हवे आणि भावनेला व कल्पनेला विचाराचा म्हणजेच बुद्धीचा आधार असावा अशा एकमेकांवरती बेतलेल्या या गोष्टींचे भान कवितेत असावे. अन्यथा कविता ही स्वैर, अवास्तव, आणि अतिरंजीत होण्याचे धोके वाढतात. म्हणूनच विचार हा नेहमीच साहित्याच्या केंद्रभागी राहिलेला आहे. मराठी साहित्य परंपरेत जे जे साहित्य लोकप्रिय झाले त्या त्या साहित्यामध्ये विचार हा प्राधान्याने आलेला आहे. उदा. संत साहित्य.

साहित्यातून मांडलेला हा विचार केवळ शास्त्रीय साहित्याप्रमाणे मांडला तर तो रुक्ष किंवा निरस होऊ शकतो; पण तो कलात्मक पद्धतीने आल्याने तो निरस होत नाही. संत तुकाराम, संत जनाबाई, संत बहिणाबाई किंवा आधुनिक काळातील कवींच्या सामाजिक कवितांमध्ये भावना व त्याची कलात्मक मांडणी ही जितकी वाचकाला भावते तितकाच त्यातील सामाजिक विचारही वाचकाला भावतो. इथे कोर्टहॉपच्या मांडणीनुसार भावनेसोबत कल्पनेला महत्त्व मिळाले आहे. त्याची ही मांडणी काव्यस्वरूपाची व्याप्ती अधिक स्पष्ट करणारी आहे. ही व्याख्या अधिक व्यापक आहे. कारण कवी-लेखक आपल्या मनातील भावनांचा आविष्कार करत असतो. त्या व्यक्त करण्यासाठी कवी विचार-कल्पनांची त्याला कलात्मक जोड देत असतो. महत्त्वाचे म्हणजे हा आविष्कार लयबद्ध अशा भाषारूपातून तो करतो. या सबंध आविष्कार वाचकाला किंवा रसिकाला काव्यानंदप्राप्ती मिळवून देत असतो. अशी ही आनंदनिर्मित अभिव्यक्ती 'काव्य' म्हणवली जाते.

**मॅथ्यू अर्नोल्ड –**

1. Poetry is the Criticism of Life.

   काव्य म्हणजे जीवनभाष्य.

2. The most delightful and perfect form of utterance that human word can reach.

   भाषेद्वारे घडवून येणारा अत्यंत आल्हाददायक आणि निर्दोष आविष्कार म्हणजे काव्य.

वरील दोन्ही व्याख्या या मॅथ्यू अर्नोल्ड यांच्या आहेत. या व्याख्येतून काव्याच्या भाषेवर आणि त्या भाषेद्वारे येणाऱ्या आनंददायक अनुभवावर अधिक भर दिलेला आहे. काव्यभाषा ही निर्दोष असावी म्हणजेच ती अनुभवांचे नेमके प्रकटीकरण करणारी असावी असा यातून अर्थ ध्वनीत होतो. साहित्यिक हा एक समाजाचा घटक असतो आणि या नात्याने समाजाबद्दल, मानवी जीवनाबद्दलचे कुतूहल त्याला असते. त्याबद्दल शोध त्याच्या परीने सुरू असतो. हा शोध, त्याबद्दलचे चिंतन तो साहित्यातून व्यक्त करत असतो. एक प्रकारे तो

साहित्यातून जीवनाविषयीचा शोध मांडत असतो. म्हणूनच त्याची साहित्यकृती ही एक जीवनभाष्य ठरत असते. त्याला या जीवनविषयक शोधाच्या प्रवासात वाट्याला आलेले अनुभव, विविध जाणिवा, कल्पना किंवा अपेक्षा इ. बद्दलचे त्याचे मत तो यातून प्रकट करत असतो. म्हणूनच साहित्यकृती ही एक जीवनभाष्य ठरत असते. सावित्रीबाई फुले यांच्या कवितेच्या ओळीतून असेच जीवनभाष्य व्यक्त करतात.

ज्ञान नाही विद्या नाही, ते घेणेची गोडी नाही

बुद्धी असुनि चालत नाही, तयास मानव म्हणावे का? ।।१।।
दे रे हरी पलंगी काही, पशूही ऐसे बोलत नाही
विचार ना आचार नाही, तयास मानव म्हणावे का? ।।२।।

(सावित्रीबाई फुले, पृ.२७ )

ही रचना म्हणजे स्वतंत्र सौंदर्यात्मक शब्दशिल्प आहे. हे जीवनभाष्य आहे पण त्यासोबतच ती निर्दोष आल्हाददायक कलाकृतीही आहे. शब्दसामर्थ्यामुळे तिचे वेगळेपण वाचकाला रसप्रतीती देते. यादृष्टीने काव्याकडे पाहिले असता मॅथ्यू अर्नोल्ड यांच्या वरील दोन्ही व्याख्या अनुभवांचे नेमके प्रकटीकरण करणाऱ्या काव्यस्वरूपाचे दर्शन घडवणाऱ्या आहेत.

**कार्लाइल –** 'Poetry is musical thought'

'संगीतमय विचार म्हणजे काव्य'

प्राचीन काव्यशास्त्रज्ञ जगन्नाथ याने केलेल्या 'रमणीय अर्थाचे प्रतिपादन करणारे शब्द म्हणजे काव्य' या व्याख्येशी समांतर ही व्याख्या आहे. 'संगीतमय' या शब्दाचा लयबद्धता, नादमयता याबरोबरच ताल, सूर या संवेदनांशीही संबंध आहे. लयबद्धता, गेयता हे विशेष आपल्याला मराठीतील संत साहित्य परंपरेतील कवितेपासून दिसतात. जेव्हा विचार भावनिक होऊन शब्दात उतरतो तेव्हा त्याला आपोआप एक लय, नाद प्राप्त होतो. हा नाद म्हणजेच काव्यातील संगीत होय. मराठी काव्यातील विशेषत: अभंग, ओवी, भावगीते यामध्ये या नादाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. ज्ञानेश्वरांच्या ओवीपासून ते संत तुकारामांच्या अभंगापर्यन्त ही लय आपणाला जाणवते. या लयीमुळेच या रचना वर्षानुवर्षे वाचक, रसिकाच्या मनात स्थान टिकवून आहेत. म्हणूनच चांगल्या कवितेमध्ये शब्दांचे केवळ अर्थ महत्त्वाचे नसतात तर त्यासोबत शब्दांचा उच्चार ज्या लयीत होतो ती लयही महत्त्वाची ठरते. म्हणूनच भावना जेव्हा गाण्याच्या रूपात व्यक्त होतात तेव्हा ती रचना 'संगीतमय विचार' ठरते. या विशेषामुळेच एखादी कलाकृती वाचत असताना वाचक त्यात तल्लीन होतो. मग ती, कथा, कादंबरी, कविता किंवा नाटक असो. या लयीचा तिचा तिचा म्हणून एक वेग, गती असतो. या गतीशी वाचक बांधला जातो. उदा. शांता शेळके, कुसुमाग्रज, विंदा करंदीकर, सुरेश भट यांच्या कविता वाचताना या संगीतमयतेची अनुभूती वाचक घेतो. एकूणच विचार हा कवितेचा आत्मा आणि लय, नाद, ताल हे कवितेचे अभिव्यक्त-शरीर आहे. या दोन्हीचा सुवर्णमध्ये म्हणजे काव्य होय.

### १.२.२ साहित्याची लक्षणे:

प्राचीन भारतीय व पाश्चात्त्य मीमांसकांनी विविध व्याख्यांच्या आधारे साहित्याची लक्षणे नमूद केलेली आहेत. साहित्य ही संकल्पना स्पष्ट करत असताना त्याचे गुणधर्म, स्वरूप, वैशिष्ट्ये यांचे विवेचन करणे महत्त्वाचे ठरते. यातील शब्दविचार, ध्वनी, रस, रमणीयता या लक्षणांचा विचार आपण इथे करू.

#### १.२.२.१ प्राचीन भारतीय अभ्यासकांनी सांगितलेली साहित्याची लक्षणे:

**शब्दविचार :**

साहित्य हे शब्दांच्या माध्यमातून साकार होते म्हणूनच याला 'सहितत्त्व'-शब्द आणि अर्थाचे मीलन असे म्हटले होते. प्राचीन भारतीय साहित्यविचारात शब्दशक्तीचा विचार महत्त्वाचा मानला गेला आहे. काव्याच्या शब्द आणि अर्थ म्हणजेच काव्याचे शरीर आणि आत्मा या दोन्ही गोष्टी अभिप्रेत असतात. यातील शरीर या संकल्पनेच्या अनुषंगाने कवितेच्या शब्दसामर्थ्याचे विवेचन साहित्यविचारात केले गेले आहे. शास्त्रीय लेखनातील व वाङ्मयकलेतील शब्दाचे स्वरूप व कार्य हे निरनिराळे असते आणि ते शोधण्याचा प्रयत्न प्राचीन मीमांसकांनी केला. यादरम्यान त्यांना शब्दाच्या तीन शक्तीची जाणीव झाली. या तीन शब्दशक्ती म्हणजे अभिधा, लक्षणा आणि व्यंजना.

कोणत्याही एखाद्या वस्तूचे, भावनेचे प्रतीक हे शब्द असतात. त्यांना प्राप्त झालेला अर्थ हा संकेतार्थ असतो. पण वेगवेगळ्या संदर्भात या शब्दाला वेगवेगळा अर्थ प्राप्त होत असतात. उदा. एखाद्या गाढवाला उद्देशून 'ते पहा गाढव' असे म्हटले तर त्याचा जाणवणारा इथला अर्थ हा वाच्यार्थ असतो. एखाद्या व्यक्तीसाठी 'गाढव आहेस' असे म्हटले तर तिथे 'गाढव' या शब्दाचा वाच्यार्थ घेता येत नाही, तर या शब्दातून व्यक्त होणारा दुसरा अर्थ म्हणजे 'मूर्ख मनुष्य' अशा पद्धतीने लक्षात घेतला जातो. हा अर्थ कुठल्याही कोशामध्ये उपलब्ध नसला तरी तो मराठी भाषिकाला कळत असतो. 'अभिधा' म्हणजेच शब्दाची प्रथम जाणवणारी शक्ती होय. जो शब्द साक्षात संकेताचा विषय झालेल्या अर्थाचा बोध करतो तो वाचक शब्द होय, अशी वाचक शब्दाची व्याख्या मम्मटाने केली आहे. तर अभिधापेक्षा अधिक महत्त्वाची शक्ती म्हणजे लक्षणा होय. काव्यामध्ये या शक्तीला महत्त्वाचे स्थान असते. शब्दांच्या पलीकडे जाऊन जे काही काव्यातून प्रकट होते ते म्हणजे लक्षणा किंवा लक्षार्थ होय. उदा. 'प्रकाशात येणे'. कोसला कादंबरीने भालचंद्र नेमाडे यांचे नाव प्रकाशात आले या उदाहरणातील अपेक्षित असणारा अर्थ हा 'प्रकाशात येणे' म्हणजे 'उजेडात येणे' असे नसून 'प्रसिद्धीस येणे' असा त्याचा लक्षार्थ इथे घेतला जातो. हा शब्दशक्तीतील दुसरा महत्त्वाचा अर्थ होय. तर तिसरा अर्थ म्हणजे व्यंजना होय. साहित्यातून ध्वनीत होणारा अर्थ म्हणजेच व्यंजना हे आपण याआधीही पाहिलेले आहे. पण थोडा विस्ताराने इथे आपण त्याचा विचार करू. काव्यामध्ये एखाद्या भावनेचे किंवा घटनेचे प्रत्यक्ष वर्णनापेक्षा सूचकतेला अधिक महत्त्व असते. ही सूचना देण्याचे सामर्थ्य केवळ व्यंजनेमध्ये असते. हे सुचवणे सौंदर्यपूर्ण असते. म्हणूनच काव्याचे काव्यपण व्यंजनेमध्ये सामावलेले असते असे म्हटले जाते. उदा. 'सूर्य अस्ताला गेला' हे संस्कृतमधील व्यंजनेचे प्रसिद्ध उदाहरण आहे. या उदाहरणांमधून एखाद्या ब्राह्मण, चोर, नववधू स्त्रीला या रचनेतून प्रतीत होणारा अर्थ वेगवेगळा आहे. ब्राह्मणाला-सायंसंध्येचे, चोराला-चोरी करण्याचे, नववधूला-पतीच्या स्वागताची सूचना या एकाच वाक्यातून होताना आपल्याला दिसते. या व्यंजनेने वाक्य उच्चारणारी व्यक्ती, तिची मनस्थिती, तिच्या भवतालाचे वातावरण इ. अनेक संदर्भ लक्षात घ्यावे लागतात. काव्यात्मता ही नेहमीच वाच्यार्थ- लक्षार्थापलीकडची

असते. तसेच व्यंग्यार्थ समजण्यासाठी रसिक किंवा वाचकालाही ती समजून घेण्याची, सौंदर्य ग्रहणाची ताकद, क्षमता असणे गरजेचे असते.

**ध्वनी:**

साहित्याची लक्षणे सांगत असताना ध्वनी हे काव्याचे महत्त्वाचे लक्षण सांगितले जाते. भारतीय काव्यशास्त्रात आनंदवर्धनाच्या ध्वनिसिद्धांताने काव्याच्या या लक्षणावर शिक्कामोर्तब झाला. 'काव्यस्य आत्मा ध्वनि' या व्याख्येनुसार काव्याचे प्राणतत्त्व ध्वनीला मानण्यात आले. ध्वनी म्हणजे केवळ नाद नाही तर काव्याच्या शब्दात वाच्यार्थापेक्षा सूचित, ध्वनित झालेला अर्थ होय. काव्य जेव्हा शब्दार्थाच्या पलीकडे जाऊन एक विशिष्ट अर्थ सुचवते तेव्हा त्या अर्थाला ध्वनी असे म्हटले जाते. याच्या पुढे जाऊन शब्दातून जाणवणारा व्यंग्यार्थ हाच काव्यसौंदर्यनिर्मितीक्षम मानला गेला. आनंदवर्धनाच्या मते, या व्यंग्यार्थामुळेच रसप्रतीती होते. त्यामुळे ध्वनी हा काव्याचा आत्मा ठरतो.

**रस:**

रस म्हणजे काव्य व अभिनयात व्यक्त होणारे भाव. भारतीय साहित्यशास्त्राच्या प्रारंभी भरतमुनी या मीमांसकाने त्याच्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथामध्ये नाट्यशास्त्राच्या अनुषंगाने रसाचा प्रथम विचार केला, 'तत्र विभावानुभाव्यभिचारीसंयोगाद्रसनिष्पत्ती' हे त्याचे प्रसिद्ध रसविषयक सूत्र होय. पण केवळ नाट्य हेच रसाचे एकमेव क्षेत्र आहे अशी समकाळात धारणा असल्यामुळे काव्यशास्त्रामध्ये रसाचे स्थान स्पष्ट करण्याचा प्रयत्न कुणी केला नाही. काव्यशास्त्रामध्ये रीती, अलंकार हेच काव्याचे आत्मतत्त्व असल्याचे सिद्ध करण्यामध्ये मीमांसक भूमिका घेत होते. पण हा भ्रम नंतरच्या काळात दूर होऊन काव्यशास्त्रामध्ये सुद्धा रसाच्या स्वरूपाचा विचार होऊ लागला.

संस्कृत साहित्य परंपरेत सर्वाधिक महत्त्व पावलेले काव्याचे व्यवच्छेदक तत्त्व म्हणून रस या संकल्पनेकडे पाहिले जाते. यापूर्वी साहित्याच्या व्याख्या पाहत असताना आपण विश्वनाथ याची 'वाक्यं रसात्मकं काव्यम्।' ही व्याख्या पाहिलेली आहे. या व्याख्येनुसार एखादी कविता किंवा साहित्यातला कोणताही एखादा प्रकार वाचल्यानंतर वाचकाला किंवा रसिकाला जी अनुभूती मिळते ती म्हणजेच रस होय. एका अर्थाने रस प्रतीती होणे म्हणजेच सौंदर्यानुभूती होणे होय. ही सौंदर्यानुभूती ही अलौकिक पातळीवरची असते. लौकिक अशा अनुभवांचे, भावनांचे रसामध्ये रूपांतर करणारी एक विशिष्ट प्रक्रिया येथे घडत असते. काव्यशास्त्रामध्ये मांडलेल्या या रस संकल्पनेचा अलंकार, वक्रोक्ती, रीती, ध्वनी, औचित्य इत्यादी काव्यतत्त्वांशी संबंध जोडला जातो. किंवा एका अर्थाने ही काव्यतत्त्वे रसतत्त्वात समाविष्ट असल्याचे निर्देश अनेक अभ्यासकांनी केलेले आहेत आणि म्हणूनच या सर्वसमावेशकतेमुळे रसतत्त्वात कोणताही नेमकेपणा राहत नाही. एखादे शौकात्मक नाट्य किंवा काव्य वाचनानंतर आपल्याला येणारा प्रत्यय हा आनंदमय स्वरूपाचा असतो का? असा प्रश्न निर्माण होतो. संस्कृत साहित्य परंपरेतही रस हा केवळ आनंददायक असत नाही तर तो सुखदुःखात्मक स्वरूपाचा असतो असेच साहित्य मीमांसक मानतात.

रस विचाराच्या इतिहासात रसाचे तीन अर्थ जाणवतात १.भावमूलक काव्यसौंदर्य म्हणजेच रस. ही शब्दार्थाद्वारा साधलेली कवीच्या निर्मितीक्षम भावनेची कलात्मक अभिव्यक्ती असते. म्हणजेच रस हा काव्यगत असतो. २. दुसरा अर्थ भावनिष्ठ किंवा भावमूलक काव्यसौंदर्याची अनुभूती (रसिकाला येणारी) होय. या ठिकाणी रसिक वाचकाच्या मनामध्ये उद्भवलेली सुखदुःखमय भावनिक जाणीव हा रसाचा अर्थ मांडलेला आहे. ३.रसाचा

तिसरा अर्थ आनंदपर आहे. काव्याच्या वाचनाने विशुद्ध भावनांच्याद्वारा मनाची जी आनंदमय अवस्था होते त्याला रस असे म्हटले जाते. एकूणच भरताच्या 'तत्र विभावानुभाव्यभिचारीसंयोगाद्रसनिष्पत्ती' या सूत्राचे प्रकटन या तीन रस पद्धतीमध्ये आपल्याला दिसून येते. हे रस प्रामुख्याने नवरस आहेत. ज्याला 'भाव' असेही म्हटले जाते. शृंगार, हास्य, करुण, रौद्र, वीर, भयानक, बीभत्स, अद्भुत, शांत इ. हे मराठी परंपरेतील प्रमुख नऊ रस आहेत.

**रमणीयता :**

प्राचीन भारतीय काव्यशास्त्रात 'रमणीयता' हे साहित्याचे महत्त्वाचे आणि मूलभूत लक्षण मानले जाते. केवळ शब्दांची मांडणी म्हणजे साहित्य नाही तर त्याद्वारे वाचकाला आनंद देण्याची क्षमता त्यामध्ये असणे महत्त्वाचे आहे. पंडित जगन्नाथ यांनी 'रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः काव्यम्' अशी व्याख्या 'रसगंगाधर' या ग्रंथात केली आहे. म्हणजेच 'रमणीय अर्थ प्रतिपादन करणारा शब्द म्हणजे काव्य होय.' रमणीयता म्हणजे ज्या शब्दार्थामुळे वाचकाला अलौकिक असा आनंद प्राप्त होतो. व्यावहारिक सुखापेक्षा याची वृत्ती वेगळी असते. तसेच या रमणीयतेचा मूळ आधार हा रस असतो. साहित्यातून व्यक्त होणारा रस (शृंगार, हास्य, करुण इ.) आणि ती कलाकृती वाचल्यानंतर वाचकाला त्यातून मिळणारी रसानुभूती या महत्त्वाच्या आहेत. साहित्याच्या वक्रोक्ती, अलंकारीकता, ध्वन्यात्मता हे भाषाविशेष ही रमणीयता निर्माण करत असतात. त्यामुळे वाचकाचे चित्त लेखकाच्या भाववृत्तीशी तन्मय होते. थोडक्यात जो शब्द, त्याचा अर्थ वाचकाच्या मनात ईश्वरी आनंदासारखा (ब्रह्मानंदसहोदर) आनंद निर्माण करतो तो गुणधर्म म्हणजे 'रमणीयता' होय.

**१.२.२.२. पाश्चिमात्य/आधुनिक अभ्यासकांनी सांगितलेली साहित्याची लक्षणे:**

भारतीय परंपरेत सांगितलेल्या साहित्य लक्षणांच्या व्यतिरिक्त पाश्चात्त्य अभ्यासकांनीही काही महत्त्वाची लक्षणे नमूद केली आहेत. ज्यामध्ये साहित्याच्या सर्वांगांचा विचार केलेला दिसून येतो. यातील कल्पना, भावना, विचार, उदात्तता व अभिव्यक्ती या प्रमुख लक्षणांचा विचार आपण इथे करणार आहोत.

**कल्पना:**

इतर लेखनापेक्षा ललित साहित्याला वेगळा करणारा विशेष म्हणजे कल्पितता किंवा कल्पना. आधुनिक साहित्यशास्त्रात साहित्याचे स्वरूप केवळ शब्द आणि अर्थ यांच्या एकत्रित मांडणीपुरते मर्यादित राहिलेले नाही, तर त्यात कल्पनाशक्ती, अनुभव, वास्तव आणि सर्जनशीलता यांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. आधुनिक साहित्य हे वास्तवाचे जसेच्या तसे चित्रण न करता कल्पनेच्या माध्यमातून त्याला कलात्मक रूप देते. कथा, कादंबरी किंवा नाटकातील अनुभव हे कित्येकदा अद्भुतरम्य अशा विश्वातील कल्पिते असतात. उदा. परीकथा, अद्भुतकथा इ. परंतु कित्येकदा या साहित्यप्रकारातील अनुभव हे वास्तव सदृश्य किंवा वास्तवावर बेतलेलेही असतात. मात्र हे अनुभव म्हणजे प्रत्यक्ष वास्तव असत नाही तर वास्तवातील घटनांचे, अनुभवांचे कल्पनेच्या सहाय्याने केलेले सौंदर्यात्मक रचित असते. उदा. 'सूड' मधील 'जानकी', 'गोतावळा' कादंबरीतील 'नारबा' या व्यक्तिरेखा किंवा या साहित्यकृतीतून उभा राहणारा काळ, अवकाश या सर्व गोष्टी म्हणजे वास्तव नाही. तर वास्तवाचे कल्पिततेने केलेली जुळणी असते. या लेखकाच्या कल्पनाशक्तीने निर्माण होत असतात. लेखक आपल्या कल्पकतेच्या साहाय्याने जीवनातील अनुभव अधिक प्रभावी, गहिरे आणि भावनापूर्ण पद्धतीने व्यक्त करतो. तसेच आधुनिक साहित्यात नवनिर्मिती आणि प्रयोगशीलतेलाही महत्त्व दिले जाते. एझरा पाउंडने Make it New या विधानातून याच विचाराला अधोरेखित केले आहे. कल्पनाशक्तीच्या बळावर लेखक विविध प्रतिमा

आणि प्रतीकांची निर्मिती करतो, ज्यामुळे साहित्य वाचकांच्या मनाला थेट स्पर्श करते. साहित्यातील सत्य हे केवळ वास्तवावर आधारित नसून संभाव्यतेवर अधिक आधारलेले असते आणि हे सत्य कल्पनाशक्तीमुळे अधिक परिणामकारकपणे व्यक्त केले जाते.

**भावना:**

भावनात्मकता हाही अनुभवाचा विशेष आहे. या अनुभवात असणारा भावनेचा स्पर्श वैशिष्ट्यपूर्ण असतो. तो अनुभव विशिष्ट अशा भावनांची जागृती करत असतो. लेखकाच्या वाट्याला येणारे जीवनानुभव आणि त्याचा त्याने लावलेला अन्वयार्थ हा भावनिक पातळीवरून घेतलेला जीवनाचा वेध असतो. या अनुभवामध्ये त्याला भले-बुरे, सुष्ट-दुष्ट असे संमिश्र स्वरूपाचे अनुभव येत असतात. या अनुभवांचे आणि हा अनुभव ज्या व्यक्तींद्वारे मिळालेला असतो त्या व्यक्तींचे जसेच्या तसे साहित्यात अवतरण होत नाही; तर त्यांच्या आधारे कल्पनेच्या साहाय्याने लेखक साहित्यामध्ये एक नवा अनुभवकोश निर्माण करत असतो. या अनुभवकोशांमधील व्यक्तींना वास्तव जीवनातील अनुभवातील भावनांचे राग, लोभ, रंग प्राप्त होत असतात. म्हणूनच साहित्यामधून व्यक्त होणाऱ्या व्यक्तिरेखा या वास्तव जगण्यातील माणसांचे सौंदर्य रूप घेऊन जिवंत होत असतात. साहित्यातील हा भावनाविष्कार रसिक मनाला त्यामुळेच भावतो. त्या व्यक्तिरेखांप्रती लेखकाच्या मनातील भावनांची प्रतीती वाचकाच्या मनामध्ये होत असते. उदा. 'इंधन', 'कळप', 'तहान' यासारख्या साहित्यकृतीमध्ये रंगवलेले जीवनचित्रण, वास्तव विश्वातील व्यक्तींसारखीच वावरणारी माणसे आणि त्यांच्या ठिकाणी असणाऱ्या कृती-उक्तींची प्रतीती रसिकाला येत असते. म्हणूनच त्या भावनांची प्रतीती वाचकालाही येते. 'बलुतं', 'अक्करमाशी', 'तीन दगडाची चूल', 'आभरान' यासारख्या कृती वाचत असताना जीवनातील दुःखाचे भोगवटे वाचकालाही अस्वस्थ करून जातात. अशाच प्रकारचा भावनाविष्कार साहित्याचे एक लक्षण म्हणून अवतरताना आपल्याला दिसतो. साहित्यकृतीतील व्यक्तिरेखांना वास्तव जगात आपल्यासारखे अस्तित्व नसते; मात्र हा अनुभव घेत असताना वाचकांच्या मनात भावना जागृत होणे मात्र साहजिकच असते. त्यामुळे जीवनजाणिवा प्रगल्भ आणि समृद्ध करण्याचे कार्य साहित्यकृतीतील 'भावना' हे लक्षण साधत असते.

वास्तव जीवनातील भावनाजागृती व साहित्याच्या आस्वादाने निर्माण होणारी रसिक मनातील भावनाजागृती यामध्ये साम्य असत नाही. कृतीशून्य असलेली भावना जागृती ही साहित्यकृतींच्या संदर्भात महत्त्वाची ठरते. उदा. 'शांतता कोर्ट चालू आहे' वाचत असताना लीला बेणारे च्या बाजूने उभे राहून तिला आधार द्यावा असे कितीही वाटले तरीही ते वाचक करू शकत नाही. कारण हे कलाविश्व लेखकाच्या कल्पनाशक्तीने निर्माण केलेले एक विश्व असते. त्या विश्वातील घटना, प्रसंग, व्यक्तिरेखा ही त्याची मानसनिर्मिती असते. त्या व्यक्तिरेखांना वास्तव जगात स्थान असत नाही किंवा अस्तित्व असत नाही. म्हणूनच त्यामध्ये कृती करण्याची अपेक्षा असू शकत नाही.

**विचार :**

वास्तव जीवनात आलेल्या अनुभवाच्या आधारे लेखक जीवनाचा अर्थ लावू पाहत असतो. त्याला अनुभवातून मिळालेले दुःख आणि त्याचा भवतालाकडे पाहण्याचा दृष्टिकोन यामध्ये काहीएक साम्य असते. त्याला आलेल्या अनुभवातला आनंद त्याला भवतालाकडे आनंदमय वृत्तीने पाहण्याची दृष्टी देत असतो. या गोष्टी लेखकाला मिळालेला अनुभव आणि त्यातून त्याचा विकसित झालेला दृष्टिकोन हा परस्परसंबंधित असतो. उदा. आपुला पेला दुःखाचा, डोळे मिटूनी प्यायचा असे जीवनाचे सार सांगणारे केशवसुत. तर पेला अर्धा भरला आहे

की, पेला अर्धा सरला आहे म्हणायचं, तुम्हीच ठरवा असे म्हणणारे मंगेश पाडगावकर. या दोन कवींच्या दृष्टिकोनामध्ये आपल्याला कमालीचे अंतर दिसते. जीवनचक्राचा अन्वयार्थ असा साहित्यकृतीमधून व्यक्त होत असतो. ही अभिव्यक्ती वर्णनात्मक नसून ती कलात्मक रूप घेऊन अवतरत असते. म्हणजेच साहित्यामध्ये कलात्मकतेला महत्त्वाचे स्थान आहे. म्हणूनच अनुभवाच्या वैचारिक सखोलतेपाशी कलात्मकता जोडलेली असते. साहित्यातून व्यक्त होणारा विचार हा भावनिक रूप घेऊन येत असला तरी या भावना वेगळ्या दाखवता येत नाहीत. जसे शास्त्रीय वाङ्मयांमध्ये मांडलेला एखादा विचार त्रिकालाबाधित सत्य असतो व विविध पुराव्यानिशी तो तपासून पाहता येतो. तसे साहित्याच्या विचाराबद्दल म्हणता येत नाही. साहित्यकृतीमधून व्यक्त होणाऱ्या अनुभवाशी तो विचार समरस झालेला असतो. आणि म्हणूनच हा विचार वेगळा काढून घेता येत नाही. शास्त्रीय लेखनातून व्यक्त होणारी वैचारिकता तर्कसंगत असते तर ही तर्कसंगती आपल्याला साहित्यकृतीमधून थेटपणे दाखवता येत नाही. कारण तिचा संबंध त्या साहित्यकृतीतील अनुभवांशी निगडित असतो.

**उदात्तता :**

पाश्चात्त्य काव्यशास्त्राच्या अभ्यासामध्ये 'उदात्तता' (The Sublime/Sublimity) हे साहित्याचे एक अत्यंत महत्त्वाचे लक्षण मानले जाते. या संकल्पनेचा उगम ग्रीक समीक्षक लाँजायनस (Longinus) याच्या 'पेरि होस' (On the Sublime) या ग्रंथातून झाला आहे. भाषेचे अलंकारिक असणे किंवा नुसती सौंदर्यपूर्ण वर्णन म्हणजे उदात्तता नाही. तर ती वाचकाच्या मनाला भावणारी असली पाहिजेच पण त्यासोबत ती उच्च दर्जाची असायला हवी. अशा साहित्यकृतीतून उच्च मानवी मूल्ये व विश्वकल्याणाची भावना जोपासलेली असली पाहिजे. मन-बुद्धीला पटणारे, मानवी मनाला खोलवर जाऊन भिडणारे व उत्कट भाव व विचार-चिंतन त्यामध्ये अपेक्षित असते. अशा साहित्यकृतीचा आशय वाचकाला सामान्यतेच्या पलीकडे जाऊन 'विस्मय' व आनंदाची प्रचिती देतो. अशा आशयाला पेलवणारे कलाकृतीचे भाषासामर्थ्यही-शब्दनिवड, वाक्यरचना इ. वाचकाच्या आनंदात भर टाकेल. उदा. लिओ टॉल्स्टॉय याची - 'War and Peace', जेन ऑस्टेन याची - 'Pride and Prejudice' या कादंबऱ्या. एकूणच हे साहित्य मानवी मनाला संकुचिततेकडून व्यापकतेकडे आणि क्षुद्रतेकडून उदात्ततेकडे नेते. म्हणूनच आधुनिक साहित्यशास्त्रात 'उदात्तता' हे साहित्याचे महत्त्वाचे लक्षण सांगितले आहे.

**अभिव्यक्ती:**

'अभिव्यक्ती' हे आधुनिक साहित्यशास्त्रात साहित्याचे लक्षण सांगितले गेले. केवळ शब्दांची मांडणी म्हणजे अभिव्यक्ती नाही. तर लेखकाच्या अनुभवविश्वातील भावना, विचार, चिंतन, संवेदना यांना भाषेच्या माध्यमातून कलात्मक पद्धतीने मांडणे होय. ही अभिव्यक्ती लेखकाच्या प्रामाणिक अनुभवाशी कधी प्रतारणा करत नाही. लेखकाच्या अनुभवकोशातील सत्य, वेदना, संघर्ष, आनंद याची संवेदनशीलपणे मांडणी करते. यातील कोणत्याच गोष्टीचे अवास्तव, फसवे चित्रण ती करत नाही. तसेच अनुभवाच्या व्यापकतेची जाणीव सखोलपणे वाचकाला व्हावी म्हणून ही मांडणी त्यातील प्रतिमा, प्रतीके आणि अलंकार यांच्या माध्यमातून कलात्मक स्वरूपात करून तिला 'ललित' रूप प्राप्त करून देते. एखाद्या घटनेकडे, अनुभवाकडे पाहण्याचा लेखकाचा म्हणून एक दृष्टिकोण असतो. या अनुषंगाने साहित्यातील व्यक्तिरेखाही भारीत झालेल्या असतात. म्हणूनच या व्यक्तिरेखांच्या दृष्टिकोनातून व्यक्तीच्या मनातील घालमेल, अंतर्द्वंद्व अभिव्यक्त करण्यावर भर दिला जातो. अनुभवाच्या तीव्रतेनुसार भाषेच्या जुन्या संकेतांना डावलून भाषेचे नवीन प्रयोगशील रूप अवलंबले जाते. एकूणच साहित्याच्या माध्यमातून लेखक आत्मशोध करत असतो. त्यातून मानवी जीवनाचे सूक्ष्म, सर्जनशील

आणि भाषिक प्रकटीकरण होत असते. म्हणूनच अभिव्यक्ती हे आधुनिक साहित्यशास्त्रात साहित्याचे लक्षण मानले गेले आहे.

एकूणच साहित्याचे स्वरूप समजून घेत असताना त्याच्या विविध लक्षणांना ध्यानात घेणे क्रमप्राप्त ठरते. या लक्षणावरून साहित्याच्या अंतर-बाह्य व्याप्तीचे आकलन होत असते. साहित्य हे मनाने निर्माण केलेल्या जीवनाचे दर्शन घडवते. हे शब्दरूप अनुभवविश्व असते. त्यातून वास्तव जीवनाची प्रतिकृती पात्र, व्यक्तिरेखांच्या आधारे उभी केली जाते. अनुभवातीत भावना, विचार, लेखकाचा दृष्टिकोण, जीवनदृष्टी, आकलन या सगळ्याची शब्दसौंदर्यात्मक-कलात्मक रूप या साहित्यातून उमटत असते. ज्याच्या लेखनपूर्तीनंतर लेखकाला आणि ती वाचकाला असीम आनंदाची तृप्ती देत असते.

**१.२.३ साहित्याची प्रयोजने :**

या आधीच्या घटकामध्ये आपण साहित्य म्हणजे काय, त्याच्या स्वरूप व लक्षणांचा विचार आपण केला आहे. यातून साहित्य ही संकल्पना आपल्या ध्यानात आली असेल. यानंतर आपण साहित्य निर्मितीमागे कारणीभूत असणाऱ्या हेतूंचा, प्रयोजनांचा विचार आपण इथे करणार आहोत. इतिहास, भूगोल, अर्थशास्त्र, विज्ञान, तत्त्वज्ञान इ. विषय ज्या अर्थाने ज्ञानशाखा म्हणून मान्यता आहे त्या अर्थाने साहित्याला ज्ञानशाखा मानले जात नाही. वरील ज्ञानशाखांमध्ये ज्या पद्धतींचा अवलंब करून विषय हाताळला जातो त्या पद्धती साहित्यामध्ये येत नाही. तसेच वरील विषयांचा 'ज्ञान देणे' हा मुख्य हेतू आहे तसा तो साहित्याचा असत नाही. तसेच कोणताही वाचक असे कोणतेतरी ज्ञान मिळवण्यासाठी साहित्याचे वाचन करत नाही. त्यामुळे मनोरंजन, करमणूक, आनंदप्राप्ती याच हेतूप्रती साहित्याची निर्मिती होत असते. आणि या गोष्टींची अनुभूती ज्या साहित्यातून होत नाही ते साहित्य या निकषानुसार साहित्य ठरत नाही. इथे एक मूलभूत गोष्ट लक्षात घ्यावी लागते आणि ती म्हणजे साहित्य ही एक कला आहे. संगीत, चित्र, नाट्यादी कलाप्रमाणे ती एक कला आहे. अशा कलांच्या आस्वाद-वाचनानंतर वाचक त्याच्यातून काहीएक निष्कर्ष काढत असतो. पण असे निष्कर्ष काढावेत म्हणून साहित्याची निर्मिती होत नाही. हे असे निष्कर्ष म्हणजे साहित्याचा तो 'परिणाम'म्हणून गणला जातो. म्हणूनच लेखक ज्या प्रेरणेतून, हेतुतून लिहितो ते हेतू आणि वाचकावर त्याचा झालेला परिणाम अशा दोन्ही बाजूंनी या प्रयोजनांचा विचार करावा लागतो.

ही प्रयोजने भारतीय आणि पाश्चात्त्य मीमांसकांनी विवेचनातून स्पष्ट केली आहेत. या प्रयोजनांचे 'लेखकनिष्ठ' आणि 'वाचकनिष्ठ' असे विभाजन करता येते. 'लेखकनिष्ठ' म्हणजे एखादा लेखक कोणत्या हेतूतून साहित्याची निर्मिती करतो आणि वाचकनिष्ठ म्हणजे एखादा वाचक एखादी कलाकृती कोणत्या हेतूने वाचतो अशा दोन पद्धतीने या प्रयोजनांचा विचार करता येतो. यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, उपदेश, आनंद, आत्माविष्कार, जिज्ञासापूर्ती, पलायनवाद, इच्छापूर्ती अथवा स्वप्नरंजन, जीवनानुभूती, समाजप्रबोधन या सर्व प्रयोजनांचा विचार आपण इथे करणार आहोत.

संस्कृतमधील काव्य प्रयोजन विचारांमध्ये कवीच्या अंगाने व रसिकांच्या अंगाने अशा दोन्ही बाजूने प्रयोजन विचार मांडलेला आहे. वसंत पाटणकर यांनी त्यांच्या 'साहित्यशास्त्र: स्वरूप आणि समस्या' या ग्रंथामध्ये या प्रयोजनांचा विस्ताराने आढावा घेतला आहे. भरतापासून ते हेमचंद्रापर्यंत या प्रयोजन विचारांमध्ये 'आनंद' व 'बोध' या दोन ठळक प्रयोजनांचा विचार आपल्याला दिसून येतो. भामहाच्या प्रयोजनविचारांमध्ये कवीच्या अंगाने- 'रचना', 'धर्म', 'अर्थ', 'काम' आणि 'मोक्ष' हे चतुर्वेद पुरुषार्थ या अनुषंगाने प्रयोजन विचार मांडलेला

आहे. तर भामहाप्रमाणे वामनानेही कवीच्या अंगानेच काव्याचे 'दृष्ट फल प्रीती' आणि 'अदृष्ट फल कीर्ती' अशी प्रयोजने मांडली आहेत. रुद्रटाने 'प्रीती', 'कीर्ती', 'अर्थ' व 'अनर्थोपशम' ही काव्यप्रयोजने सांगितली आहेत. अभिनव गुप्ताच्या मांडणीमध्ये 'प्रीती' आणि 'व्युत्पत्ती' ही दोन काव्यप्रयोजने समाविष्ट आहेत. या मीमांसकांनी मांडलेल्या काव्य प्रयोजनानंतर मम्मटाने काव्य प्रयोजनाचा एकत्रितपणे विचार केलेला आपल्याला पहायला मिळतो. उपरोल्लेखित काव्यप्रयोजनांची नीट मांडणी मम्मटाने त्याच्या संस्कृत श्लोकामध्ये केलेली आहे.

काव्यं यशसेऽर्थकृते व्यवहारविदे शिवेतरक्षतये।
सद्यः परनिर्वृतये कान्तासंमिततयोपदेशयुजे।।

यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, अशुभनिवारण, तत्काळ प्राप्त होणारा उच्च आनंद व पत्नी ज्या जवळीकतेने, प्रेमाने उपदेश करते तसा उपदेश, ही काव्यप्रयोजने त्याने सांगितली आहेत. यापैकी यशप्राप्ती, अर्थप्राप्ती व अशुभनिवारण ही कविसंबद्ध (लेखकनिष्ठ) तर व्यवहारविज्ञान, उच्च आनंद व कान्तासंमित उपदेश ही रसिकसंबद्ध (वाचकनिष्ठ) प्रयोजने आहेत.

**यश :**

हे लेखकगत/ लेखकनिष्ठ प्रयोजन आहे. एखादा कवी, लेखक लोकांपर्यंत पोहोचतो तो त्याच्या लेखनकौशल्यामुळे. यामुळे लेखक, कवीचे नाव घराघरापर्यन्त पोहोचते. काव्य निर्मितीमुळे कवीला, लेखकाला प्रसिद्धी, मान्यता प्राप्त होते. अर्थात सर्वच कवींना हे यश सारख्याच प्रमाणात प्राप्त होते असे नाही. कवीच्या निर्मिती गुणवत्तेवर त्याला हे यश प्राप्त होत असते. आधुनिक काळातील विविध प्रसारमाध्यमांमुळे कवीला किंवा लेखकाला ही प्रसिद्धी तात्काळ प्राप्त होते.

**अर्थप्राप्ती:**

हेही लेखकनिष्ठ प्रयोजन आहे. लेखकाला लेखनामुळे ज्याप्रमाणे प्रसिद्धी प्राप्त होते त्यासोबतच त्याला अर्थप्राप्तीही होत असते. प्राचीन व मध्ययुगीन काळात अनेक कवींना राजाश्रय लाभत असे. यादरम्यान राजाकडून कवीच्या लेखनकार्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे पुरस्कार, अर्थसाहाय्य लाभत असे. केवळ प्रतिभावान लेखक, कवीला असा राजाश्रय मिळत असल्याने हे काम प्रतिष्ठेचेही मानले जायचे. आधुनिक काळात भारतीय व पाश्चात्त्य देशामध्ये लेखनकार्यासाठी विविध संस्थांकडून विविध प्रकारच्या शिष्यवृत्ती मिळत असतात. ज्यामुळे लेखक पूर्णवेळ लेखक म्हणून लेखनकार्य करू शकतो व केवळ लेखनावर उपजीविका करू शकतो. पाश्चात्त्य देशाच्या तुलनेत भारतीय लेखकांना ती कमी, तुटपुंजी असली तरी अशा स्वरूपाच्या लेखनातून अर्थप्राप्ती होत असते. साहित्यनिर्मितीमुळे लेखकाला धन किंवा मानधन प्राप्त होते असा उल्लेख 'काव्यप्रकाश' ग्रंथात येतो. प्राचीन काळी हे प्रयोजन इतर प्रयोजनापेक्षा दुय्यम स्वरूपाचे मानले जायचे. पण आधुनिक काळात या प्रयोजनकडे व्यावहारिकतेच्या दृष्टिकोनातून पाहिल्यामुळे ते महत्त्वाचे बनले आहे. लेखकाची आवड, छंद म्हणून साहित्यनिर्मितीकडे न पाहता ते उपजीविकेचेही साधन कसे बनू शकेल असा वेध घेतला जातो. पुस्तकांच्या होणाऱ्या विक्रीतून, त्याबद्दल मिळणाऱ्या रॉयल्टीमधून, तसेच विविध वृत्तपत्रातील लेखनकार्यासाठी मिळणारे मानधन असे लेखकाच्या अर्थप्राप्तीचे मार्ग आहेत. आनंद हा साहित्याचा मुख्य हेतू असला तरी कित्येकदा लेखक, कवी, कलाकार आपल्या निर्मितीतून आर्थिक स्थैर्य मिळवण्याच्या उद्देशाने हे कार्य पार पाडत असतो. पण हे साहित्याचे प्रयोजन सर्वच साहित्याला लागू पडत नाही. याचे महत्त्वाचे कारण म्हणजे संत परंपरेतील

साहित्य हे अशा कोणत्याही अर्थप्राप्तीसाठी लिहिले गेले नाही. हे साहित्य 'स्वान्त सुखाय' (स्वतःच्या आनंदसाठी) रचलेले आहे.

**व्यवहारज्ञान:**

वाचकाला सुजाण व व्यवहारी बनवणारे हे साहित्य प्रयोजन आहे. हे एक वाचकनिष्ठ प्रयोजन आहे. साहित्य हे मनोरंजनाचे साधन असले तरीही त्या कक्षा ओलांडून साहित्य माणसाला जगाचे, समाजाचे आणि मानवी जीवनरीतीचे प्रत्ययकारी दर्शन घडवत असते. हे ज्ञान वेगवेगळ्या क्षेत्रातील व विविध स्तरातील असते. या ज्ञानातूनच मानवी जीवनातील विविध संघर्ष, वेदना, रीतीभाती, संस्कृती याचे दर्शन घडत असते. म्हणूनच एखादी साहित्यकृती वाचकाच्या अनुभवकक्षा, जाणिवा विस्तारत असते. समृद्ध करत असते. त्यामुळेच एक व्यावहारिक शहाणपण वाचकाला प्राप्त होत असते. व्यवहार म्हणजेच लोकव्यवहार होय. या लोकव्यवहारात विविध प्रसंगांमध्ये माणसाच्या जगण्याची, वागण्याची, बोलण्याची रीत अंतर्भूत असते. त्यामुळे माणसांच्या या विविध तऱ्हांचे ज्ञान साहित्यातून अनुभवायास मिळते. या अर्थाने हे साहित्य प्रयोजन मम्मटाने नमूद केले आहे.

**उपदेश:**

'कान्तासंमिततयोपदेशयुजे' म्हणजे पत्नी ज्या जवळीकीने, ममत्वाने व सहजतेने उपदेश करते त्या पद्धतीने काव्यही वाचकाला हळुवारपणे उपदेश देते, अशी कल्पना या प्रयोजनामागे आहे. साहित्य हे मनोरंजनाचे साधन ज्या पद्धतीने मानले जाते त्या सोबतच साहित्य हे जीवनाला मार्गदर्शन करणारेही ठरते. या प्रयोजना अंतर्गत केवळ 'बोधा'ची अपेक्षा असत नाही तर जीवनाच्या विविध अंगांचे दर्शन घडवणेही अपेक्षित असते. समाजाला नैतिक, अध्यात्मिक आणि व्यावहारिक स्वरूपाचे मार्गदर्शन करून नीतिमान जीवन जगण्यास साहित्य प्रवृत्त करत असते. वाचकाच्या विचारांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याची ताकद साहित्यामध्ये असते आणि म्हणूनच मानवी मूल्यांची व समाज कल्याणाची तत्त्वे साहित्याद्वारे रुजवली जातात. मराठी संत परंपरेतील साहित्य याचे उत्तम उदाहरण आहे. समाजात वाढत जाणारी वाईट प्रवृत्ती, अनिती यांचा नायनाट करताना साहित्य महत्त्वाची भूमिका बजावते. वाचकाच्या मनामध्ये नीती, सदाचार, माणुसकी यासारख्या मूल्यांची जाणीव करून देऊन वाचकाच्या चारित्र्यसंवर्धनामध्ये भर घालत असते. तसेच संकुचित वृत्तीला बगल देऊन विश्वबंधुत्वाची कल्पना रुजवण्यास मदत करत असते. पण हा उपदेश कोणत्याही कठोर वचनांमधून नसतो. पत्नी ज्या प्रेमळ शब्दानी व जवळीकीने आपल्या प्रिय व्यक्तीला समजावून सांगते त्या पद्धतीने हा साहित्यातून मिळणारा उपदेश हळुवार स्वरूपाचा असतो. एकूणच अत्यंत सौंदर्यात्मक पद्धतीने नैतिक बोध किंवा शिकवण देण्याचे काम साहित्यातून घडत असते.

**आनंद:**

'सद्यः परनिर्वृतये' म्हणजे तात्काळ प्राप्त होणारा अलौकिक स्वरूपाचा आनंद. प्राचीन परंपरेतील हे सर्वात महत्त्वाचे प्रयोजन आहे. पाश्चात्त्य अभ्यासक कांट यालाच Dis-interested असे म्हणतो. हे प्रयोजन लेखकनिष्ठ व वाचकनिष्ठ अशा दोन्ही स्वरूपाचे आहे. काव्यापासून मिळणाऱ्या आनंदाला 'ब्रह्मानंदसहोदर' असे म्हटले आहे. कोणत्याही लौकिक व्यवहाराच्या पलीकडे जाऊन जो आनंद प्राप्त होतो त्याला अलौकिक आनंद किंवा 'ब्रह्मानंदसहोदर' असे म्हटले जाते. एखाद्या खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतल्यानंतर आनंद प्राप्त होतो त्या ऐंद्रिय आनंदापेक्षा वरच्या दर्जाचा आनंद म्हणून याकडे पाहिले जाते. म्हणजेच एखादी साहित्यकृती लिहून पूर्ण झाल्यानंतर लेखकाला मिळणारा व एखादी कलाकृती वाचनानंतर वाचकाला मिळणारा आनंद या प्रयोजनांतर्गत

येतो. कोणत्याही सांसारिक सुखापेक्षा याचा दर्जा उच्च स्वरूपाचा असतो. साहित्यातून ज्या मानवी जीवनातील विविध अनुभवांचे दर्शन घडते त्यातून नैतिक मूल्य व उदात्त विचार हे वाचकाला मार्गदर्शक ठरत असतात. तसेच एखाद्या संघर्षरत, दुःखी, निराश व्यक्तीला साहित्याच्या अनुभूतीनंतर एक प्रकारची शांती, समाधान मिळते व त्याचे मन ताजेतवाने होते. तसेच प्रत्यक्ष जीवनात ज्या इच्छा-अपेक्षा अपूर्ण राहतात त्याची पूर्तता साहित्यनिर्मितीतून व वाचनातून पूर्ण करण्याचा प्रयत्न म्हणजेच तृप्तीचा आनंद साहित्यातून मिळत असतो. माणसाला अधिक प्रगल्भ आणि संवेदनशील बनवणारी लेखकाच्या बाजूने व वाचकाच्याही बाजूने ही एक सृजनात्मक प्रक्रिया असते. म्हणून साहित्याच्या प्रयोजनामध्ये आनंद हे प्रयोजन मध्यवर्ती स्थानात येते.

**आत्माविष्कार:**

लेखक हा समाजातील एक संवेदनशील घटक असतो आणि म्हणूनच तो एखाद्या घटनेकडे विशिष्ट दृष्टिकोनातून पाहत असतो. या दृष्टिकोनातून त्याला जाणवलेले, अनुभवलेले जे सत्य असते ते सत्य किंवा अनुभवविश्व लेखक आपल्या प्रतिभेच्या माध्यमातून मांडत असतो यालाच आत्माविष्कार असे म्हटले जाते. लेखक स्वतःच्या मनातील ज्या भावना असतात त्या उत्कटतेने मांडून या निर्मितीचा आनंद मिळवत असतो. आत्माविष्कारामध्ये लेखकाच्या अंत:करणातील विविध भावना, विचार व जीवनानुभव प्रकट होत असतात. या प्रकटीकरणातून लेखक स्व-अस्तित्वाचा शोध घेत असतो. तसेच स्वतःच्या विचार व भावनांच्या प्रकटनासाठी विशिष्ट अशा आकृतीबंधाची रचना स्वीकारत असतो. कविता, कथा, ललितगद्य, आत्मकथन यासारखे रूपबंध स्वीकारून तो आपल्या भावना सुस्पष्ट पद्धतीने मांडत असतो. या मांडणीतून लेखकाचे व्यक्तिमत्त्व, त्याचा दृष्टिकोन तसेच जीवनविषयक त्याचे तत्त्वज्ञान याचा परिचय वाचकाला होत असतो. या सृजनशील आविष्कारातून लेखक आपल्या अनुभवविश्वाद्वारे नवनवीन आकार व कलाकृती निर्माण करण्यास यशस्वी होतो. एकूणच आत्माविष्कार म्हणजे केवळ स्वतःला व्यक्त करणे नसून त्याद्वारे कवी किंवा लेखक स्व-अनुभवाच्या पलीकडे जाऊन स्व-अस्तित्वाचा शोध घेण्याची प्रक्रिया राबवत असतो.

**जिज्ञासापूर्ती :**

साहित्यामध्ये उभी राहणारी सृष्टी ही नेहमीच वास्तव मानवी सृष्टीशी समांतर असते आणि म्हणूनच या सृष्टीतील रहस्ये, मानवी जीवनातील गुंतागुंत समजून घेण्याची नैसर्गिक प्रेरणा साहित्यनिर्मिती मागे असते. म्हणूनच मानवी मनाची जिज्ञासा शांत करणे हेदेखील साहित्याचे एक प्रयोजन मानले जाते. या प्रयोजनाधारे मानवी जीवनाचे आकलन होते. वाचकाला नवीन जाणिवा, अनुभव व सत्य याचा बोध होत असतो. ज्यामुळे कवी लिहितो आणि वाचक वाचतो असे एक मध्यसूत्र या प्रयोजनाचे दिसून येते. साहित्यातून प्राप्त होणाऱ्या अनुभव आणि जाणिवांमुळे वाचकाच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावत असतात. म्हणूनच जीवनाचा अर्थ, मानवी मन यासारखे रहस्य उलगडण्यासाठी साहित्य मदत करत असते.

**पलायनवाद:**

देवानंद सोनटक्के यांनी सादर केलेल्या शोधनिबंधात पलायनवादाची व्याख्या दिली आहे. ते म्हणतात, जीवनात दु;खी आणि निराश झालेल्यांना आपल्या कल्पनेच्या पंखावर आरूढ करून त्यांना उच्च आणि अननुभूत आनंद देणे हे कलेचे प्रयोजन शोपनहॉवर, ना. सी. फडके यांनी मानले आहे. हाच पलायनवाद होय. (देवानंद सोनटक्के, साहित्याचे प्रयोजन, Wikipedia) मानवी जीवन नेहमीच अनेक संघर्ष, दुःख व भयानक वास्तवाने

भारित झालेली आहे आणि अशा या जीवन रीतीतून कुठेतरी विसावा मिळावा, मानसिक शांतता मिळावी, मनोरंजन व्हावे व एक भावनिक आधार मिळावा या दृष्टिकोनातून साहित्याकडे पाहिले जाते. रोजच्या जगण्यात येणारी अनेक दु:खे, निरसता, थकवा यातून सुटका मिळवण्यासाठी व मनाला एक उभारी देण्याचा पर्याय साहित्यातून उपलब्ध होत असतो. साहित्य या वास्तवावर कल्पनाविलासाद्वारे तणावमुक्त अशी फुंकर घालत असते. धाडसी कथा, प्रेम कथा, भयकथा, कादंबऱ्या यासारख्या माध्यमातून वाचक मनोरंजन करून घेत असतो. तसेच वास्तव जीवनात अपूर्ण राहिलेल्या इच्छा, स्वप्ने व वासनांची पूर्तता काल्पनिकपणे साहित्याद्वारे होत असते. याबरोबरच दुःखी, पीडित मनाला एक विरंगुळाही प्राप्त होत असतो. एकूणच वास्तवापासून थोडे दूर गेल्याने पुन्हा नवीन उर्जेने जीवनसंघर्ष करण्यास बळ मिळत असते व हे बळ साहित्य देत असते.

**इच्छापूर्ती अथवा स्वप्नरंजन :**

इच्छापूर्ती अथवा स्वप्नरंजन हेदेखील साहित्याचे महत्त्वाचे प्रयोजन आहे. माणसाच्या मनात अनेक अतृप्त इच्छा, वासना असतात. वास्तवात त्या पूर्ण करणे शक्य नसते किंवा अशक्यप्राय असतात. या वास्तव जीवनात अपूर्ण राहिलेल्या इच्छापूर्ती साहित्याद्वारे करणे शक्य असते. सातत्याने प्रतिकूल परिस्थितीत वावरल्याने माणसाचे मन निराश, हतबल, दु:खी होते. या मानवी जीवनातील दुख, वेदना यांपासून थोडा विसावा मिळावा म्हणून स्वप्नरंजनाचा आधार घेतला जातो. यातून एक काल्पनिक विश्व उभे राहून सुखाची अनुभूती वाचकाला मिळत असते. हे प्रयोजन सिग्मंड फ्रॉइड यांच्या 'दिवास्वप्न' (Day Dreaming) या संकल्पनेवर आधारित आहे. सर्व संकटांना मात देणारे साहित्यातील नायक, नायिका यांच्या प्रेरणा वास्तव मानवी जीवनात घेतल्या जातात. तसेच कल्पनाविश्वात काहीही करणे शक्य असल्याने वास्तवात करू पाहणारे मन या कल्पित जगात आपला कल्पनाविस्तार करत असते. तसेच लैंगिक बंधने नसल्याने लेखक व वाचकाच्या मनाचा स्वैर आविष्कार यातून होत असतो. मराठीतील ना. सी. फडके यांनी 'पुन:प्रत्यया'चा जो सिद्धांत मांडला त्यासाठी या स्वप्नरंजन संकल्पनेचा पुरस्कार केला आहे. तात्पुरते वास्तव विसरून रंजनाचा आनंद देणारे हे साहित्य असते.

**जीवनानुभूती:**

साहित्याचा मुख्य स्रोत हा नेहमीच मानवी जीवन राहिलेला आहे. लेखक ज्या सामाजिक परिघात घडतो त्या समाजाचे पडसाद साहित्यात उमटत असतात. लेखकाच्या वैयक्तिक जीवनानुभूती चे शब्दरूप साहित्यातून प्रकट होते. समाजातील संघर्ष, विविध प्रश्न, जीवन व्यवहारातील गुंतागुंत, रीती, संस्कृती अशा अनेक अंगांचे दर्शन घडवून वाचकाला सामाजिक भान देत असते. साहित्यातील वास्तव चित्रणाने समाज जीवनाकडे पाहण्याचा प्रगल्भ दृष्टिकोण विकसित होत असतो. त्या द्वारे वाचकाचे भावविश्व समृद्ध होत असते. साहित्याच्या या कार्यामुळे सामाजिक परिवर्तनाला हातभार लागत असतो. तसेच साहित्यातून व्यक्त झालेल्या अनुभवविश्वामुळे वाचक क्लिष्ट प्रश्नांवर विचार करून तो समजाप्रती चिंतनप्रवण होत असतो. म्हणूनच साहित्यनिर्मिती मागे जीवनानुभूती हे महत्त्वाचे प्रयोजन मानले जाते. हे जसे लेखकनिष्ठ प्रयोजन आहे तसेच ते वाचकनिष्ठही प्रयोजन आहे. एकूणच साहित्य हे जीवनाला अधिक उन्नत, प्रगल्भ व सौंदर्यपूर्ण बनावत असते.

**समाजप्रबोधन :**

साहित्य हे नेहमीच लोकचळवळीचे माध्यम राहिलेले आहे. मनोरंजनाच्या कक्षा ओलांडून साहित्य हे परवर्तनवादी विचाराचे वाहक होत असते. वास्तव समाजजीवनात अनेक अज्ञान, अंधश्रद्धा, रुढी, प्रथा, परंपरा यांचा बिमोड करण्यासाठी व प्रबोधनात्मक परिवर्तन घडवून आणण्यासाठी साहित्य नेहमीच अग्रक्रमावर असते.

समाजातील वंचित, दुर्लक्षित अशा क्षेत्रातील अनुभव, जाणिवांचे भान साहित्यामुळे वाचकाला येते. समाजाला वैचारिक दिशा देणे व मानवी मूल्यांचे संवर्धन करून प्रगतशील समाज निर्मितीमध्ये साहित्य महत्त्वाची भूमिका बजावत असते. समाजामध्ये नवीन प्रगतिशील मूल्य रुजविणे, मानवी हक्क, स्वातंत्र्य, समता, बंधुता यासारख्या मुक्तीवादी परिवर्तनाचा विचार लोकांपर्यंत पोहोचवणे हे कार्य साहित्य पार पाडत असते. म्हणूनच वाचकाची वैचारिक शक्ती जागृत करून समाजविघातक गोष्टींना आळा घालण्याचे महत्त्वपूर्ण कार्य साहित्य करत असते. थोडक्यात समकालीन प्रश्नांचे भान वाचकाला देऊन साहित्य 'जीवनवादी' बनवण्याचे कार्य हे साहित्यातून घडत असते.

**१.३ समारोप:**

एकूणच साहित्याच्या व्याख्या आणि लक्षणे या विषयात भारतीय व पाश्चात्त्य अभ्यासकांनी साहित्याचे स्वरूप, गुणधर्म आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. प्राचीन भारतीय परंपरेत 'काव्य' ही संज्ञा साहित्याच्या अर्थाने वापरली जात होती. साहित्य ही संकल्पना अत्यंत व्यापक आणि गुंतागुंतीची असल्यामुळे तिची एकच परिपूर्ण व्याख्या करणे कठीण मानले गेले. भामह यांनी शब्द आणि अर्थ यांचे एकत्रित स्वरूप म्हणजे काव्य असे म्हटले, तर मम्मट यांनी दोषरहित, गुणयुक्त शब्दार्थाला काव्य मानले. आनंदवर्धन यांनी 'ध्वनी'ला काव्याचा आत्मा मानले तर विश्वनाथ यांनी 'रसयुक्त वाक्य म्हणजे काव्य' असे सांगून रसाला केंद्रस्थानी ठेवले. पाश्चात्त्य विचारवंतांमध्ये वर्डस्वर्थ यांनी उत्कट भावनांचा सहज आविष्कार व कोर्टहॉप यांनी कल्पनाशील विचार आणि भावनांच्या कलात्मक अभिव्यक्तीला महत्त्व दिले, तर मॅथ्यू अर्नोल्ड यांनी काव्याला जीवनभाष्य मानले. कार्लाइल यांच्या मते संगीतमय विचार म्हणजे काव्य होय. साहित्याची प्रमुख लक्षणे म्हणून शब्दशक्ती, ध्वनी, रस, रमणीयता, कल्पना, भावना, विचार, उदात्तता आणि अभिव्यक्ती यांचा विचार केला जातो. साहित्य हे केवळ शब्दांचे संकलन नसून मानवी अनुभव, भावना, विचार आणि सौंदर्य यांचे कलात्मक प्रकटीकरण आहे. त्यामुळे साहित्य वाचकाला आनंद, चिंतन आणि जीवनदृष्टी प्रदान करणारे प्रभावी माध्यम ठरते.

साहित्य ही केवळ ज्ञान देणारी शाखा नसून ती एक कला आहे. साहित्यनिर्मितीमागे विविध हेतू आणि प्रयोजने कार्यरत असतात. लेखक कोणत्या उद्देशाने साहित्य लिहितो आणि वाचक कोणत्या हेतूने साहित्य वाचतो, यावरून साहित्याची प्रयोजने लेखकनिष्ठ आणि वाचकनिष्ठ अशा दोन प्रकारांत विभागली जातात. भारतीय आणि पाश्चात्त्य साहित्यचिंतकांनी साहित्याचे आनंद, बोध, यश, अर्थप्राप्ती, व्यवहारज्ञान, उपदेश, आत्माविष्कार, जिज्ञासापूर्ती, पलायनवाद, स्वप्नरंजन, जीवनानुभूती आणि समाजप्रबोधन अशी विविध प्रयोजने सांगितली आहेत. साहित्यामुळे लेखकाला प्रसिद्धी व आर्थिक लाभ मिळतो, तर वाचकाला जीवनाचे ज्ञान, नैतिक मार्गदर्शन आणि अलौकिक आनंद प्राप्त होतो. साहित्य मानवी भावना, अनुभव आणि विचार व्यक्त करण्याचे प्रभावी माध्यम असून ते वाचकाच्या जाणिवा समृद्ध करते. तसेच वास्तव जीवनातील दुःख, संघर्ष आणि अपूर्ण इच्छांपासून मानसिक विसावा देण्याचे कार्यही साहित्य करते. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि अन्याय दूर करून मानवी मूल्यांची जपणूक व समाजप्रबोधन करण्यामध्ये साहित्य महत्त्वाची भूमिका बजावते. अशा प्रकारे साहित्य हे मानवी जीवन अधिक समृद्ध, संवेदनशील, प्रगल्भ आणि सौंदर्यपूर्ण बनवणारे प्रभावी साधन आहे.

**१.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ:**

१. ध्वनी - शब्दांच्या पलीकडे सूचित होणारा अर्थ
२. रस - काव्य वाचनातून निर्माण होणारी भावानुभूती
३. रमणीयता - वाचकाला आनंद देणारा सौंदर्यगुण
४. व्यंजना - शब्दातून सूचित होणारा अप्रत्यक्ष अर्थ
५. अभिधा - शब्दाचा सरळ किंवा मुख्य अर्थ
६. लक्षणा - मुख्य अर्थ सोडून घेतला जाणारा दुसरा अर्थ
७. वाच्यार्थ - शब्दाचा प्रत्यक्ष अर्थ
८. लक्ष्यार्थ - संदर्भानुसार सूचित होणारा अर्थ
९. व्यंग्यार्थ - शब्दांच्या पलीकडे जाणारा सूचक अर्थ
१०. काव्यात्मता - काव्याचे वैशिष्ट्यपूर्ण सौंदर्य
११. भावनाविष्कार - भावनांचे कलात्मक प्रकटीकरण
१२. उदात्तता - उच्च मूल्ये व व्यापक विचार व्यक्त करणारा गुण
१३. नादमयता - शब्दांतील लय व संगीतात्मक गुण
१४. रसप्रतीती - वाचकाच्या मनात निर्माण होणारी रसाची अनुभूती
१५. सर्जनशीलता - नवीन कल्पना व कलात्मक निर्मिती करण्याची क्षमता
१६. नवरस - काव्यातील प्रमुख नऊ रसांचे प्रकार
१७. व्यवहारज्ञान - जीवनातील लोकव्यवहार व जगण्याचे व्यावहारिक ज्ञान.
१८. उपदेश - नैतिक किंवा जीवनमार्गदर्शक शिकवण.
१९. ब्रह्मानंदसहोदर - अत्युच्च, अलौकिक आणि आध्यात्मिक आनंदासमान अनुभव.

**१.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न:**

**योग्य पर्याय निवडा.**

प्र. १. 'शब्दार्थो सहितो काव्यम' ही व्याख्या कोणी केली आहे?

अ) मम्मट

आ) आनंदवर्धन

इ) भामह

ई) विश्वनाथ

प्र.२. ‘काव्यस्य आत्मा ध्वनि’ असे कोणी म्हटले आहे?

अ) मम्मट

आ) आनंदवर्धन

इ) विश्वनाथ

ई) कोर्टहॉप

प्र.३. ‘वाक्यं रसात्मकं काव्यम्’ या व्याख्येनुसार काव्याचा आत्मा कोणता आहे?

अ) अलंकार

आ) शब्द

इ) विचार

ई) रस

प्र.४. शब्दाचा सरळ किंवा मुख्य अर्थ कोणत्या शब्दशक्तीने व्यक्त होतो?

अ) व्यंजना

आ) लक्षणा

इ) अभिधा

ई) ध्वनी

प्र.५. ‘ध्वन्यालोक’ हा ग्रंथ कोणी लिहिला?

अ) मम्मट

आ) विश्वनाथ

इ) आनंदवर्धन

ई) भामह

प्र.६. ‘तत्र विभावानुभाव्यभिचारीसंयोगाद्रसनिष्पत्ती’ हे सूत्र कोणाचे आहे?

अ) विश्वनाथ

आ) आनंदवर्धन

इ) भरतमुनी

ई) मम्मट

प्र.७. ‘कान्तासंमिततयोपदेशयुजे’ या संकल्पनेचा संबंध कोणत्या प्रयोजनाशी आहे?

अ) उपदेश

आ) आत्माविष्कार

इ) अर्थप्राप्ती

ई) पलायनवाद

प्र.८. ‘सद्यः परनिर्वृतये’ या संकल्पनेचा अर्थ काय होतो?

अ) व्यवहारज्ञान

आ) तात्काळ प्राप्त होणारा आनंद

इ) आत्माविष्कार

ई) समाजप्रबोधन

प्र.९. समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा व अन्याय दूर करण्याचे कार्य साहित्याच्या कोणत्या प्रयोजनाशी संबंधित आहे?

अ) पलायनवाद

आ) इच्छापूर्ती

इ) आत्माविष्कार

ई) समाजप्रबोधन

**१.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे**

**योग्य पर्याय निवडा.**

१) इ) भामह २) आ) आनंदवर्धन ३) ई) रस ४) इ) अभिधा ५) इ) आनंदवर्धन

६) इ) भरतमुनी ७) अ) उपदेश ८) आ) तत्काळ प्राप्त होणारा आनंद

९) ई) समाजप्रबोधन

**१.७ सरावासाठी प्रश्न**

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. प्राचीन भारतीय अभ्यासकांच्या साहित्यविषयक व्याख्या स्पष्ट करा.

२. साहित्याची प्रमुख लक्षणे स्पष्ट करा.

३. पाश्चात्त्य अभ्यासकांच्या साहित्यविषयक व्याख्या स्पष्ट करा.

४. साहित्याची प्रयोजने स्पष्ट करा.

५. साहित्याच्या ‘आनंद’ या प्रयोजनाचे महत्त्व स्पष्ट करा.

६. समाजप्रबोधनामध्ये साहित्याची भूमिका स्पष्ट करा.

**ब) लघुत्तरी प्रश्न**

१. 'ध्वनी' म्हणजे काय?

२. रस म्हणजे काय?

३. रमणीयता म्हणजे काय?

४. लेखकनिष्ठ आणि वाचकनिष्ठ प्रयोजन म्हणजे काय?

५. व्यवहारज्ञान या साहित्यप्रयोजनाचा अर्थ स्पष्ट करा.

६. आत्माविष्कार म्हणजे काय?

## १.८ संदर्भग्रंथ सूची


१. पाटणकर, वसंत २०१५ : 'साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प. आ. २००६, पुनर्मुद्रण २०१५.

२. गाडगीळ, स.रा.१९६५ : 'काव्यशास्त्रप्रदीप', दा. ना. मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प. आ. १९६५.

३. फुले, सावित्रीबाई, २०११ : 'सावित्रीबाई फुले समग्र वाङ्मय', संपा. मा. गो. माळी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई. प. आ. १९८८, पाचवी आ. २०११.

४. केशवसुत, २००७ : 'केशवसुतांची कविता', (हस्तलिखिताची यथामूल आवृत्ती), महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प. आ. १९६७, पुनर्मुद्रण २००७.

५. गोविलकर, लीला : भारतीय साहित्यविचार, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००३

६. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दूरशिक्षण केंद्र, बी. ए. भाग-३, सत्र-५, 'साहित्यविचार' अभ्यासपत्रिका.

७. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दूरशिक्षण केंद्र, बी. ए. भाग-३, 'काव्यशास्त्र', अभ्यासपत्रिका.


## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


१. कालेलकर ना. गो. (१९६४), भाषा : इतिहास आणि भूगोल, मुंबई, मौज प्रकाशन

२. पुंडे, दत्तात्रय व तावरे, स्नेहल (संपा.) : साहित्यविचार, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९५

३. जाधव, उदय : काव्यशास्त्र : आकलन आणि आस्वाद, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, २०१३

४. जोग. रा. श्री : अभिनव काव्यप्रकाश, व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७५

५. देशपांडे, ग. त्र्यं : भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, प्रा. लि. मुंबई, २०२०

६. पाटील, म. सु : भारतीयांचा साहित्यविचार, चेतश्री प्रकाशन, अमळनेर

७. जाधव, मा. मा (संपा) : अक्षरगाथा (मराठी साहित्यविचार विशेषांक) मासिक, नांदेड, एप्रिल, २०१४

## १.१०. आंतरजालावरील संदर्भ :


1. https://vishwakosh.marathi.gov.in/25695/
2. देवानंद सोनटक्के यांचा विकिपिडिया वरील 'साहित्याचे प्रयोजन' याबद्दलचा लेख.

   https://mr.wikipedia.org/wiki/%E0%-4%B8%E0%-4%BE%E0%-4%B9%E0%-4%BF%E0%-4%-4%E0%-5%8D%E0%-4%-F%E0%-4%BE%E0%-4%9-%E0%-5%87š%E0%-4%--%E0%-5%8D%E0%-4%B0%E0%-4%-F%E0%-5%8B%E0%-4%9C%E0%-4%-8


❑❑❑

# विभाग २

# साहित्यनिर्मितीची कारणे

**२.० उद्दिष्टे:**

विद्यार्थी मित्रांनो, 'साहित्यनिर्मितीची कारणे' या घटकाचे अध्ययन केल्यानंतर आपल्याला पुढील उद्देश साध्य करता येतील.

१. साहित्यनिर्मिती प्रक्रियेचे स्वरूप समजून येईल.

२. साहित्यनिर्मितीच्या धारणांचे आकलन होईल.

३. साहित्यनिर्मितीच्या विविध कारणांचा परिचय होईल.

४. प्रतिभा या साहित्य निर्मितीच्या कारणाचा विस्तृत अभ्यास करता येईल.

५. प्रतिभेस आवश्यक असणाऱ्या वैशिष्टयांचा आढावा घेता येईल.

६. साहित्यनिर्मितीत प्रतिभा या कारणाचे स्वरूप विस्ताराने समजेल.

७. साहित्यनिर्मितीत सहाय्यभूत असणाऱ्या इतर कारणांचा परिचय होईल.

**२.१ प्रास्ताविक :**

या आधीच्या घटकामध्ये आपण साहित्याचे स्वरूप, लक्षणे व त्याच्या प्रयोजनांचा विचार केला आहे. सदरील घटकात आपण साहित्य निर्मितीची प्रक्रिया आणि त्यामागील कारणांचा शोध घेणार आहोत. जगभरात निर्माण केल्या गेलेल्या प्रत्येक वस्तूमागे कारण असतेच. काव्यनिर्मितीमागेही असे कारण आहे. हे कारण एकच असेल असे नाही तर मुख्य कारण व सहाय्यक कारणामुळे त्याची निर्मिती होत असते. या निर्मितीमागील कारणांचा अभ्यास आपल्याला विद्यार्थी, अभ्यासक म्हणून करणे महत्त्वाचे ठरते. कला आणि साहित्याची निर्मिती नेमकी कशाप्रकारे घडते याबद्दल प्रत्येकाला उत्सुकता वाटत असते. यामागचे प्रमुख कारण म्हणजे कला आणि साहित्य या मानवी जीवनातील महत्त्वपूर्ण व मूल्याधिष्ठित गोष्टी मानल्या जातात. त्यामुळे अशा मौल्यवान निर्मितीची प्रक्रिया कशी असते, हे जाणून घेण्याची स्वाभाविक इच्छा निर्माण होते. याशिवाय कला किंवा साहित्यनिर्मिती ही प्रत्येकाच्या आवाक्यातील गोष्ट नसून ती केवळ प्रयत्नांवर अवलंबून नसते, हेही आपण अनुभवत असतो. त्यामुळे काही निवडक व्यक्तींना लाभलेल्या या विशेष देणगीचे स्वरूप काय आहे, याविषयी जाणून घेण्याची जिज्ञासा वाढते.कला आणि साहित्यनिर्मितीमागे कोणती प्रेरणा कार्यरत असते, तिचे स्वरूप कसे असते आणि ती नेमकी कोणत्या पद्धतीने कार्य करते, असे अनेक प्रश्न या संदर्भात उपस्थित होतात.

## २.२ विषय विवेचन:

काव्य, साहित्य निर्मितीच्या जनक कारणांचा विचार प्राचीन भारतीय व आधुनिक पाश्चात्त्य अभ्यासकांनी केलेला आहे. कवीच्या मन:पटलावरील भावना, विचार, वासना यांचे दृश्य परिणाम कवितेतून उमटत असतात. कवी शब्दसामर्थ्याच्या मदतीने ही रचना करत असतो. ही अभिव्यक्ती विशिष्ट अशा शक्तीमुळेच होते असे निश्चित सांगता नाही आले तरी कवीच्या मनातील अनेक शक्ती आणि मनोबाह्य गोष्टींच्या सहचर्यातून हे घडत असते. यामध्ये प्रतिभा ही शक्ती अत्यंत महत्त्वाची. काव्यासाठी आवश्यक असे जे घटक आहेत त्यामधील प्रतिभा, अभ्यास आणि व्युत्पत्ती यामध्ये प्रतिभा महत्त्वाची मानली गेली. लेखक, कवीचे अनुभवविश्व, ग्रहणशक्ती, विचारशक्ती, सौंदर्यदृष्टी या मनाच्या इतर शक्ती व बहुश्रुतता, अभ्यास, उत्प्रेक्षा, स्वास्थ्य या बाह्यशक्ती यांचा वाटाही महत्त्वाचा असतो. या सर्वात उच्चस्थानी प्रतिभाशक्ती येते. म्हणूनच आपण प्रतिभा या शक्तीचे स्वरूप पाहू व त्यासोबतच काव्यनिर्मितीच्या सहाय्यक कारणांचा विचारही करू.

### २.२.१. प्रतिभा : स्वरूप आणि विशेष

सामान्य जीवनात 'कल्पना' या शब्दाचा वापर प्रामुख्याने वास्तवाच्या विरुद्ध, काल्पनिक किंवा असत्य अशा अर्थाने केला जातो. उदाहरणार्थ, ही तर केवळ कल्पना आहे असे म्हटल्यास त्यातून वास्तवाशी संबंध नसलेली गोष्ट अभिप्रेत असते.'कल्पनाशक्ती'याचा नेहमीच्या व्यवहारातील अर्थ वास्तवापासून दूर नेणारी, खोटी, भ्रामक, आभासमय चित्रे निर्माण करणारी व त्याद्वारे मनाचे रंजन करणारी शक्ती असा आहे. 'प्रतिभा' या संज्ञेला मात्र असा ऋणमूल्यसूचक अर्थ नाही. ती बहुधा गौरवपर अर्थाने वापरली जाते आणि विशिष्ट संदर्भातच वापरली जाते. (वसंत पाटणकर, २००६, पृ.८२)कल्पनाशक्ती ही संज्ञा सामान्यतः नवनिर्मिती करणारी शक्ती म्हणजेच प्रतिभा या अर्थाने वापरली जाते. कला म्हणजेच कल्पनेचा आविष्कार असतो या अर्थाने कला ही अंतिमतः कल्पनानिर्मित असते. कल्पना ही एक कारकशक्ती मानली जाते.

साहित्य निर्मितीच्या मुळामध्ये प्रतिभा असते. म्हणूनच साहित्यशास्त्राच्या विचारात प्रतिभेला अनन्य साधारण महत्त्व आहे. प्रतिभाशक्ती ही एक मानसिक क्षमता असून ही शिकवून येणारी किंवा कोणत्याही प्रयत्नातून मिळत नाही. तर ती जन्मजात लाभत असते. म्हणूनच तिला 'दैवी देणगी' असे म्हटले गेले आहे. साहित्यिक आपली एक मानसिक सृष्टी आपल्या साहित्याद्वारे निर्माण करत असतो. ही सृष्टी सामान्य माणसाच्या कल्पनेपलीकडची असते. जी सामान्य वाचकाला अचंबित करत असते. म्हणूनच असामान्य, उच्च कोटीचे असे विश्व साहित्यातून उभे करण्याचे सामर्थ्य अशा प्रतिभावान साहित्यिकालाच शक्य होते. पण ही प्रतिभाशक्ती म्हणजे नेमके काय? हे स्पष्ट करणे तितकेसे सोपे नाही. एखाद्या कवीला कविता कशी सुचते? किंवा एखाद्या लेखकाला कथा, कादंबरी कशी सुचते? याचे उत्तर शोधणे म्हणजे या प्रतिभा शक्तीचा शोध घेणे आहे. संत तुकाराम, केशवसुत यासारख्या कवींनी आपल्या काव्यामध्ये या प्रतिभाशक्तीचा उल्लेख कृपाप्रसाद असा केलेला आहे. कारण या प्रतिभाशक्तीला शब्दात वर्णन करणे हे लेखकालाही शक्य नाही. म्हणूनच ही एक ईश्वरी देणगी मानण्याचा प्रघात आपल्याकडे दिसून येतो. प्राचीन व आधुनिक काळामध्ये या प्रतिभा शक्तीचे वर्णन करण्याचा प्रयत्न काही अभ्यासकांनी केलेला आहे.

काव्य निर्मितीच्या कारणांमध्ये बहुतांश अभ्यासक प्रतिभा या कारणाचा मुख्यत्वाने उल्लेख करतात. संस्कृत परंपरेमध्ये भामह, दंडी, रुद्रट, आनंदवर्धन इत्यादी अभ्यासकानी या प्रतिभेचे विश्लेषण केलेले आहे. भामह उत्कृष्ट काव्य निर्मितीसाठी प्रतिभासंपन्न कवी असावा असे मानतो; पण त्यासोबतच तो बुद्धीलाही महत्त्व देतो. म्हणूनच

तो म्हणतो की, एखादाच प्रतिभावान माणूस काव्य करू शकतो. दंडी, रुद्रट, आदी अभ्यासकांनी काव्य निर्मितीसाठी प्रतिभा महत्त्वाची असून त्यामुळे चांगले काव्य निर्माण होऊ शकते, तर तिच्या अभावी जर काव्य निर्माण झाले तर ते उपहासात्मक ठरू शकते असे मत मांडले आहे.

वामनाने मात्र त्याच्या विवेचनामध्ये प्रतिभेला गौण स्थान दिलेले आहे. त्याच्या म्हणण्यानुसार काव्य परिचय, अभ्यास यातून काव्य शक्य असते. तर राजशेखर 'शक्ती' आणि 'प्रतिभा' या दोन वेगवेगळ्या शक्ती मानतो. शक्ती हे काव्य निर्मितीचे मुख्य कारण सांगतो. त्याच्यामध्ये मनाची समाधीरूप एकाग्रता यामुळे शक्ती निर्माण होते. आणि या शक्तीमुळेच प्रतिभाकार्य शक्य होते. वामन व राजशेखर यांनी प्रतिभेला जरी गौण स्थान दिले असले तरीही प्राचीन परंपरेमध्ये बहुतांश अभ्यासकांनी प्रतिभा हे काव्य निर्मितीचे प्रमुख कारण मानलेले दिसते.

प्रतिभेचे स्वरूप स्पष्ट करताना प्रतिभा ही निसर्गदत्त व दैवी देणगी असल्याचे सांगितले गेले. दंडीने प्रतिभेचे स्वरूप स्पष्ट करताना ती 'नैसर्गिकी' व 'पूर्ववासनागुणानुबंधि'असते असे म्हटले आहे. दंडीच्या मते, प्रतिभा ही पूर्वजन्मीच्या संस्काराचा परिणाम म्हणून लाभत असते. मम्मटाने प्रतिभा ही जन्मत:च पूर्व संस्काराने निर्माण होते असे सांगितले. तर जगन्नाथाने प्रतिभा ही देवता, महापुरुष यांच्या प्रसादामुळे वा अदृष्टामुळे प्राप्त होते असे सांगितले आहे. एकूणच प्रतिभा ही जन्मजात मिळणारी देणगी आहे अशी मांडणी संस्कृत परंपरेत स्वीकारली गेली आहे. या अभ्यासकांनी सांगितलेल्या प्रतिभाशक्तीचे स्वरूप आपण इथे पाहू.

**प्रतिभेचे विशेष :**

**२.२.१.१ प्रतिभाव्यापार :**

प्रतिभा व्यापार म्हणजे प्रतिभेच्या सहाय्याने नवनिर्मिती करण्याची जी प्रक्रिया असते सर्जनशील प्रक्रिया होय. साहित्य, कलानिर्मिती प्रक्रियेमध्ये प्रतिभाव्यापार ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची मानली जाते. लेखक ज्या नजरेतून, दृष्टिकोनातून आपल्या आसपासचा भवताल, घटना, व्यक्ती न्याहाळतो, अनुभवतो त्या जशाच्या तशा साहित्यातून रेखाटतोच असे नाही. तर त्याची नाविन्यपूर्ण, कल्पकतेने किंवा रूपक व विचार सुचकतेने मांडणी करत असतो. लेखकाच्या मनातील या प्रतिभा व्यापाराबद्दल लेखकाचे मत जाणून घेता येते. कथा, कादंबरीकार मोनिका गजेंद्रगडकर यांच्या मुलाखतीमध्ये त्या याबाबत बोलताना म्हणतात, कथा कशी सुचते, हे सांगणं अवघड आहे. एखादा अनुभव भिडतो-हे जे भिडणं आहे नं, त्यात 'सर्जन' दडलेलं असतं. माझी 'रूट्स' नावाची एक कथा- एखादा शब्दही अनुभवाचे पूर्णच्या पूर्ण रूप कसे हाती ठेवतो, याचे ही कथा एक उदाहरण आहे.'रूट्स' या शब्दात असणारा मातृभूमीच्या आत्यंतिक ओढीचा जो सूक्ष्म अर्थ दडलेला आहे, तो अर्थ मनाला स्पर्शून जाता जाता माझ्या संवेदनेला एका अनुभवाचं संचितच देऊन गेला. कधी कधी अनुभव हाती येऊनही, त्याचं मूर्त रूप कथेला चकवतही राहतं. कधी अनेक घटनांचे वेगवेगळे धागे कसेही, कुठूनही एकत्र येत एक वेगळाच कोलाज घडतो. पण कधी बीज रूजूनही अंकुरत नाही.... एकूणच निर्मितीची प्रक्रिया थकवणारी असते. (मोनिका गजेंद्रगडकर, २०१०, पृ. ८)म्हणजेच सामान्य व्यक्तीवर एखाद्या घटनेचा जो आणि जसा परिणाम होतो तसाच परिणाम प्रतिभावंताच्या मनावर होत नाही. कलावंत हा अधिक संवेदनशील असल्यामुळे या घटनांचे परिणाम अत्यंत वेगळ्या अलौकिक रूपात त्याच्यावर होत असतात. म्हणूनच त्याच्या हातून असाधारण म्हणावी अशी निर्मिती होत असते. लेखकाला ही अनुभव मांडण्याची किंवा अनुभवाला नवे

परिमाण देण्याची शक्ती प्राप्त होते त्यालाच प्रतिभा म्हटले जाते. प्रतिभा व्यापारामध्ये भावना, संवेदना आणि अनुभवांचे सौंदर्यपूर्ण कलाकृतीत रूपांतर होत असते. हे रूपांतर होत असताना एक मानसिक प्रक्रिया घडत असते. ही प्रक्रिया म्हणजेच प्रतिभा व्यापार होय. लेखकाच्या किंवा एखाद्या कलाकाराच्या मनातील एखादी गूढ आणि सृजनशील अशी ही प्रक्रिया असते. इथे केवळ बुद्धीचे काम नसून त्यामध्ये भावना आणि कल्पनेचा वाटा अधिक असतो.

**२.२.१.२ अपूर्वनिर्मितीक्षमता:**

अभिनवगुप्त या प्राचीन भारतीय मीमांसकाने 'ध्वन्यालोकलोचन' नावाच्या ग्रंथामध्ये प्रतिभेची व्याख्या केलेली आहे. 'अपूर्ववस्तूनिर्माणक्षमप्रज्ञाप्रतिभा' म्हणजेच अ-पूर्व वस्तू निर्माण करणारी शक्ती होय.पूर्वी कधीही न पाहिलेली, न ऐकलेली, किंवा निर्माण न झालेली अशी कला, कलाकृती निर्माण करणारी शक्ती म्हणजे प्रतिभा होय. तर वाग्भट व हेमचंद्र यांनी 'प्रतिभा नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा' अशी व्याख्या केली आहे. म्हणजे एखाद्या वस्तूचे, घटनेचे वर्णन करताना उपलब्ध शब्द समग्रीच्या आधारे रचनेत काहीतरी नावीन्य आणू पाहणारी शक्ती म्हणजे प्रतिभा असते. हे नावीन्य सौंदर्यपूर्ण असते. 'नवनवोन्मेषशालिनी' पेक्षा 'अपूर्ववस्तूनिर्माणक्षम' ही व्याख्या अधिक बोलकी, स्पष्ट आहे. वरवर पाहता जग सारखेच आहे. पण प्रत्येकाच्या मनातील जग वेगवेगळे आहे. म्हणूनच एकाच विषयाशी निगडित असणारी प्रत्येक कवी, लेखकाची मांडणी वेगवेगळी असते. उदा. बा. भ. बोरकर (पाऊस), कुसुमाग्रज ('अखेरचा सवाल'), बालकवी ('श्रावणमास') यांच्या कवितेतून येणारा पाऊस सारखाच नाही. किंवा ग्रेस (ती गेली तेव्हा), ना. धों. महानोर ('माय') यांच्या कवितेतून व्यक्त झालेल्या आईबद्दलच्या भावना समान नाहीत. त्या सर्वस्वी भिन्न आहेत.

प्रतिभा ही एक अद्भुत मानसिक शक्ती असते. जिच्यामुळे लेखक, कवी अशा गोष्टींची निर्मिती करतो, ज्या पूर्वी कधीही अस्तित्वात नव्हत्या.प्रत्येक व्यक्तीच्या मनावर लहानपणापासून काही एक संस्कार होत असतात. काही घटनांचा प्रभाव त्याच्यावर असतो. अनेक आठवणीचे संचित त्याच्याकडे असते. त्याच्या या संचितातील त्याच्या मनाला भिडलेला भाग किंवा स्मृती ह्या स्पष्ट राहतात तर काही विस्मृतीत जातात. या स्मृतीतील इष्ट भाग निवडून त्या आधारे नव्या अनुभव कोशाची रचना कवी किंवा लेखक करत असतो. या आठवणी, स्मृती या त्याच्या संचितातील आहेत याचे भानही कित्येकदा लेखकाला किंवा कलावंताला असत नाही. पण त्याच्या मानसिक विश्वात या गोष्टींना नवे स्वरूप प्राप्त होत असते. स्मृती कोशातील जुने संस्कार नव्या रूपात प्रकट करणे हे सामान्य कार्य नाही. त्यातील अनिष्ट भाग वगळून इष्ट भागाला नवा आकार, रंग, रूप देऊन या आधी अस्तित्वात नसलेली अशी अपूर्व वस्तू निर्माण करण्याचा प्रयत्न कवी करत असतो. यालाच कल्पनेचे देणे लागते आणि म्हणूनच या शक्तीला 'अपूर्ववस्तूनिर्माणक्षम' असे म्हटले जाते. म्हणून प्रतिभा ही नवनिर्मितीक्षम, सृजनशील असते.

**२.२.१.३ प्रतिभा ही वेडाची बहीण:**

प्रतिभा शक्तीला देवी देणगी असे मानण्यापासून ते तिला वेडाची बहीण असे सांगण्यापर्यंतची विविध मतमतांतरे आपल्याला दिसतात. शेक्सपिअरने वेडा, प्रेमिक व कवी यांना प्रतिभेचे आविष्कार मानले आहेत, तर ड्रायडनने प्रतिभा व वेड यांचे जवळचे नाते असल्याचे सांगितले आहे.तर इटालियन गुन्हेगारशास्त्रज्ञ आणि फिजिओलॉजिस्टसेझेर लोंब्रोसो याच्या मते, प्रतिभा ही एक मानसिक विकृती असून ती जेव्हा प्रबल होते तेव्हाच काव्य निर्मिती होते असे सांगतो. तिचे स्वरूप वेड्यासारखे असल्याने त्यांनी तिला 'वेडाची बहीण'(Genius is

akin to madness) असे म्हटलेले आहे. प्रतिभा म्हणजे मानसिक विकृतीच होय असे त्यांच्या म्हणण्याचे सार होते. पण कोलरीज या समीक्षकाने त्याला उत्तर देताना असे म्हटले आहे की,'विक्षिप्तपणा प्रतिभावंताच्या ठिकाणी दिसतो पण त्याला मानसिक विकृती असे म्हणता येत नाही.'अलौकिक प्रतिभा असणाऱ्या व्यक्तीची विचारसरणी ही सामान्य माणसांच्या विचारांपेक्षा खूप वेगळी आणि अनाकलनीय असते. प्रतिभावान असणाऱ्या व्यक्तीकडे असे वेडे चाळे किंवा विक्षिप्तता पाहायला मिळते हे खरे असले तरी सर्वच प्रतिभावान वेडे असतात असा निष्कर्ष यावरून काढता येत नाही. प्रतिभा आणि वेडाचे साहचर्य हे क्वचितच दिसत असते. एखाद्या कलानिर्मिती वेळी कलाकार आपल्या कलेशी तद्रूप होतो. यालाच अति-एकाग्रता म्हटले जाते. आणि म्हणूनच त्याला भवतालाचे, त्यात वावरणाऱ्या व्यक्तींचे, परिस्थितीचे भान राहत नाही आणि म्हणूनच कित्येकदा त्याचे बोलणे, त्याचा व्यवहार या इतर व्यक्तींना विक्षिप्त किंवा वेडेपणासारखे वाटू शकते. याचा संबंध केवळ त्याच्या तल्लीनतेशी असतो.वेडा व प्रतिभावंताला व्यवहार शूद्र किंवा रुपये-पैशाचे विश्व रमवू शकत नाही. ते आपापल्या जगात वावरत असतात. पण या दोघांमध्ये मूलत: जो फरक असतो तो अत्यंत महत्त्वाचा आहे. वेड्याचा तोल गेलेला असतो तर प्रतिभावंताला जीवनाचा एक वेगळाच तोल सापडलेला असतो.उदा. मक्यातील जनुकांचा शोध लावणारी- अमेरिकन शास्त्रज्ञ बार्बरा मॅकक्लिंटक, स्वच्छतेचे वेड असणारे व आधुनिक विजेचे जनक मानले जाणारे टेस्ला, मोज्यांच्या छिद्रांचा खूप राग येऊन मोजे न घालणारे, जगातील सर्वात बुद्धिमान व्यक्ती- अल्बर्ट आइनस्टाईन, सकाळी उठून 'एअर बाथ' घेत, म्हणजे खिडक्या उघड्या ठेवून कपड्यांशिवाय बसून राहणारे, विजेचा शोध लावणारेबेंजामिन फ्रँकलिनअसे कितीतरी संशोधक आपल्याला तऱ्हेवाईक, विक्षिप्त वाटू शकतील. वेडा हा दुर्दैवाचा बळी मानला जातो तर कलेचे वेड किंवा प्रतिभेचे देणे असणारी व्यक्ती भाग्यवान मानली जाते. कलावंत किंवा कवी काव्यनिर्मिती ही पूर्ण शुद्धीवर असताना,विशिष्ट जाणिवेतून करत असतो. म्हणूनच ही शुद्ध किंवा जाणीव असणे अत्यंत महत्त्वाचे असते. एकूणच प्रतिभा ही सामान्यतेच्या मर्यादेपलीकडे जाणारी शक्ती असते.

### २.२.१.४ प्रतिभेचे अलौकिकत्व:

प्रतिभा या शक्तीला अलौकिक मानण्यात आले आहे. तिचे विशिष्टत्व हे आहे की ती सर्वांनाच लाभत नाही. ती फारथोड्या व्यक्तींनाच लाभते. ज्यांना ती लाभते त्यांच्यासाठी ती ईश्वरी कृपाप्रसादासारखी वाटते.

करितों कवित्व म्हणाल हें कोणी । नव्हे माझी वाणी पदरींची ।।१।।
माझिये युक्तीचा नव्हे हा प्रकार । मज विश्वंभर बोलवितो ।।ध्रु.।।
काय मी पामर जाणे अर्थभेद । वदवी गोविंद तेंचि वदें ।।२।।

-संत तुकाराम

यातून संत तुकाराम यांनी हे लेखन जाणीवपूर्वक केले नसून ती परमेश्वराची कृपा झाल्यामुळे साध्य झाले असल्याचे सांगितले गेले. अनेक संतांच्या रचनेमध्ये असा उल्लेख आढळतो. अर्वाचीन कवींनीही या शक्तीचा उल्लेख अद्भुत शक्ती असाच केला आहे. ही अद्भुत शक्तीच लेखकाचे, कवीचे वेगळेपण सिद्ध करत असते. ज्यामुळे कवीला श्रेष्टत्व प्राप्त होते. म्हणूनच या शक्तीकडे पाहण्याचा दृष्टिकोण हा दैवी, अलौकिक अशा स्वरूपाचा होतो.

पण पुढे आधुनिक काळात या शक्तीचा वास्तव पातळीवर येऊन विचार केला गेला. प्रतिभा ही शक्ती सर्वांनाच प्राप्त होत नाही म्हणून तिला दैवी मानणे चुकीचे आहे. तसेच ती ईश्वरी कृपाप्रसादही नाही. तिचे तसे स्वरूप असते तर ईश्वराची सर्वांवर कृपा झाली असती. पण असे दिसत नाही. एकाच समाज, परिसर, परिस्थितीतील सर्व व्यक्तींकडे ती दिसत नाही. ज्यांच्याकडे दिसते तिथे तिचे स्वरूप समान असत नाही. म्हणून तिला दैवी, ईश्वरी कृपाप्रसाद मानणे चुकीचे आहे. मग ही शक्ती म्हणजे नेमके काय हे स.रा.गाडगीळ स्पष्ट करतात. ते म्हणतात, प्रतिभा ही गूढ भासणारी शक्ती असली तरी ती इतर मानसिक शक्तींप्रमाणेच मानवी आहे आणि व्यासंगाची जोड मिळताच तिच्यातील सुप्त सौंदर्य प्रकट होते. (स.रा.गाडगीळ, पृष्ठ ३९)सामान्य माणसाला सामान्य वाटणाऱ्या गोष्टी प्रतिभासंपन्न व्यक्ती अत्यंत सौंदर्यपूर्ण व संवेदनशीलतेने टिपत असतो. अस्तित्वात नसलेल्या नवीन सृष्टीची निर्मिती करत असतो. म्हणजेच अलौकिक विश्व निर्मितीची चेतना अशा प्रतिभावंत व्यक्तीकडेच असते. यामुळेच प्रतिभेला असलेली अलौकिकत्वाची जोड निर्देशित होते.

### २.२.२.प्रतिभेव्यतिरिक्त काव्यनिर्मितीमागील कारणे – बहुश्रुतता, अभ्यास, भावनात्मकता

#### अ) बहुश्रुतता– (व्युत्पत्ती)

संस्कृत अभ्यासकानी प्रतिभा हे काव्य निर्मितीचे प्रमुख कारण मानले असले तरी त्यांनी बहुश्रुतता या गुणाला दृष्टीआड केलेले नाही. 'व्युत्पत्ती'या काव्यकारणाला दण्डी 'बहुश्रुतता' म्हणतो तर मम्मट त्याला 'निपुणता' असे म्हणतो. प्रतिभा म्हणजे शक्ती, श्रुत म्हणजे निपुणता आणि अभियोग म्हणजे अभ्यास या तीनही शक्ती मिळून एक काव्यकारण होते असे दण्डीचे म्हणणे आहे. म्हणजेच कवीकडे प्रतिभा असणे जितके महत्त्वाचे आहे तितकेच त्याला इतर विषयातील ज्ञान म्हणजेच तो बहुश्रुत असणे महत्त्वाचे मानले गेले आहे. दण्डीच्या या विधानाला पुष्टी देऊन हेमचंद्र आणि वाग्भट हे व्युत्पन्नता आणि अभ्यास यांचे प्रतिभेवर संस्कार होणे महत्त्वाचे असल्याचे सांगतात. बहुश्रुतता म्हणजे एखाद्या व्यक्तीला अनेक विषयांचे विस्तृत ज्ञान असणे किंवा अनेक विषयांचे ज्ञान असलेला विद्वान होय. हे ज्ञान वाचन, श्रवण व अनुभवातून प्राप्त झालेले असते. ही बहुश्रुतता वाचनाने जनसंपर्काने किंवा एखाद्या क्षेत्रातील अनुभवी अभ्यासकांशी चर्चा करूनही प्राप्त करता येते. साहित्य निर्मितीमध्ये हा घटक अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

अभ्यासाने प्राप्त झालेली विद्वत्ता ही कवित्वाला पूरक असणे गरजेचे असते. ती मारक ठरू नये याचीही काळजी घ्यावी लागते. सबंध आयुष्यभर ज्ञान घेऊन लेखन करणारा एखादा व्यक्ती परिश्रमाने पंडित होईल, पण त्या ज्ञानाने तो कवी होईलच असे मात्र सांगता येत नाही. म्हणूनच ही विद्वत्ता पूरक असणे गरजेचे असते. माणसाच्या चिकित्सक वृत्तीला शमविण्याची शक्ती एखाद्या निपुण, बहुश्रुत पंडिताकडे असू शकते. ती एखाद्या कवीकडे असू शकत नाही. पण कवी हा मानवी जीवनाचा भाष्यकार असतो आणि म्हणूनच मानवी जीवनाबद्दल त्याला जितके खोल ज्ञान असते, जितका अनुभव व्यापक असतो तितके त्याचे काव्य हे प्रत्ययकारी ठरत असते. असेच काव्य हे देश, काळाच्या सीमा ओलांडून जगभरातल्या कुठल्याही कोपऱ्यातल्या व्यक्तीच्या हृदयाला जाऊन भिडू शकते. म्हणूनच संत काव्यपरंपरेतील संत तुकारामांचे काव्य जगभर पोहोचले. त्यांनी मांडलेली मानवी जीवनातील मूल्यात्मकता ही सर्वव्यापी असल्याचे सिद्ध झाले. ज्ञान जितके सखोल असेल तितकाच लेखनातील अनुभव प्रखरपणे उमटतो. एखाद्या गोष्टीचे वर्णन कल्पनेने करणे आणि त्या गोष्टीचा अनुभव घेतल्यानंतर त्याचे वर्णन करणे यामध्ये जी तफावत असते ती या गुणामुळे येते. उदा. श्री. दा. पानवलकर यांच्या

कथातून येणारे कस्टम क्षेत्रातील अनुभव किंवा भाऊ पाध्ये यांच्या कथातून येणारे महानगरातील अनुभव हे केवळ कल्पनेतून शक्य नाहीत. तर त्याला बहुश्रुतता या गुणामुळे अधिक सखोलता प्राप्त झालेली दिसते.

**आ) अभ्यास:**

कवीला कविता लिहिण्यास प्रवृत्त करणारे घटक काव्यकारणात येतात. अभ्यास हेही त्यातील एक कारण आहे. काव्यरचनेतील अभ्यासाचे महत्त्व अधोरेखित करताना स. रा. गाडगीळ म्हणतात, रसानुकूल वृत्तरचना, समर्पक योजना, अन्वर्थक शब्दप्रयोग या बाबतीतींल कौशल्य केवळ अभ्यास आणि सराव यांमुळे प्राप्त होऊ शकते. (स. रा. गाडगीळ, पृ. ४७) म्हणजेच काव्याच्या बाह्यरचनेमध्ये जे सौंदर्य वाचकाला भावते ते 'अभ्यास' या काव्यकारणामुळे शक्य होते. हे सौंदर्य छंद, अलंकार, भाषिक प्रयोग, योग्य आकृतिबंध यांच्या योग्य निवडीतून प्राप्त होते. ही निवड 'योग्य' ठरण्यासाठी या प्रत्येक घटकाचे ज्ञान, अभ्यास असणे अगत्याचे असते. तसेच काव्यशास्त्राच्या नियमानुसार काव्य रचना करणे आणि त्यात सुधारणा करणे हेही शक्य होते. साहित्यकृतीचे अंतरंग किती चांगले आहे हे जाणून घेण्यासाठी वाचकाला साहित्यकृतीच्या बाह्यांगाद्वारेच प्रवेश करावा लागतो. अशा वेळी बाह्यांग वाचकाचे लक्ष वेधून घेणारे, चित्ताकर्षक असले तर ते अधिक प्रभावी ठरते. वामन यांच्या मते, 'अभ्यासोहि कर्मसु कौशलं' भावहिति म्हणजेच अभ्यासानेच काव्यरचनेत निपुणता प्राप्त होते. काव्यातील गुण आणि दोष हे अभ्यासामुळेच जाणता येणे शक्य आहे.

पूर्वी काव्यामध्ये सत्यसृष्टी आणि काव्यसृष्टी असे दोन काटेकोर विभाजन मानले जायचे. कोणत्या गोष्टी असाव्या व कोणत्या गोष्टी नसाव्यात याचे कटाक्षाने नियम पाळले जायचे. या नियमांची माहिती अभ्यासामुळेच होत असे. आताच्या काळात अशा संकेतांना महत्त्व नसले तरी आताच्या काव्याच्या गरजेनुसार नव्या गोष्टी शिकणे, त्यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे ठरते. उदा. एखाद्या कादंबरीकाराला ऐतिहासिक कादंबरी लिहायची असेल तर त्याला या क्षेत्रातील सूक्ष्म अभ्यास असावा लागतो. अन्यथा चुकीच्या, गैर रचनेमुळे अशा लेखनातून वादंग निर्माण होऊ शकतात. म्हणूनच प्रतिभा ही लेखकाला जन्मत: प्राप्त होत असली तरी लेखन, वाचन, भाषा व्याकरण, चिंतन, मनन या गोष्टी त्याला अभ्यासानेच मिळवाव्या लागतात. ज्या साहित्याला उणीवरहित बनण्यास महत्त्वाची भूमिका बजावतात. एकूणच प्रतिभा ही काव्यनिर्मितीची 'बीज' असली, तरी व्युत्पत्ती (ज्ञान) आणि अभ्यास (सराव) हे त्या बीजाला वटवृक्ष बनवणारे पोषक ठरत असतात.

**इ) भावनात्मकता:**

काव्यनिर्मितीस बहुश्रुतता आणि अभ्यास हे गुण जितके महत्त्वाचे आहेत तितकाच भावनात्मकता हा गुणही महत्त्वाचा आहे.काव्य हा भावनेचा आविष्कार मानला जातो. कवीच्या मनातील भावना, संवेदना, भावनांचा उद्रेक कवितेतून होत असतो. म्हणूनच Poetry is the spontaneous overflow of powerful feeling. असे वर्डस्वर्थ म्हणतो.आनंद, दु:ख, राग, लोभ, मत्सर इ. जाणवणाऱ्या भावना, अन्यायाची जाणीव, निसर्गसौंदर्य आदि तीव्र जाणिवांचे शब्दरूप कवितेद्वारे आकार घेते. हे अनुभव वैयक्तिक किंवा सामाजिक स्तरातील असतात. अत्यंत संवेदनशीलपणे अनुभवलेला भवताल, त्यासोबत कवीचे असलेले जोडलेपण कवितेतून व्यक्त होते. भावना तीव्र असते तेव्हा तिचे शब्दरूप आपोआपच लय, तालबद्ध होते. आणि असे परिणामकारक काव्य वाचकाच्या मनालाही त्या भावनेचा साक्षात्कार घडवून आणते.

ललित साहित्य हे विचार, तर्कापेक्षा भावनेवर भर देणारे असते. एखादा शास्त्रज्ञ हादेखील प्रतिभावानच असतो. पण त्याने केलेली रचना, सत्यशोधन व कवीची रचना, त्याच्या लेखनातून घेतलेला सत्यशोध यातंतफावत असते. शास्त्रज्ञाच्या शोधात केवळ बुद्धीनिष्ठतेचा,तर्कनिष्ठतेचा, तार्किक आणि तात्विक संस्काराचा संबंध असतो. तिथे भावनेला स्थान असत नाही. तर कवीच्या मांडणीत तर्कनिष्ठता असली तरी ती केवळ बुद्धीनिष्ठ असत नाही तिला भावनात्मकतेचा स्पर्श अधिक असतो. या दोघांची प्रतिभा ही मूलत: एक असली तरी त्यांच्यावर झालेले संस्कार, जगाकडे त्यांचा पाहण्याचा दृष्टिकोण, कार्यपद्धती निराळी असते.

### २.२.३. काव्यनिर्मितीची सहाय्यक अथवा गौण कारणे – उत्पेक्षा, चमत्कृती, स्वास्थ्य

**अ) उत्प्रेक्षा :**

उत्प्रेक्षा यालाच उत्प्रेक्षण असे म्हटले जाते. प्रतिभेचे हे महत्त्वाचे अंग आहे. कल्पनाशक्तीचे ते साधन मानले जाते. स.रा. गाडगीळ उत्प्रेक्षा म्हणजे कल्पनांचा स्वैरविहार असे स्पष्टीकरण देतात.(स.रा. गाडगीळ, पृ. ५०) यामध्ये स्मृतींचा फार मोठा भाग असतो. पूर्व संचितातील वस्तूंची स्वैर पुनर्रचना हेच उत्प्रेक्षेचे योग्य वर्णन असल्याचे ते सांगतात. उत्प्रेक्षण ही निर्जीव कल्पनांशी चाललेली क्रीडा असते तर कल्पनात्मक निर्मितीमध्ये चैतन्याचा मानवी अंत:करणाचा आविष्कार असल्याचे ते सांगतात. जेव्हा एखाद्या वस्तूत किंवा घटनेत दुसरी वस्तू वा घटना असल्याची कल्पना केली जाते तिथे उत्प्रेक्षा निर्माण होते. केवळ प्रतिमांची निर्जीव रचना वाचकाला किंवा रसिकाला भिडू शकत नाही. हे कार्य फक्त कल्पनात्मक निर्मितीच करू शकेल.काव्यामध्ये चमत्कृती, लालित्य आणण्यासाठी उत्प्रेक्षा सहाय्य करते व वर्णनात जिवंतपणा आणते. त्यामुळे कविता वाचकाला भावूक बनवते.

**आ) चमत्कृती:**

काव्य निर्मितीच्या इतर घटकामध्ये चमत्कृती महत्त्वाची भूमिका निभावते. काव्यनिर्मितीतील अनपेक्षित वळणे वाचकाला सुखद धक्के देत असतात. कल्पनेच्या सहाय्याने शब्दरूप व विचारातून नवनिर्मिती करून काव्याला सौंदर्यपूर्ण घाट देण्याचे कार्य चमत्कृती करते. व्यंजना, अलंकार या शब्दशक्तीच्या आधारे ही चमत्कृती साध्य केली जाते. त्यामुळे साध्या-साध्या प्रसंगांची वर्णने विलोभनीय पद्धतीने वाचकांसमोर मांडली जातात. जी वाचकाला खिळवून ठेवतात. इतकेच नाही तर भाषारचनेचे असे प्रयोग अर्थपातळी सखोल बनवतात. तसेच दोन वेगळ्याच कल्पना एकत्र करून एक नावीन्यपूर्ण अन्वर्थक अशी रचना समोर ठेवली जाते. यातून निर्माण होणारे कल्पनावैचित्र्य काव्यात चमत्कृती आणून वाचकाला आकर्षित करते. उत्कृष्ट काव्यात अशी चमत्कृती नेहमीच दिसते. या साध्या रचनेपेक्षा चमत्कृतीयुक्त रचनेमुळे होणारा परिणाम अधिक तीव्र असतो. उदा. अरुण कोलटकर यांची 'तक्ता' ही कविता. लहानपणी चौदाखडी शिकताना जो अक्षरतक्ता शिकलेला असेल. पण या तक्त्यात कोलटकरांनी घडवून आणलेली जुळणी एक विलक्षण चमत्कृती आहे.

आई बाळाला उखळात घालणार नाही
भटजी बदकाला लसणाची फोडणी देणार नाही
टरबुजाला धडकून जहाज दुभंगणार नाही
शहामृग जोपर्यंत झबलं खात नाही
तोपर्यंत क्षत्रिय पण गणपतीच्या पोटात बाण मारणार नाही

वाचनाच्या ओघात येणारे असे कल्पनावैचित्र्य, विरोधाभास, अनपेक्षित वळणे, भाषाप्रयोग, वाचकाचे कुतूहल जागृत ठेवते. म्हणूनच चमत्कृतीला प्रतिभेची सहाय्यक शक्ती म्हणून तिच्याकडे पाहिले जाते.

**इ) स्वास्थ्य (मानसिक व शारीरिक):**

काव्यामध्ये भावनेचा उत्कट आविष्कार असतो. या भावनांची कंपने मन:पटलावर होत असतात. सामान्य व्यक्तीपेक्षा एखादा लेखक, कवी हा अति-संवेदनशील मानला जातो. म्हणूनच भवताल, तिथले वातावरण, परिस्थिती यांचा व्यापक पातळीवरचा परिणाम लेखक, कवीमनावर होत असतो. जन्म-मृत्यू, सुख-दु:ख, संघर्ष, वेदना, कुटुंबकलह अशा अनेक गोष्टींचे दबाव त्यांच्या मनावर आघात करत असतात. बाह्य सृष्टी, परिस्थिती अनुकूल असल्यास तिचे लेखनास सहाय्य होतेच पण कित्येकदा सामाजिक, राजकीय, आर्थिक, धार्मिक, कौटुंबिक परिस्थिती अनुकूल नसूनही उत्तम साहित्य निर्माण झाल्याची उदाहरणे आहेत. उदा. भारत-पाकिस्तान फाळणीने संपूर्ण धार्मिक, सामाजिक जीवनात अनागोंदी माजली होती. पण याबद्दलचे गूढ चिंतन समकालीन लेखक सआदत हसन मंटो यांच्या कथातून प्रकट झाले आहे. त्या शतकातील उत्तम साहित्यकृती म्हणून त्यांच्या साहित्याकडे पाहिले जाते. म्हणूनच बाह्य सृष्टीचे आघात सामावून घेऊन त्यावर लेखकीय संस्कार होणे साहित्याला साहित्यपण बहाल करत असते. बाह्य जगातील गोष्टींचा अनुभव घेऊन त्यावर चिंतन होणे अपेक्षित असते. चिंतनातूनच नेमका आशय योग्य शब्दरूप घेऊन बाहेर पडू शकतो. यासाठी मन:स्वास्थ्य अनुकूल असणे गरजेचे असते. प्रसन्न आणि निरोगी मन कल्पनाशक्तीला अधिक धारदार बनवत असते. मनातील आनंद, दु:ख, तणाव, वैफल्य या भावनांचा निचरा होऊन काव्यातून तो प्रकटत असतो. पण या भावनांचे स्वरूप वैयक्तिक न राहत त्याचे वैश्विक रूपाशी नाते सांगू शकतो. अशा उत्कट साहित्य निर्मितीचा आनंद जसा कवी, लेखकाला असतो तशाच आनंदाची प्राप्ती आस्वादकालाही होत असते. चांगली कलाकृती वाचल्याने मिळणाऱ्या मन:शांती, आनंदाची तुलना दुसऱ्या कोणत्याही गोष्टीशी करता येत नाही. मानवी मूल्यांची मांडणी जेव्हा लेखनातून अनुभवायास मिळते तेव्हा वाचकाला त्याच्या आधारे स्वत:च्या अंतरंगात डोकावण्याची संधीही मिळते. मानसिक स्वास्थासोबतच शारीरिक स्वास्थही नितांत गरजेचे असते.म्हणूनच उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी मानसिक व शारीरिक स्वास्थ महत्त्वाचे ठरते. पण कित्येकदा शरीर व मानसिक अस्वास्थ्यातूनही चांगल्या काव्याची निर्मिती झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच शारीरिक व मानसिक स्वास्थ हे काव्यनिर्मितीत उत्पाद्य कारण नसून ते गौण स्थान मानले गेले. तरीही ते काव्यलेखनास पोषक व प्रेरणा देणारे कारण म्हणून त्याचा विचार करणे महत्त्वाचे ठरते.

### २.२.४. लेखकाचा दृष्टिकोन

काव्यनिर्मितीच्या मुख्य कारणामध्ये कवीच्या तीव्र भावना आणि त्याचा जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोण येतो. भवतालातील घटना, व्यक्ती यांच्याकडे कवी कोणत्या संवेदनशीलतेने पाहतो हे त्याने मांडलेल्या साहित्यगत अनुभवविश्वातून अधोरेखित होते. व्यक्तिगत अनुभव आणि त्याची केलेली मांडणी यातून लेखकाच्या दृष्टिकोणाचा अंदाज वाचकाला बांधता येतो.लेखक जगाकडे कसे पाहतो, त्याची मूल्ये काय आहेत यातून हा दृष्टिकोण स्पष्ट होतो. हा दृष्टिकोण त्याच्या साहित्याची भाषा, पात्रांची निर्मिती व आशय निश्चित करत असतो. उदा. मार्क्सवादी दृष्टिकोण असलेल्या लेखकाच्या लेखनात समाजाची वर्गीय रचना, गरीब-श्रीमंत हा भेद, भांडवलशाहीविरुद्धचा संघर्ष, कामगार हक्क-अधिकार आदिविषयी बोलले जाते.

कवी काव्यनिर्मिती स्वत:च्या आनंदासाठी आणि आत्मसमाधानासाठी करत असतो. अति संवेदनशीलतेमुळे दुःख, सौंदर्य, निसर्ग किंवा मानवी नातेसंबंधांमधील तीव्र अनुभवांची अनुभूती काव्यातून व्यक्त होते. या अनुभूतीमागे स्व-अस्तित्वाचा शोधही कवी घेत असतो. समाजातील अन्याय, अत्याचार, विषमता, दुःख, दारिद्र्य याची चीड कवीला येत असते. याविरुद्धचा लढा कवी आपल्या लेखनीद्वारे उभा करतो. त्याचे काव्य हे बदलाचे, विद्रोहाचे माध्यम बनते. उदा. संत तुकाराम, केशवसुत यांच्या कविता किंवा दलित कवितेचा प्रवाह. तसेच आपल्या अनुभवातून, निरीक्षणातून लाभलेल्या जीवन सत्याची, मानवी मूल्यांची, नीती व बोधपर विचार वाचकापर्यन्त पोहोचवण्याच्या दृष्टिकोनातूनही काव्यनिर्मिती होत असते. एकूणच काव्यनिर्मिती ही केवळ शब्दांची कलाकुसर नसून ती कवीच्या अंत:करणातील वेदना, आनंद, विचारांचा तो कलात्मक, सौंदर्यपूर्ण आविष्कार असतो.

## २.३ समारोप

एकूणच, प्रतिभा ही साहित्यनिर्मितीची केंद्रस्थानी असलेली अत्यंत महत्त्वाची आणि सृजनशील शक्ती आहे. लेखक किंवा कवी आपल्या अनुभवांना, भावना, संवेदना आणि कल्पनांना जेव्हा कलात्मक व सौंदर्यपूर्ण रूप देतो, तेव्हा त्या प्रक्रियेत प्रतिभेचा महत्त्वाचा सहभाग असतो. प्रतिभेमुळेच सामान्य माणसाला दिसणाऱ्या गोष्टींमध्ये कवीला विलक्षण सौंदर्य, अर्थ आणि जीवनाचे गूढ जाणवते. त्यामुळेच प्रत्येक लेखकाची अभिव्यक्ती, त्याची शैली, आशय आणि दृष्टिकोन वेगळा असतो. प्रतिभा ही केवळ नवनिर्मितीची शक्ती नसून ती अनुभवांना नव्या परिमाणांनी समृद्ध करणारी मानसिक प्रक्रिया आहे. म्हणूनच साहित्यनिर्मिती ही केवळ बुद्धीचा किंवा शब्दांचा खेळ नसून भावना, कल्पनाशक्ती, संवेदनशीलता आणि चिंतन यांच्या एकत्रित कार्यातून घडणारी सर्जनशील प्रक्रिया आहे.

तसेच प्रतिभेसोबत बहुश्रुतता, अभ्यास आणि भावनात्मकता हे घटकही साहित्यनिर्मितीसाठी तितकेच आवश्यक ठरतात. विविध विषयांचे ज्ञान, अनुभवांची व्यापकता, सातत्यपूर्ण वाचन आणि चिंतन यांमुळे लेखकाचे अनुभवविश्व अधिक समृद्ध होते. अभ्यासामुळे भाषेवर प्रभुत्व, योग्य शब्दनिवड, रचनाशैली आणि कलात्मकता साध्य होते. त्याचबरोबर भावनात्मकतेमुळे काव्याला जिवंतपणा प्राप्त होतो आणि वाचकाच्या मनाशी त्याचे भावनिक नाते निर्माण होते. उत्प्रेक्षा, चमत्कृती आणि कल्पनावैचित्र्य यांसारखे घटक साहित्याला लालित्य, आकर्षकता आणि सौंदर्य प्रदान करतात. लेखकाचा दृष्टिकोन, त्याची मूल्यव्यवस्था, समाजाबद्दलची जाणीव आणि मानवी जीवनाकडे पाहण्याची दृष्टी यामुळे साहित्य अधिक प्रभावी, जीवनस्पर्शी आणि विचारप्रवर्तक बनते.

अशा प्रकारे साहित्यनिर्मिती ही अनेक मानसिक, भावनिक आणि बौद्धिक शक्तींच्या समन्वयातून घडणारी एक अद्भुत प्रक्रिया आहे. प्रतिभा हे जरी काव्यनिर्मितीचे बीज असले तरी ज्ञान, अभ्यास, अनुभव, संवेदनशीलता आणि जीवनदृष्टी या घटकांमुळे त्या बीजाचा विशाल वटवृक्ष निर्माण होतो. म्हणूनच श्रेष्ठ साहित्यकृती ही केवळ मनोरंजन करणारी नसून ती मानवी जीवनाचे गूढ उलगडणारी, समाजाला दिशा देणारी आणि वाचकाच्या अंतर्मनाला स्पर्श करणारी ठरते. साहित्याच्या माध्यमातून कवी किंवा लेखक स्वतःच्या अनुभवांना वैश्विक रूप देतो आणि मानवी मूल्यांची जपणूक करत समाजमन समृद्ध करण्याचे कार्य करतो. त्यामुळे प्रतिभा आणि तिच्या सहाय्यक घटकांचा अभ्यास हा साहित्य समजून घेण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

### २.४ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

| | | |
|---|---|---|
| प्रतिभा | : | नवनिर्मिती करण्याची सर्जनशील मानसिक शक्ती |
| प्रतिभाव्यापार | : | भावना, अनुभव आणि कल्पनांचे कलाकृतीत रूपांतर होण्याची प्रक्रिया |
| सर्जनशीलता | : | नवीन व कल्पक निर्मिती करण्याची क्षमता |
| संवेदनशीलता | : | घटना व भावनांचा सूक्ष्म परिणाम जाणण्याची क्षमता |
| व्युत्पत्ती | : | ज्ञान, विद्वत्ता किंवा अभ्यासातून प्राप्त झालेली निपुणता |
| अभ्यास | : | सातत्यपूर्ण सराव व अध्ययन |
| भावनात्मकता | : | भावना आणि संवेदनांना महत्त्व देण्याची वृत्ती |
| उत्प्रेक्षा | : | कल्पनांचा स्वैरविहार किंवा एका वस्तूत दुसरी वस्तू असल्याची कल्पना |
| कल्पनाशक्ती | : | नवीन विचार, प्रतिमा किंवा अनुभव निर्माण करण्याची मानसिक क्षमता |
| अलौकिकत्व | : | सामान्यतेपलीकडील विलक्षण स्वरूप |
| दृष्टिकोन | : | जग, समाज किंवा जीवनाकडे पाहण्याची विशिष्ट दृष्टी |
| अनुभवविश्व | : | लेखकाच्या अनुभव, भावना आणि निरीक्षणांचा संच |
| आकृतिबंध | : | साहित्यकृतीची रचना किंवा बांधणी |
| तल्लीनता | : | एखाद्या कार्यात पूर्णपणे मग्न होण्याची अवस्था |
| काव्यकारण | : | काव्यनिर्मितीस प्रवृत्त करणारे घटक |

### २.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१. 'अपूर्ववस्तूनिर्माणक्षमप्रज्ञाप्रतिभा' ही प्रतिभेची व्याख्या कोणी केली आहे?

अ) मम्मट

आ) अभिनवगुप्त

इ) दण्डी

ई) वामन

२. Poetry is the spontaneous overflow of powerful feeling. हे विधान कोणाचे आहे?

अ) शेक्सपिअर

आ) कोलरीज

इ) वर्डस्वर्थ

ई) ड्रायडन

३. ‘प्रतिभा ही वेडाची बहीण आहे’ असे कोणी म्हटले आहे?

अ) सेझेर लोंब्रोसो

आ) वामन

इ) मम्मट

ई) तुकाराम

४. कल्पनांचा स्वैरविहार असे कोणत्या संज्ञेला म्हटले आहे?

अ) चमत्कृती

आ) उत्प्रेक्षा

इ) भावनात्मकता

ई) बहुश्रुतता

५. काव्यनिर्मितीचे ‘बीज’ कोणाला म्हटले आहे?

अ) अभ्यास

आ) बहुश्रुतता

इ) प्रतिभा

ई) स्वास्थ्य

६. लेखकाचा दृष्टिकोन कोणत्या गोष्टींमधून स्पष्ट होतो?

अ) केवळ भाषाशैलीतून

आ) केवळ कल्पनाशक्तीतून

इ) साहित्याच्या अनुभवविश्वातून

ई) केवळ अलंकारांमधून

**२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे**

१. आ) अभिनवगुप्त

२. इ) वर्डस्वर्थ

३. अ) सेझेर लोंब्रोसो

४. आ) उत्प्रेक्षा

५. इ) प्रतिभा

## २.७ सरावासाठी प्रश्न

१. प्रतिभाव्यापार म्हणजे काय? स्पष्ट करा.

२. 'प्रतिभा ही वेडाची बहीण आहे' या विधानाचे स्पष्टीकरण करा.

३. काव्यनिर्मितीत बहुश्रुततेचे महत्त्व स्पष्ट करा.

४. काव्यनिर्मितीत अभ्यासाचे महत्त्व स्पष्ट करा.

५. लेखकाचा दृष्टिकोन साहित्यनिर्मितीत कसा महत्त्वाचा ठरतो? स्पष्ट करा.

## २.८ संदर्भग्रंथ सूची:

१. डॉ. काळुंखे,रामचंद्र (संपा.) २०१०, : 'अ ते ज्ञ'(मराठी भाषा अध्यापक परिषदेचे वाङ्मयीन त्रैमासिक), लेख- मोनिका गजेंद्रगडकर यांच्याशी संवाद- सीमा मुसळे, एप्रिल-जून २०१०.

२. पाटणकर, वसंत २०१५ : 'साहित्यशास्त्र : स्वरूप आणि समस्या', पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प. आ. २००६, पुनर्मुद्रण २०१५.

३. गाडगीळ, स.रा.१९६५ : 'काव्यशास्त्रप्रदीप', दा. ना. मोघे प्रकाशन, कोल्हापूर, प. आ. १९६५.

४. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर दूरशिक्षण केंद्र, बी. ए. भाग-३, 'काव्यशास्त्र', अभ्यासपत्रिका.

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके :

१. ठाकूर अतुल, 'राजशेखराच्या काव्यमीमांसेतील प्रतिभेची संकल्पना', https://www.maayboli.com/node/58238, 4/4/2016

२. पुंडे, दत्तात्रय व तावरे, स्नेहल (संपा.) : 'साहित्यविचार', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९५

४. जोग. रा. श्री : 'अभिनव काव्यप्रकाश', व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७५

५. देशपांडे, ग. त्र्यं : 'भारतीय साहित्यशास्त्र', पॉप्युलर प्रकाशन, प्रा. लि. मुंबई, २०२०

६. गोविलकर, लीला : 'भारतीय साहित्यविचार', स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००३

❑❑❑

# विभाग १

# शब्दशक्ती

## १.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, हा घटक अभ्यासल्यानंतर आपणास ;

१) शब्दशक्तीचे स्वरूप आणि तिचे वैशिष्ट्य समजेल.

२) शब्दशक्तीच्या प्रमुख प्रकारांची माहिती मिळेल.

३) लक्षणाशक्तीचे स्वरूप आणि महत्त्व लक्षात येईल.

४) व्यंजना शक्तीचे स्वरूप, प्रकार आणि तिचे साहित्यातील महत्त्व याचे आकलन होईल..

५) शब्दशक्तीच्या विविध प्रकारांतील परस्परसंबंध लक्षात येतील.

## १.१ प्रास्ताविक

मागील घटकांमध्ये आपण पौर्वात्य, पाश्चात्य आणि आधुनिक साहित्याची प्रयोजने पाहिली. प्राचीन काळात मम्मट यांनी साहित्याची सहा प्रयोजने सांगितली आहेत. ही प्रयोजने त्या काळाच्या संदर्भात सुसंगत होती. तसेच पाश्चात्य आणि आधुनिक साहित्य प्रयोजनांची मांडणी आधुनिक विचारवंतांनी केली आहे. या सर्वांचा विचार करता, साहित्याचा आस्वाद हेच त्याचे सर्वात महत्त्वाचे प्रयोजन ठरते. साहित्यनिर्मितीची उद्दिष्टे समजून घेतल्यानंतर साहजिकच आपले लक्ष काव्यशरीराकडे वळते. काव्यशरीर समजून घेण्यासाठी शब्द आणि अर्थ यांना विशेष महत्त्व प्राप्त होते. त्यामुळे शब्दशक्ती या महत्त्वपूर्ण घटकाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

साहित्य ही शब्दांच्या माध्यमातून साकारलेली एक प्रभावी कला आहे. लेखक किंवा कवी आपल्या मनातील विचार, भावना आणि अनुभव कल्पनाशक्तीच्या साहाय्याने शब्दबद्ध करतात. ही एक सर्जनशील प्रक्रिया असून तिच्यामधून मानवी जीवनाचे आणि समाजाचे जिवंत चित्रण घडते.लीला गोविलकर यांच्या मते, साहित्यामध्ये सौंदर्याला विशेष महत्त्व असल्यामुळे त्याला लालित्य वाङ्मय असे म्हणतात. शिल्प, नृत्य, संगीत आणि चित्रकला यांसारख्या इतर कलांप्रमाणे साहित्यही एक कला आहे; मात्र ती शब्दांच्या माध्यमातून व्यक्त होत असल्याने तिला शब्दकला असे संबोधले जाते. जसे इतर कलांमधून सौंदर्याची अनुभूती मिळते, तसेच साहित्यामधूनही वाचकाला सौंदर्याचा आणि रसानुभूतीचा अनुभव प्राप्त होतो.अनेक विद्वानांनी साहित्याचे महत्त्व अधोरेखित केले आहे. पंडित जगन्नाथ यांनी 'रमणीयार्थप्रतिपादकः शब्दः' असे म्हणत रमणीय अर्थ व्यक्त करणाऱ्या शब्दांना साहित्य म्हटले आहे. भामह यांनी शब्दार्थौ सहितौ काव्यम असे सांगून शब्द आणि अर्थ यांच्या सुंदर मिलनाला काव्य मानले आहे. पाश्चात्य विचारवंत William Hazlitt यांनी साहित्याला The language of imagination and passion असे संबोधले आहे, तर William Hazlitt यांच्या मते, The best words in the best order म्हणजेच योग्य शब्दांची अचूक मांडणी हेच साहित्य होय.

यावरून स्पष्ट होते की लेखकाची शब्दनिवड, शब्दांची मांडणी आणि त्यामागील अर्थगर्भता साहित्याला जिवंतपणा आणि प्रभावीपणा प्रदान करते. म्हणूनच साहित्य समजून घेण्यासाठी शब्दशक्तीचा अभ्यास अत्यंत महत्त्वाचा आहे. प्रस्तुत घटकात आपण शब्दशक्ती म्हणजे काय, तिचे प्रमुख प्रकार कोणते, तसेच व्यंजनाशक्तीचे साहित्यातील महत्त्व आणि शब्दशक्तीच्या विविध प्रकारांतील परस्परसंबंध यांचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

**१.२ विषय विवेचन :**

भाषा शिकण्याची प्रक्रिया माणसाच्या आयुष्यात लहानपणापासून सुरू होते. लहान मूल सुरुवातीला कोणत्याही वस्तू, व्यक्ती किंवा पदार्थांची नावे जाणत नसते. त्या वेळी आई-वडील किंवा घरातील मोठी माणसे त्याला विविध वस्तू दाखवून त्यांची नावे शिकवतात. उदाहरणार्थ, आई एखादे फूल दाखवून हे फूल आहे असे सांगते. मूल त्या फुलाचा रंग, आकार, सुगंध आणि रचना लक्षात ठेवते. नंतर दुसरीकडे तसेच फूल दिसल्यास ते लगेच ओळखते की हे फूल आहे. अशा प्रकारे वस्तू आणि तिचे नाव यांच्यातील संबंध मुलाला समजू लागतो. निरीक्षण, स्मरणशक्ती आणि पुनरावृत्ती यांच्या साहाय्याने मूल शब्दांचे अर्थ आत्मसात करते आणि भाषेचा योग्य वापर करू लागते.

याचप्रमाणे साहित्य आणि विशेषतः काव्य समजून घेण्यासाठी शब्द आणि अर्थ यांचे ज्ञान अत्यंत आवश्यक असते. काव्य म्हणजे केवळ शब्दांची मांडणी नसून ती भाव, कल्पना आणि अनुभव यांची कलात्मक अभिव्यक्ती असते. काव्यात शब्द, अर्थ आणि ध्वनी या तिन्ही घटकांना विशेष महत्त्व असते. हे तिन्ही घटक एकत्र येऊन कवितेला सौंदर्य, प्रभाव आणि गहिरेपणा प्रदान करतात.

साध्या गद्यलेखनात शब्दांचा अर्थ सरळ, स्पष्ट आणि निश्चित असतो. त्याचा मुख्य उद्देश माहिती देणे किंवा विचार मांडणे हा असतो. परंतु काव्यात शब्दांचा अर्थ केवळ वरवरचा नसतो; त्यामधून सूचक, लपलेला आणि भावपूर्ण अर्थही व्यक्त होत असतो. कवी आपल्या कल्पनाशक्तीच्या आणि अनुभूतीच्या जोरावर शब्दांना विविध अर्थछटा प्रदान करतो. त्यामुळे एकाच शब्दातून अनेक भावना, कल्पना आणि विचार व्यक्त होऊ शकतात.कवितेमध्ये ध्वनीलाही तितकेच महत्त्व आहे. शब्दांची लय, ताल, यमक, अनुप्रास आणि उच्चार यांच्या साहाय्याने कविता अधिक मधुर, प्रभावी आणि आकर्षक बनते. या ध्वनीसौंदर्यामुळे कवितेतील भावना वाचकाच्या मनापर्यंत अधिक प्रभावीपणे पोहोचतात. म्हणूनच कविता वाचताना किंवा ऐकताना ती थेट मनाला स्पर्श करते.

शास्त्रीय किंवा माहितीप्रधान लेखनात अर्थ ठरलेला आणि स्पष्ट असतो; परंतु काव्यात अर्थ सूचक, बहुअर्थी आणि अधिक गूढ स्वरूपाचा असतो. त्यामुळे कविता समजून घेण्यासाठी वाचकाला विचार करावा लागतो, संदर्भ समजून घ्यावा लागतो आणि कल्पनाशक्तीचा वापर करावा लागतो. म्हणूनच एकाच कवितेचा अर्थ वेगवेगळ्या वाचकांना वेगवेगळ्या प्रकारे जाणवू शकतो. यावरून स्पष्ट होते की शब्दांना केवळ अर्थ व्यक्त करण्याची क्षमता नसून भाव, कल्पना आणि सौंदर्य व्यक्त करण्याचीही अद्भुत शक्ती असते. यालाच शब्दशक्ती असे म्हणतात. प्रस्तुत घटकात आपण शब्दशक्तीचे स्वरूप, तिचे प्रकार आणि साहित्यनिर्मितीतील तिचे महत्त्व यांचे सविस्तर विवेचन पाहणार आहोत.

### १.२.१ शब्दशक्ती म्हणजे काय?

**संकेत**

भाषा, शब्द आणि अर्थ यांचा परस्पर अत्यंत जवळचा संबंध असतो. माणूस आपल्या अनुभवांच्या आधारे विविध संकल्पना तयार करतो आणि त्या व्यक्त करण्यासाठी शब्दांचा उपयोग करतो. प्रत्येक शब्द हा एखाद्या विशिष्ट अर्थाचा संकेत असतो. शब्द आणि त्याचा अर्थ यांचा संबंध समाजमान्य असतो. जर समाजाने एखाद्या शब्दाला विशिष्ट अर्थ दिला नसता, तर त्या शब्दाचा अर्थ समजणे शक्य झाले नसते. त्यामुळे शब्दाचा अर्थ हा समाजाची मान्यता, परंपरा आणि संकेत यांवर आधारलेला असतो.

शब्द आणि अर्थ यांचे नाते समजावून सांगण्यासाठी वाचक-वाच्यभाव ही संकल्पना मांडली जाते. एखादा शब्द ऐकल्यावर आपल्या मनात त्या शब्दाशी संबंधित वस्तूची किंवा कल्पनेची प्रतिमा निर्माण होते. उदाहरणार्थ, वृक्ष हा शब्द ऐकताच आपल्या डोळ्यांसमोर झाडाची प्रतिमा उभी राहते. त्याचप्रमाणे डोंगर, नदी, रस्ता हे शब्द ऐकले असता त्या त्या वस्तूंची प्रतिमा मनात निर्माण होते. यावरून असे दिसते की शब्द (वाचक) आणि त्याचा अर्थ किंवा वस्तू (वाच्य) यांच्यात घनिष्ठ संबंध असतो.हा संबंध नैसर्गिक नसून समाजमान्य संकेतांवर आधारित असतो. म्हणूनच वेगवेगळ्या भाषांमध्ये एकाच वस्तूसाठी वेगवेगळे शब्द वापरले जातात. शब्द, त्याचा उच्चार आणि त्यातून निर्माण होणारा अर्थ या तिन्ही गोष्टी परस्पर संबंधित असतात. त्यामुळे शब्द आणि अर्थ यांचा संबंध कृत्रिम अर्थात संकेताधारित असला, तरी मानवी अनुभव, स्मरणशक्ती आणि सामाजिक परंपरा यांमुळे तो समाजात दृढपणे रुजलेला असतो.

लेखक स. रा. गाडगीळ यांनी त्यांच्या 'काव्यशास्त्रप्रदीप' या ग्रंथात संकेतार्थ व्यक्तिवाचक की जातीवाचक? हा महत्त्वपूर्ण प्रश्न उपस्थित केला आहे. म्हणजे एखादा शब्द उच्चारल्यावर तो एखाद्या विशिष्ट व्यक्तीचा बोध करतो की संपूर्ण जातीचा अथवा वर्गाचा बोध करतो, हा विचार येथे मांडला जातो.उदाहरणार्थ, घोडा हा शब्द ऐकल्यावर आपल्या मनात एखाद्या विशिष्ट घोड्याची प्रतिमा निर्माण होते का, की घोड्यांच्या संपूर्ण जातीची कल्पना येते? याबाबत विविध तत्त्वज्ञांनी भिन्न मते मांडली आहेत. काहींच्या मते शब्द व्यक्तिवाचक असतो, काहींच्या मते तो जातीवाचक असतो, तर काहींच्या मते तो व्यक्ती आणि जाती या दोन्हींचा एकत्रित बोध करून देतो. त्यामुळे हा विषय तत्त्वज्ञान आणि भाषाशास्त्र या दोन्ही दृष्टीने महत्त्वाचा मानला जातो.

**व्याकरणशास्त्रानुसार शब्दांचे चार प्रमुख प्रकार सांगितले जातात :**

१) जातीवाचक

२) गुणवाचक

३) क्रियावाचक

४) संख्यावाचक

काही शब्द जाती दर्शवतात, काही गुण, काही क्रिया तर काही संख्या दर्शवतात. एखाद्या वस्तूची किंवा व्यक्तीची ओळख तिच्या गुणधर्मांवरून आणि वैशिष्ट्यांवरूनच होत असते.यावरून स्पष्ट होते की शब्दांमध्ये केवळ एकच अर्थ व्यक्त करण्याची क्षमता नसून अनेक अर्थ व्यक्त करण्याची शक्ती असते. प्राचीन काळापासून शब्दांच्या अशा तीन प्रमुख शक्ती मान्य करण्यात आल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :

### १.३ शब्दशक्तीचे प्रकार

शब्दशक्तीचे तीन प्रमुख प्रकार आहेत :

१) अभिधा

२) लक्षणा

३) व्यंजना

### १.३.१ अ) अभिधा

अभिधा हा शब्द अभि + धा या दोन शब्दांपासून तयार झाला आहे. अभि याचा अर्थ जवळ, तर धा याचा अर्थ स्थिर असा होतो. म्हणजेच शब्दाचा उच्चार केल्याबरोबर जो अर्थ मनात लगेच आणि स्थिरपणे प्रकट होतो, त्याला अभिधा असे म्हणतात.अभिधा ही शब्दाची पहिली आणि मुख्य शक्ती मानली जाते. एखादा शब्द ऐकल्यावर किंवा वाचल्यावर त्याचा जो सरळ, थेट आणि सर्वसामान्य अर्थ आपल्या मनात येतो, त्याला वाच्यार्थ म्हणतात.शब्द आणि त्याचा अर्थ यांचा संबंध संकेताने निश्चित झालेला असतो. म्हणजे समाजाने एखाद्या शब्दाला जो अर्थ मान्य केलेला आहे, तोच अर्थ त्या शब्दातून समजतो. ही समाजमान्यता म्हणजेच संकेत होय. त्यामुळे एखादा शब्द ऐकताच त्याचा ठरलेला अर्थ लगेच लक्षात येतो.

**उदाहरणार्थ :**

झाड म्हटले की खोड, फांद्या आणि पाने असलेली वनस्पती डोळ्यांसमोर येते.

घर म्हटले की राहण्याची जागा समजते.

डोंगर म्हटले की उंच भूभाग लक्षात येतो.

मासा म्हटले की पाण्यात राहणारा प्राणी डोळ्यांसमोर उभा राहतो.

या सर्व उदाहरणांमध्ये शब्दांचा सरळ, समाजमान्य आणि संकेताने निश्चित झालेला अर्थ व्यक्त होतो. म्हणूनच – शब्दाचा समाजमान्य, संकेताने ठरलेला आणि सरळ अर्थ समजावून देणारी शब्दशक्ती म्हणजे अभिधा होय.

### १.३.१.२ अभिधेचे प्रकार

अभिधा या शब्दशक्तीचे तीन प्रमुख प्रकार सांगितले जातात. संकेताने प्राप्त होणारी अभिधा शक्ती योग, रूढी आणि योगरूढ या तीन प्रकारांत विभागली जाते. त्यानुसार वाचक शब्दांचेही तीन प्रकार मानले जातात :

१) योग (यौगिक शब्द)

२) रूढी (रूढ शब्द)

३) योगरूढ (योगरूढ शब्द)

### १.३.१.२.१ योग (यौगिक शब्द)

योग या शब्दाचा मूळ अर्थ व्युत्पत्ती असा आहे. ज्या शब्दांचा अर्थ त्यांच्या उत्पत्तीवरून किंवा त्यांच्या अवयवांच्या अर्थावरून स्पष्ट होतो, त्यांना यौगिक शब्द म्हणतात.म्हणजे एखादा शब्द वेगळा करून त्यातील

प्रत्येक भागाचा अर्थ समजून घेतल्यास, त्या सर्व भागांच्या एकत्रित अर्थावरून त्या शब्दाचा संपूर्ण अर्थ निश्चित होतो.उदाहरणार्थ, गांगेय हा शब्द गंगा या मूळ शब्दापासून तयार झाला आहे. त्याचा अर्थ गंगेचे अपत्य असा होतो. तसेच भारतीय हा शब्द भारत या शब्दाला ईय प्रत्यय लावून तयार झाला असून त्याचा अर्थ भारताशी संबंधित किंवा भारतात राहणारा असा होतो. येथे शब्दाची उत्पत्तीच त्याचा अर्थ स्पष्ट करते.याचप्रमाणे भाषेत असे अनेक शब्द आहेत जे दोन किंवा अधिक शब्दांच्या संयोगातून तयार होतात. उदाहरणार्थ :कवीसंमेलन, संपादकीय तसेच मनोवेधक या शब्दात मन म्हणजे चित्त आणि वेधक म्हणजे आकर्षित करणारे. त्यामुळे मनाला भुरळ घालणारे असा त्याचा अर्थ होतो.अनेकदा प्रत्यय, कृदंत किंवा समास यांच्या साहाय्याने असे शब्द तयार होतात. अशा शब्दांची वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे त्यांच्या उत्पत्तीवरून जो अर्थबोध होतो, तोच त्यांचा खरा आणि समर्पक अर्थ असतो. त्यामुळे यौगिक शब्द भाषेला नेमकेपणा, सौंदर्य आणि अर्थपूर्णता प्रदान करतात.

### १.३.१.२.२ रूढी (रूढ शब्द)

ज्या शब्दांचा अर्थ त्यांच्या व्याकरणिक रचनेवरून किंवा शब्दांचे भाग वेगळे करून समजत नाही, तर तो अर्थ समाजाने परंपरेने स्वीकारलेला असतो, अशा शब्दांना रूढ शब्द म्हणतात.म्हणजेच अशा शब्दांचा अर्थ समजण्यासाठी समाजातील प्रचलित वापर आणि संकेतांवर अवलंबून राहावे लागते.सोप्या भाषेत सांगायचे झाल्यास, समाजात काही वस्तू, व्यक्ती, प्राणी किंवा ठिकाणांना विशिष्ट नावे दिलेली असतात. ही नावे का दिली गेली यामागे व्याकरणशास्त्रीय कारण स्पष्ट नसते;

परंतु समाजाने ती नावे मान्य केल्यामुळे ती सर्वांना समजतात.उदाहरणार्थ :टेबल,खुर्ची ,सिंह,घोडा,आंबा या शब्दांचे भाग वेगळे करून त्यांचा अर्थ काढता येत नाही. उदाहरणार्थ, खुर्ची या शब्दाचा अर्थ बसण्याचे साधन असा होतो; परंतु या वस्तूसाठी हाच शब्द का वापरला जातो, यामागे कोणतेही स्पष्ट व्याकरणिक कारण नाही. तो अर्थ केवळ समाजमान्य संकेतांमुळे निश्चित झालेला आहे.म्हणूनच ज्या शब्दांचा अर्थ समाजमान्य परंपरेने निश्चित झालेला असतो आणि ज्यांचा अर्थ व्युत्पत्तीवरून कळत नाही, त्यांना रूढ शब्द म्हणतात.

### १.३.१.२.३ योगरूढ (योगरूढ शब्द)

काही शब्दांचे अवयव वेगळे केल्यावर त्यांचा एक सामान्य अर्थ समजतो; परंतु प्रत्यक्ष वापरात त्या शब्दाचा अर्थ रूढीमुळे एका विशिष्ट अर्थापुरता मर्यादित झालेला असतो. अशा शब्दांना योगरूढ शब्द म्हणतात.उदाहरणार्थ, पंकज हा शब्द पंक + ज असा तयार झाला आहे. याचा शब्दशः अर्थ चिखलात जन्मलेले असा होतो. या अर्थाने चिखलात निर्माण होणाऱ्या अनेक गोष्टी असू शकतात; परंतु रूढ अर्थाने पंकज म्हणजे कमळ असा विशिष्ट अर्थ घेतला जातो. त्यामुळे तो योगरूढ शब्द ठरतो.तसेच खग हा शब्द ख + ग असा तयार झाला असून त्याचा अर्थ आकाशात गमन करणारा असा होतो. या अर्थाने पक्षी, विमान, सूर्य किंवा चंद्र अशा अनेक गोष्टींचा विचार करता येतो; परंतु रूढ अर्थाने खग म्हणजे पक्षी असा निश्चित अर्थ घेतला जातो. म्हणून तोही योगरूढ शब्द आहे.यावरून स्पष्ट होते की ज्या शब्दांचा अर्थ त्यांच्या अवयवांवरून व्यापक वाटतो; पण रूढीमुळे तो एका ठरावीक अर्थापुरता मर्यादित होतो, त्यांना योगरूढ शब्द म्हणतात.

### वाचक-वाच्य संबंध

संकेतांमुळे ज्यांचा अर्थ निश्चित होतो, अशा या तिन्ही शब्दप्रकारांना वाचक शब्द असे म्हणतात. हे शब्द ज्या विशिष्ट वस्तू, व्यक्ती किंवा गोष्टीकडे निर्देश करतात, तिला वाच्य असे म्हणतात.शब्द आणि त्यातून व्यक्त

होणारा अर्थ यांच्यात जो संबंध असतो, त्याला वाचक-वाच्य संबंध असे म्हणतात.आपला दैनंदिन व्यवहार तसेच शास्त्रीय व्यवहार या वाचक-वाच्य संबंधावर आधारित असतो. परंतु काव्यात केवळ शब्दांचा सरळ अर्थ पुरेसा ठरत नाही. अधिक गूढ, सूचक आणि प्रभावी अर्थ व्यक्त करण्यासाठी लक्षणा आणि व्यंजना या शब्दशक्तींचा आधार घ्यावा लागतो.

**अभिधेचे महत्त्व**

अभिधा भाषेच्या समज आणि व्यवहारासाठी अत्यंत महत्त्वाची आहे, कारण ती शब्दांचा स्पष्ट, नेमका आणि सर्वमान्य अर्थ समजावून देते.

**अभिधेचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे :**

१) दैनंदिन व्यवहार सुलभ होतो.

२) संवाद स्पष्ट आणि गैरसमजविरहित होतो.

३) शब्दांचा मूलभूत अर्थ समजतो.

४) साहित्य, शास्त्र आणि शिक्षणाचा पाया मजबूत होतो.

५) लक्षणा आणि व्यंजना यांसारख्या पुढील शब्दशक्ती समजण्यासाठी आधार मिळतो.

एकंदरीत,अभिधा ही भाषेचा पाया आहे. शब्दाचा सरळ अर्थ समजल्याशिवाय सूचक किंवा गूढ अर्थ समजत नाही. म्हणून भाषाशास्त्र, साहित्य आणि काव्य यांच्या अभ्यासात अभिधेला विशेष महत्त्व आहे.

**१.३.२ ब) लक्षणा**

शब्दाची दुसरी शब्दशक्ती म्हणजे लक्षणा होय. एखाद्या वाक्याचा अर्थ समजून घेताना काही वेळा शब्दाचा मुख्य अर्थ (मुख्यार्थ) घेतल्यास अपेक्षित अर्थ लागत नाही. अशा वेळी मुख्यार्थ सोडून जो दुसरा अर्थ स्वीकारला जातो, त्याला लक्ष्यार्थ असे म्हणतात. या ठिकाणी लक्षणा ही शब्दशक्ती कार्यरत असते.उदाहरणार्थ, घरावरून हत्ती गेला या वाक्यात घरावरून हा शब्द मुख्यार्थाने घेतल्यास योग्य अर्थ लागत नाही. कारण प्रत्यक्षात हत्ती घराच्या छतावरून जाऊ शकत नाही. त्यामुळे येथे मुख्यार्थ सोडून घरासमोरून किंवा घराशेजारून असा अर्थ घ्यावा लागतो. हाच त्या शब्दाचा लक्ष्यार्थ होय.यावरून असे स्पष्ट होते की, जेव्हा शब्दाचा मुख्यार्थ ग्राह्य राहत नाही आणि त्याऐवजी संबंधित दुसरा अर्थ ग्रहण करावा लागतो, तेव्हा लक्षणा शब्दशक्ती कार्य करते.

**१.३.२.१ लक्ष्यार्थ समजण्यासाठी आवश्यक अटी**

लक्ष्यार्थ समजण्यासाठी पुढील तीन गोष्टी आवश्यक असतात :

**१.३.२.१.१ मुख्यार्थबाध**

प्रथम, शब्दाचा मुख्य अर्थ त्या ठिकाणी लागू पडत नाही हे लक्षात आले पाहिजे. म्हणजेच मुख्यार्थ स्वीकारल्यास अर्थबोध होत नाही किंवा तो विसंगत ठरतो.उदाहरणार्थ :घरावरून हत्ती गेला या वाक्यात घरावरून हा मुख्यार्थ अशक्य असल्यामुळे तो ग्राह्य धरला जात नाही.

### १.३.२.१.२ मुख्यार्थाशी संबंध

मुख्यार्थ सोडून जो लक्ष्यार्थ घेतला जातो, तो मूळ अर्थाशी कोणत्या ना कोणत्या प्रकारे संबंधित असला पाहिजे. हा संबंध पुढील प्रकारचा असू शकतो :

I) **साहचर्य / समीपता**

जेव्हा एखाद्या व्यक्तीचा किंवा वस्तूचा उल्लेख करून तिच्याशी संबंधित दुसरी गोष्ट अभिप्रेत असते.

उदाहरण :

मी शेक्सपिअर वाचला.

येथे प्रत्यक्षात शेक्सपिअर व्यक्तीला वाचले असे नसून त्यांच्या साहित्यकृती वाचल्या असा अर्थ अभिप्रेत आहे.

II) **सादृश्य**

जेव्हा साम्याच्या आधारे अर्थबदल होतो.उदाहरण : तू शुद्ध राक्षस आहेस.

येथे राक्षस हा शब्द प्रत्यक्ष राक्षसासाठी नसून त्या व्यक्तीच्या क्रूर स्वभावासाठी वापरला आहे.

III) **प्रयोजन (हेतू)**

लक्ष्यार्थ वापरण्यामागे वक्त्याचा किंवा लेखकाचा विशिष्ट हेतू असतो.उदाहरण :

गंगायां घोषःयाचा अर्थ गंगेवर वस्ती आहे असा होतो. येथे केवळ स्थानदर्शन नसून गंगेचे पावित्र्य आणि शीतलता सूचित करण्याचा हेतू आहे.

### १.३.२.१.३ रूढी किंवा प्रयोजन

काही वेळा विशिष्ट हेतू, उपयोग किंवा समाजातील प्रचलित वापरामुळे लक्षणेचा अर्थ तयार होतो.उदाहरणार्थ, आज आपण कुशल या शब्दाचा अर्थ चतुर, निपुण असा घेतो. हा अर्थ रूढीमुळे तयार झालेला आहे.प्राचीन काळी कुशल या शब्दाचा संबंध कुश (दर्भ) या शब्दाशी जोडला जात असे. यज्ञसंस्कृतीच्या काळात कुश तोडताना जो व्यक्ती हात न कापता ते नीटपणे तोडू शकत असे, तो अत्यंत सावध, चतुर आणि निपुण समजला जाई. त्यामुळे कुशल या शब्दाचा मूळ अर्थ त्या विशिष्ट कृतीशी संबंधित होता.

पुढे कालांतराने या शब्दाचा अर्थ व्यापक होत गेला आणि सर्वसाधारणपणे चतुर, निपुण असा अर्थ रूढ झाला. त्याचप्रमाणे चातुर्य, नैपुण्य, कौशल्य हे भाववाचक अर्थही पुढे प्रचलित झाले.

### १.३.२.२ लक्षणेचे स्वरूप

वरील विवेचनावरून असे स्पष्ट होते की लक्षणा ही शब्दशक्ती तेव्हाच कार्य करते, जेव्हा :

१) मुख्यार्थ ग्राह्य राहत नाही.

२) लक्ष्यार्थाचा मुख्यार्थाशी संबंध असतो.

३) रूढी किंवा विशिष्ट प्रयोजनामुळे अर्थबदल होतो.

थोडक्यात,मुख्यार्थ बाधित झाल्यावर मुख्यार्थाशी संबंधित दुसरा अर्थ ग्रहण करण्याची शब्दशक्ती म्हणजे लक्षणा होय. भाषेतील सूचकता, प्रभावीपणा आणि अर्थगर्भता वाढविण्यात लक्षणेचे विशेष महत्त्व आहे.

**१.३.२.३ लक्षणेचे प्रकार**

लक्षणा ही वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ यांच्यातील संबंधावर आधारित असते. एखाद्या शब्दाचा मुख्य अर्थ (वाच्यार्थ) ग्राह्य राहत नसल्यास किंवा त्या अर्थाने अपेक्षित आशय स्पष्ट होत नसल्यास, त्या शब्दाशी संबंधित दुसरा अर्थ ग्रहण केला जातो. यालाच लक्षणा असे म्हणतात.

**संस्कृत साहित्यमीमांसकांनी लक्षणेतील संबंध दोन प्रकारांनी स्पष्ट केला आहे :**

१) सादृश्यावर आधारित संबंध

२) सादृश्येतर संबंध

**या आधारे लक्षणेचे दोन मुख्य प्रकार मानले जातात :**

१) गौणी लक्षणा (सादृश्यमूलक)

२) शुद्धा लक्षणा (सादृश्येतर)

१) गौणी लक्षणा (सादृश्यमूलक)

जेव्हा दोन वस्तूंमधील साम्य किंवा सारखेपणामुळे शब्दाचा अर्थ बदलतो, तेव्हा ती गौणी लक्षणा असते. म्हणजेच, येथे गुणसाम्यावर आधारित अर्थबदल घडतो.

**१) गौणी लक्षणेचे दोन उपप्रकार आहेत :**

**अ) सारोपा गौणी लक्षणा**

- या प्रकारात दोन्ही वस्तू स्पष्टपणे समोर असतात आणि एका वस्तूचा दुसऱ्यावर आरोप केला जातो.
- उदाहरण : तिचे मुख म्हणजे चंद्रबिंब आहे.येथे मुख आणि चंद्र या दोन वस्तू स्पष्टपणे उपस्थित आहेत. रमणीच्या मुखावर चंद्राचे आरोपण करून तिचे सौंदर्य व्यक्त केले आहे. यालाच सारोपा लक्षणा म्हणतात.

**ब) साध्यवसाना गौणी लक्षणा**

- या प्रकारात मूळ वस्तूचा उल्लेख न करता थेट उपमानाचा वापर केला जातो.
- उदाहरण : हा चंद्रच भूतलावर उतरला आहे.या वाक्यात मुख हा शब्द गाळून थेट चंद्र असा उल्लेख केला आहे. येथे उपमेय (मुख) लोप पावले असून केवळ उपमानाची योजना केली आहे. म्हणून ही साध्यवसाना गौणी लक्षणा ठरते.

**२) शुद्धा लक्षणा (सादृश्येतर)**

- सादृश्याशिवाय इतर संबंधांवर आधारित लक्षणेला शुद्धा लक्षणा असे म्हणतात.या संबंधांमध्ये साहचर्य, समीपता, कार्यकारणभाव, रूढी, प्रयोजन इत्यादींचा समावेश होतो.
- उदाहरणार्थ : मी शेक्सपिअर वाचला.येथे शेक्सपिअर म्हणजे त्यांची साहित्यकृती असा अर्थ घेतला जातो.तू शुद्ध राक्षस आहेस.येथे राक्षस हा शब्द प्रत्यक्ष राक्षसासाठी नसून क्रूर स्वभाव दर्शविण्यासाठी

वापरला आहे.गंगायां घोषःयेथे गंगेवर वसलेली वस्ती असा अर्थ असून गंगेचे पावित्र्य व शीतलता सूचित केली जाते.

**शुद्धा लक्षणेचे चार प्रकार**

**अ) सारोपा शुद्धा लक्षणा**

- यामध्ये कार्यकारणभावाच्या आधारे एका गोष्टीचा दुसऱ्यावर आरोप केला जातो.
- उदाहरण : च्यवनप्राश म्हणजे साक्षात बलच होय.येथे च्यवनप्राश आणि बल यात साधर्म्य नसून च्यवनप्राश हे बलप्राप्तीचे कारण आहे.

**ब) साध्यवसाना शुद्धा लक्षणा**

- यात मुख्य शब्द गाळून फक्त परिणामाचा उल्लेख केला जातो.उदाहरण :तो साक्षात बलसेनच दिसतो.येथे च्यवनप्राश खाणारा असा अर्थ गाळून थेट परिणामरूप अर्थ घेतला आहे.

**क) उपादान लक्षणा (अजहल्लक्षणा)**

- या प्रकारात शब्दाचा मूळ अर्थ पूर्णपणे नष्ट होत नाही; तो लक्ष्यार्थाला साहाय्य करतो.म्हणजे मुख्यार्थ लक्ष्यार्थामध्ये समाविष्ट असतो.उदाहरण :पानिपतावर सव्वा लाख बांगड्या फुटल्या. येथे बांगड्या फुटणे या मुख्यार्थातून वैधव्य येणे हा लक्ष्यार्थ व्यक्त होतो. मूळ अर्थ पूर्णपणे नाहीसा झालेला नाही.

**ड) लक्षणलक्षणा (जहल्लक्षणा)**

या प्रकारात मुख्यार्थाचा पूर्णपणे त्याग करून नवीन अर्थ ग्रहण केला जातो.उदाहरण :

घरावरून हत्ती गेला.येथे घरावरून हा शब्दशः अर्थ ग्राह्य नाही. त्याऐवजी घरासमोरून हा लक्ष्यार्थ घेतला जातो. येथे मूळ अर्थ पूर्णपणे लोप पावतो.रूढी आणि प्रयोजन यांचे महत्त्वलक्षणा समजून घेताना रूढी आणि प्रयोजन या दोन गोष्टी महत्त्वाच्या ठरतात.काही अर्थ समाजातील प्रचलित वापरामुळे रूढ होतात.उदाहरणार्थ, कुशल या शब्दाचा आज अर्थ चतुर, निपुण असा घेतला जातो. प्राचीन काळी यज्ञसंस्कृतीत कुश (दर्भ) हात न कापता नीट तोडणारा मनुष्य अत्यंत सावध आणि निपुण समजला जाई. त्यामुळे कुशल या शब्दाचा मूळ अर्थ त्या विशिष्ट कृतीशी संबंधित होता. पुढे हा अर्थ व्यापक होत जाऊन सर्वसाधारण नैपुण्य या अर्थाने रूढ झाला.त्याचप्रमाणे लक्ष्यार्थाचा वापर नेहमी विशिष्ट हेतूने केला जातो.

**उदाहरणार्थ :** ती घरासमोरून गेली असे सरळ सांगण्याऐवजी ती घरावरून गेली असे म्हटल्यास भाषेला अधिक प्रभाव प्राप्त होतो.लक्षणा शब्दशक्तीचे महत्त्वलक्षणा ही लेखक आणि कवीसाठी अत्यंत महत्त्वाची शब्दशक्ती आहे, कारण ती भाषेला अर्थगर्भता, सौंदर्य आणि प्रभावीपणा प्रदान करते. उदाहरण: तिचे मुख चंद्रासारखे आहे.या वाक्यामुळे तिचे सौंदर्य अधिक प्रभावीपणे व्यक्त होते.

**१.३.२.४ लक्षणा शब्दशक्तीचे महत्त्व पुढीलप्रमाणे :**

१) भाषेत सूचकता आणि गूढता निर्माण होते.

२) कमी शब्दांत गंभीर अर्थ व्यक्त करता येतो.

३) काव्याला अलंकारिकता आणि रसपूर्णता प्राप्त होते.

४) वाचकाच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते.

५) भाषेला अधिक प्रभावी आणि कलात्मक रूप प्राप्त होते.

**थोडक्यात**

लक्षणा ही शब्दशक्ती भाषेच्या सौंदर्यात भर घालते. ती शब्दांना सूचकता आणि व्यापक अर्थ प्रदान करते. म्हणूनच लेखक आणि कवी आपल्या लेखनाला प्रभावी, कलात्मक आणि अर्थपूर्ण बनवण्यासाठी लक्षणेचा उपयोग करतात.

**१.३.३. क) व्यंजना**

शब्दशक्तीची तिसरी आणि अत्यंत महत्त्वाची शक्ती म्हणजे व्यंजना होय. स. रा. गाडगीळ यांनी त्यांच्या काव्यशास्त्रप्रदीप या ग्रंथात या शक्तीचा उल्लेख व्यंजनाव्यापार असा केला आहे.त्यांच्या मते, काव्यामध्ये शब्दार्थांना वाच्यार्थापेक्षा वेगळाच अर्थ प्राप्त होत असतो आणि काव्यसौंदर्य हे या कविव्यापारनिर्मित अर्थावर अधिष्ठित असते. मुख्यार्थाला बाध न होता शब्दोच्चाराबरोबर रसिकाच्या अंतःकरणात वाच्यार्थापेक्षा भिन्न अशा रमणीय अर्थाची जी अनेक वलये निर्माण होतात, त्यांना व्यंग्यार्थ किंवा ध्वन्यर्थ असे म्हणतात. शब्दांच्या व्यंजनाव्यापारामुळे हे कार्य घडते.अभिधेमुळे शब्दाचा मुख्यार्थ समजतो, लक्षणेमुळे लक्ष्यार्थ समजतो; परंतु या दोन्हींपलीकडे जाऊन जो सूचक, सौंदर्यपूर्ण आणि गूढ अर्थ रसिकाच्या मनात निर्माण होतो, त्याला व्यंजना असे म्हणतात.म्हणजेच, शब्दाच्या सरळ अर्थाच्या (अभिधा) किंवा संदर्भानुसार घेतलेल्या अर्थाच्या (लक्षणा) पलीकडे जाऊन जाणवणारा सूचक, रमणीय आणि भावपूर्ण अर्थ म्हणजे व्यंजना होय.

**१.३.३.१ व्यंजनाशक्तीचे स्वरूप**

काव्यात अनेकदा शब्दांचा एक प्रत्यक्ष दिसणारा अर्थ असतो; परंतु त्या शब्दांमागे कवीच्या प्रतिभेमुळे, संदर्भामुळे आणि प्रसंगामुळे आणखी एक सूक्ष्म अर्थ दडलेला असतो. हा अर्थ रसिक वाचकाच्या मनात अनुभवाच्या स्वरूपात प्रकट होतो. यालाच व्यंग्यार्थ किंवा ध्वन्यर्थ म्हणतात.अभिधा शक्तीत शब्दाचा मूळ अर्थ समजतो, तर लक्षणा शक्तीत मुख्यार्थ शक्य नसल्यास संदर्भानुसार दुसरा अर्थ घ्यावा लागतो. परंतु व्यंजनाशक्तीत मुख्यार्थाला कोणताही अडथळा येत नाही. मूळ अर्थ ग्राह्य राहतो; पण त्याचबरोबर त्यातून आणखी एक सूचक अर्थही जाणवतो.म्हणूनच असे म्हणतात की, जिथे अभिधा आणि लक्षणा यांचे कार्य संपते, तिथून व्यंजनाशक्तीचे कार्य सुरू होते.उदाहरणगंगायां घोषःया वाक्याचा सरळ अर्थ गंगेच्या काठी वस्ती आहे असा होतो. परंतु या अर्थाच्या पलीकडे गंगेचे पावित्र्य, शीतलता, प्रसन्नता आणि मंगलता हे गुणही सूचित होतात. हा अतिरिक्त आणि सौंदर्यपूर्ण अर्थ म्हणजेच व्यंग्यार्थ होय.

**व्यंजनाशक्तीची उदाहरणे खालील वाक्ये पाहा :**

१) समाजात काही कोल्हे आहेत.

२) परीक्षा जवळ आली की काही विद्यार्थ्यांचे हातपाय गळतात.

३) तो तर गावचा सिंह आहे.

४) आशेचा दिवा विझला.

या प्रत्येक वाक्याचा प्रथमदर्शनी एक शब्दशः अर्थ समजतो. परंतु प्रत्यक्षात त्या शब्दांमधून आणखी एक सूचित अर्थ व्यक्त होतो.

**अर्थस्पष्टीकरण**

१) समाजात काही कोल्हे आहेत.येथे कोल्हे हा शब्द प्रत्यक्ष प्राण्यासाठी नसून धूर्त किंवा कपटी लोकांसाठी वापरला आहे.

२) परीक्षा जवळ आली की काही विद्यार्थ्यांचे हातपाय गळतात.येथे हातपाय गळणे याचा अर्थ प्रत्यक्ष अवयव गळणे नसून घाबरणे, गोंधळणे किंवा आत्मविश्वास कमी होणे असा आहे.

३) तो तर गावचा सिंह आहे.येथे सिंह हा शब्द प्रत्यक्ष प्राण्यासाठी नसून धाडसी, पराक्रमी आणि निर्भय व्यक्तीसाठी वापरला आहे.

४) आशेचा दिवा विझला.येथे दिवा विझणे याचा शब्दशः अर्थ नसून आशा संपली, निराशा निर्माण झाली असा सूचित अर्थ आहे.

या सर्व उदाहरणांत शब्दांचा सरळ अर्थ समजतो; पण त्याचबरोबर एक अप्रत्यक्ष आणि सूचक अर्थही जाणवतो. यालाच व्यंजनाशक्ती म्हणतात.

व्यंजनेविषयी मत रा. श्री. जोग यांनी व्यंजनेविषयी म्हटले आहे : सूचितार्थ प्रकट करणारी शक्ती ती व्यंजना.सूर्य अस्ताला गेला – व्यंजनाशक्तीचे उत्कृष्ट उदाहरणसूर्य अस्ताला गेला या वाक्याचा वाच्यार्थ म्हणजे सूर्य मावळला ही नैसर्गिक घटना होय. परंतु हे वाक्य कोणत्या व्यक्तीने आणि कोणत्या संदर्भात उच्चारले आहे, यावरून त्याचे वेगवेगळे सूचित अर्थ निर्माण होतात : ब्राह्मणासाठी – संध्यावंदनाची वेळ झाली अभिसारिकेसाठी – प्रियकराला भेटण्याची वेळ झाली चोरासाठी – चोरीची संधी जवळ आलीशेतकऱ्यासाठी – शेतीचे काम थांबवून घरी जाण्याची वेळ झाली गृहिणीसाठी – दिवे लावण्याची वेळ झाली यावरून स्पष्ट होते की एकाच वाक्यातून विविध अर्थवलये निर्माण होतात. हे व्यंजनाशक्तीमुळेच शक्य होते.

### १.३.४ लक्षणा विरुद्ध व्यंजना : मम्मटाचे खंडन

मम्मट यांनी व्यंजनाशक्तीचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध केले आहे. काही शास्त्रज्ञांच्या मते सूचित अर्थ लक्षणेमुळेच समजू शकतो; परंतु मम्मट यांनी या मताचे खंडन केले आहे.उदाहरणार्थ : गंगायां घोषःयेथे गंगायां या शब्दाचा मुख्यार्थ गंगेच्या पाण्यात असा होतो. हा अर्थ अशक्य असल्यामुळे लक्षणेने गंगातटावर असा अर्थ घेतला जातो.यानंतर गंगातट या अर्थापासून पावित्र्य, शीतलता, प्रसन्नता हे गुण सूचित होतात. येथे दुसऱ्यांदा लक्षणा लागू होत नाही, कारण गंगातट हा अर्थ योग्य आहे आणि त्याला बाध आलेली नाही.म्हणून या टप्प्यावर सूचित अर्थ समजण्यासाठी व्यंजनाशक्तीच आवश्यक ठरते.

**अर्थांचे प्रकार**

शब्दांमधून पुढील प्रकारचे अर्थ प्राप्त होतात :

१) वाच्यार्थ – शब्दाचा थेट अर्थ

२) लक्ष्यार्थ – मुख्यार्थ बाधित झाल्यावर घेतला जाणारा अर्थ

३) तात्पर्यार्थ - वाक्यातील शब्दांचा परस्परसंबंध लक्षात घेऊन समजणारा अर्थ

४) ध्वन्यर्थ / व्यंग्यार्थ - सूक्ष्म, गूढ आणि भावपूर्ण अर्थ

**१.३.४ व्यंजनाशक्ती आणि सहृदयता :**

अभिनवगुप्त यांनी व्यंजनाशक्तीला अलौकिक म्हटले आहे. कारण हा अर्थ प्रत्येकाला सहज समजत नाही. तो समजण्यासाठी वाचक सहृदय, कल्पक आणि प्रतिभावान असावा लागतो.कवी जसा आपल्या प्रतिभेने शब्दांना विशेष अर्थ प्रदान करतो, तसाच वाचकाकडेही त्या अर्थाचे आकलन करण्यासाठी नवनवोन्मेषशालिनी प्रज्ञा असणे आवश्यक आहे.

I) **काव्याचा आत्मा : ध्वनी**

भारतीय साहित्यशास्त्रामध्ये काव्याचे नेमके स्वरूप काय, याचा शोध घेताना अनेक सिद्धांत मांडले गेले आहेत. त्यापैकी काव्यस्य आत्मा ध्वनिः (ध्वनी हाच काव्याचा आत्मा आहे) हे ध्वन्यालोककार आनंदवर्धन यांचे मत अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. ज्याप्रमाणे शरीराला आत्म्यामुळे जिवंतपणा प्राप्त होतो, त्याचप्रमाणे काव्यालाही ध्वनीमुळे सौंदर्य, गूढता आणि प्रभाव प्राप्त होतो. केवळ शब्द आणि त्यांचा सरळ अर्थ यांमुळे काव्य परिपूर्ण होत नाही; तर त्यावर झालेले अलंकार, रीती, वक्रोक्ती आणि विशेषतः ध्वनी यामुळे त्याला खरे काव्यत्व प्राप्त होते.

II) **व्यंग्यार्थ किंवा प्रतीयमान अर्थाचे स्वरूप**

शब्दांचा जो सरळ आणि प्रत्यक्ष अर्थ असतो, त्याला वाच्यार्थ म्हणतात. परंतु अनेकदा काव्यात शब्दांच्या या सरळ अर्थापलीकडे जाऊन आणखी एक गहिरा, सूचक आणि भावपूर्ण अर्थ जाणवतो. या अर्थाला व्यंग्यार्थ, ध्वन्यार्थ किंवा प्रतीयमान अर्थ असे म्हणतात.

याविषयी स. रा. गाडगीळ यांनी सुंदर उदाहरण दिले आहे. एखाद्या स्त्रीच्या अवयवांच्या सौंदर्यापेक्षा तिचे लावण्य जसे काहीसे वेगळे आणि मोहक असते, तसेच शब्दांच्यावाच्यार्थापलीकडे जाणवणारे अर्थवलय हे वेगळे आणि अधिक रमणीय असते.जेव्हा शब्द आणि त्यांचा मुख्य अर्थ गौण ठरून सूचित अर्थाला महत्त्व प्राप्त होते, तेव्हा त्या काव्यविशेषाला ध्वनीकाव्य म्हणतात.

III) **व्यंग्यार्थाचे प्रयोजन आणि रसप्रतीती**

कवी अनेकदा वाच्यार्थावर समाधान मानत नाही. तो आपल्या भावनांचा अधिक परिणामकारक आविष्कार करण्यासाठी व्यंग्यार्थाचा आधार घेतो. कारण काव्यातील अनेक सूक्ष्म भावना, मनःस्थिती आणि अनुभव हे सरळ शब्दांत व्यक्त करता येत नाहीत.शब्दांवर अलंकार, गुण आणि वक्रोक्ती यांचे संस्कार झाल्यावर त्यातून रसोत्पत्ती घडते. ध्वनीवादानुसार रस हा काव्याचा आत्मा आहे; परंतु हा रस वाच्यार्थातून नव्हे, तर व्यंग्यार्थातून प्रकट होतो. म्हणूनच व्यंजना शक्ती आणि ध्वनी हे काव्याचे प्राणतत्त्व मानले जाते.

IV) **व्यंजना शक्ती आणि ध्वनी सिद्धांत**

भारतीय साहित्यशास्त्रानुसार काव्यातील खरा आनंद हा शब्दांच्या वरवरच्या अर्थापेक्षा त्यांच्या सूचित अर्थात दडलेला असतो. या सूचन प्रक्रियेलाच व्यंजना व्यापार म्हणतात.

**१.३.५ व्यंजनाशक्तीचे दोन मुख्य प्रकार मानले जातात :**

१) शाब्दी व्यंजना

२) आर्थी व्यंजना

**१) शाब्दी व्यंजना**

ज्या ठिकाणी व्यंग्यार्थाचा आधार विशिष्ट शब्द असतो, तेथे शाब्दी व्यंजना असते. जर त्या शब्दाच्या जागी दुसरा समानार्थी शब्द ठेवला, तर सूचित अर्थ नष्ट होतो.

**शाब्दी व्यंजनाचे दोन प्रकार आहेत :**

**अ) अभिधामूलक व्यंजना**

यामध्ये शब्दाचे दोन मुख्य अर्थ संभवतात. संदर्भामुळे एक अर्थ निश्चित होतो; पण दुसरा अर्थही सूचित होतो.उदाहरणार्थ :मी आता मुक्याचे व्रत सोडणार नाही.येथे मुक्याचे व्रत याचा एक अर्थ मौन धारण करणे असा आहे; परंतु त्याचबरोबर दुसरा सूचित अर्थही जाणवतो. अशा प्रकारे दुहेरी अर्थनिर्मितीमुळे अभिधामूलक व्यंजना घडते.आणखी एक उदाहरण :तो बँकेत काम करतो, म्हणून त्याचा हात खूप स्वच्छ आहे.येथे स्वच्छ हात याचा सरळ अर्थ हात स्वच्छ असणे असा आहे; परंतु सूचित अर्थ प्रामाणिकपणा हा आहे.

उदाहरण :

ते शीतलोपचारी जागी झाली हळूच मग बाले ।
'औषध न लगे मजला' परसुनि जननि 'बरे' म्हणुनि डोले ।।

या नल –दमयंतीच्या स्वयंवरातील काव्यपंक्तीत औषध या शब्दाचा प्रस्तुत अर्थ औषध असा आहे; पण त्याच वेळी प्रियकराच्या भेटीतच तिच्या व्याधीचे औषध आहे, हा व्यंग्यार्थ सूचित होतो.

**ब) लक्षणामूलक व्यंजना**

जेव्हा लक्षणेने घेतलेल्या अर्थाच्या पलीकडे जाऊन आणखी एक सूक्ष्म अर्थ जाणवतो, तेव्हा लक्षणामूलक व्यंजना होते.उदाहरणार्थ :तिच्या घरावरून रेल्वे गेली. येथे घरावरून हा शब्द मुख्यार्थाने ग्राह्य नाही. म्हणून त्याचा अर्थ घराच्या जवळून असा घेतला जातो. पण जवळून ऐवजी घरावरून हा शब्दप्रयोग करून रेल्वेमार्ग आणि घरातील अत्यंत निकटता सूचित केली आहे. हा सूचित अर्थ व्यंजनेमुळे समजतो.बालकवींच्या औदुंबर मधील लक्षणामूलक व्यंजना

पायवाट पांढरी तयातून अडवी तिडवी पडे;
हिरव्या कुरणांमधून चालली काळ्या डोहाकडे
झाकळूनी जल गोड काळिमा पसरली लाटांवर
पाय टाकुनी जलात बसला असला औदुंबर.

या ओळींमध्ये पायवाट चालली किंवा औदुंबराने पाय टाकले यांचा शब्दशः अर्थ ग्राह्य नाही. येथे लक्षणेने अर्थ घ्यावा लागतो.परंतु एवढ्यावर अर्थ पूर्ण होत नाही. गोड काळिमा या शब्दप्रयोगातून शांत, प्रसन्न आणि

गूढ वातावरण व्यक्त होते. औदुंबर जणू एखाद्या स्थितप्रज्ञ, विरक्त पुरुषाचे प्रतीक वाटतो. हीच लक्षणामूलक व्यंजनाची सुंदरता आहे.सदानंद रेगे यांच्या वसंतागमी मधील उदाहरण

तव नयनीची
रानपाखरे
नाहि बोलली
तर उमगावे
मनास माझ्या
गारठलेल्या
पाने झडल्या
कसे
खोडकर
हिरवे हिरवे
छटेल फसवे
चैत्रफुलांचे
वेडे कोडे ?

या कवितेत निसर्गप्रतिमांमधून प्रेम, प्रतीक्षा आणि अंतर्मनातील सूक्ष्म भाव व्यक्त झाले आहेत. ही लक्षणामूलक व्यंजनाची उत्कृष्ट उदाहरणे आहेत.

**२) आर्थी व्यंजना**

आर्थी व्यंजनेमध्ये व्यंग्यार्थ हा एखाद्या एका शब्दावर अवलंबून नसतो; तो संपूर्ण वाक्य, प्रसंग किंवा कवितेच्या वातावरणातून निर्माण होतो.यामध्ये वाचकाला केवळ शब्दांचा सरळ अर्थ समजून घेणे पुरेसे नसते; तर त्या शब्दांतून निर्माण होणाऱ्या भावविश्वाचा अनुभव घ्यावा लागतो.उदाहरणार्थ, भा. रा. तांबे यांच्या नववधू कवितेतील ओळी :

नववधू प्रिया मी बावरते,
लाजते, पुढे सरते, फिरते.

या ओळींचा सरळ अर्थ नववधूची हालचाल असा आहे. पण त्यामधून तिच्या मनातील लज्जा, संकोच, प्रेम, आनंद आणि नवजीवनाची हुरहूर सूचित होते. हा सूचित भावार्थ म्हणजे आर्थी व्यंजना होय.

**आर्थी व्यंजना आणि तिचे प्रकार**

स. रा. गाडगीळ यांच्या मते, काव्यातील सूचित अर्थ समजण्यासाठी वाचकाला संबंधित सांस्कृतिक आणि साहित्यिक संदर्भांची ओळख असणे आवश्यक असते. याच कल्पनेवर अनेक शृंगारप्रधान आणि भक्तिपर

काव्यांची निर्मिती झालेली आहे. या संदर्भात आनंदवर्धन यांनी दिलेली उदाहरणे विशेष महत्त्वाची आहेत.कुमारसंभवातील ध्वनीचे उदाहरण

एवंवादिनि देवेषां पाश्वे पितृधोमुखी ।
लीलाकमलपत्राणि गणयामास पार्वती ।।
– कुमारसंभव

या श्लोकात अत्यंत सुंदर ध्वन्यार्थ व्यक्त झाला आहे. या प्रसंगात भगवान शंकरांकडून विवाहाची मागणी घेऊन अंगिरस ऋषी हिमालयाकडे येतात. त्या वेळी पार्वती आपल्या वडिलांच्या शेजारी उभी असते. विवाहाचा विषय निघाल्यावर ती खाली मान घालून आपल्या हातातील कमळाच्या पाकळ्या मोजू लागते.या ओळींचा सरळ अर्थ एवढाच आहे की पार्वती कमळाच्या पाकळ्या मोजत होती. परंतु इतकाच अर्थ घेतल्यास काव्याचे सौंदर्य लक्षात येत नाही. या कृतीतून तिच्या मनातील लज्जा, आनंद, संकोच, उत्सुकता आणि स्त्रीसुलभ भावविश्व सूचित होते.कवीने पार्वतीच्या भावना थेट शब्दांत व्यक्त न करता तिच्या कृतीतून त्या ध्वनित केल्या आहेत. त्यामुळे हा श्लोक रसध्वनीचे उत्कृष्ट उदाहरण मानला जातो.रामायणातील ध्वनीचे उदाहरण

नाहं जानामि केयूरे नाहं जानामि कुंडले ।
नुपुरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवन्दनात् ।।
– रामायण

हा प्रसंग असा आहे की रावणाने सीतेचे अपहरण केल्यानंतर तिने आपले अलंकार खाली टाकले. वानरांनी ते अलंकार राम–लक्ष्मणांना दाखविले. तेव्हा लक्ष्मण म्हणतो की, मी केयूर किंवा कुंडले ओळखत नाही; परंतु नुपुर मात्र ओळखतो, कारण मी नित्य त्यांच्या चरणांचे वंदन केले आहे.या वाक्याचा सरळ अर्थ केवळ दागिने न ओळखणे असा आहे. परंतु त्यातून लक्ष्मणाची सीतेबद्दलची अपार श्रद्धा, आदर आणि पवित्र दृष्टी सूचित होते.हा ध्वनीकाव्याचा अत्यंत उदात्त नमुना आहे.

**आर्थी व्यंजनेचे प्रकार**

आर्थी व्यंजनेचे तीन प्रकार सांगितले जातात :

१) वस्तुध्वनी
२) अलंकारध्वनी
३) रसध्वनी

**१) वस्तुध्वनी**

जेव्हा एखाद्या वाक्यातून केवळ एखादी वस्तू, घटना किंवा कल्पना सूचित होते, तेव्हा त्याला वस्तुध्वनी म्हणतात.उदाहरणार्थ :सूर्य अस्ताला गेला.या वाक्याचा सरळ अर्थ सूर्य मावळला असा आहे. परंतु परिस्थितीनुसार यामधून अनेक अर्थ सूचित होतात :

संध्याकाळ झाली.
दिवे लावण्याची वेळ झाली.
अभ्यासाला बसण्याची वेळ झाली.
दिवसाची कामे संपली.

हे सर्व वस्तुरूप अर्थ असल्यामुळे हे वस्तुध्वनीचे उदाहरण आहे.

**२) अलंकारध्वनी**

जेव्हा व्यंग्यार्थ एखाद्या अलंकाराच्या रूपाने व्यक्त होतो, तेव्हा अलंकारध्वनी निर्माण होते. उदाहरणार्थ, एखादा तरुण सुंदर तरुणीकडे पाहून म्हणतो : राहूकडून त्रास होण्याची भीती नाही; कलंकाचा संबंध नाही; फिकटपणा नाही; हे सुंदरी, तुझ्या मुखाची शोभा नित्य वाढत आहे.येथे चंद्राचा थेट उल्लेख नाही; परंतु राहू, कलंक, फिकटपणा या शब्दांमुळे चंद्राची आठवण होते. तरुणीच्या मुखाची तुलना चंद्राशी सूचित केली आहे. येथे व्यतिरेक अलंकार ध्वनित होतो.कुसुमाग्रज यांच्या कवितेतील उदाहरण,

समिधाच सख्या या, त्यांत कसा ओलावा।
कोठून फुलांपरि वा मकरंद मिळावा।
जात्याच रुक्ष या, एकच त्या आकांक्षा।
तव आंतरअग्नी क्षणभर तरि फुलवावा ।।

–कुसुमाग्रज

या ओळींमध्ये समिधा, ओलावा, मकरंद, आंतरअग्नी हे शब्द प्रतीकात्मक आहेत. येथे रूपक अलंकार सूचित होतो. म्हणून हे अलंकारध्वनीचे सुंदर उदाहरण आहे.

**३) रसध्वनी**

आर्थी व्यंजनेतील सर्वात श्रेष्ठ प्रकार म्हणजे रसध्वनी.जेव्हा शब्दांच्या पलीकडे जाऊन एखादा भाव किंवा रस सूचित होतो, तेव्हा रसध्वनी निर्माण होते.रसध्वनी समजण्यासाठी वाचकाजवळ संवेदनशीलता, कल्पनाशक्ती आणि सहृदयता असणे आवश्यक आहे. रसध्वनीचे उदाहरण,पार्वती कमळाच्या पाकळ्या मोजते हा प्रसंग पाहिला तर तिच्या कृतीतून : लज्जा, संकोच, आनंद, उत्सुकता हे भाव सूचित होतात. हे भाव थेट सांगितलेले नसून वाचकाला जाणवतात. हाच रसध्वनी होय.केशवसुत यांची झपूर्झा, बा. सी. मर्ढेकर यांची 'पिपात मेले ओल्या उंदीर', आणि बालकवींची 'औदुंबर' या कवितांमध्ये रसध्वनीचे उत्कृष्ट दर्शन घडते.

**१.२.८ व्यंजना शक्तीचे साहित्यातील महत्त्व**

व्यंजना शक्ती ही शब्दशक्तीतील अत्यंत प्रभावी शक्ती आहे.अभिधा शब्दाचा सरळ अर्थ सांगते.लक्षणा संदर्भानुसार दुसरा अर्थ स्पष्ट करते.परंतु व्यंजना शब्दांच्या पलीकडचा सूक्ष्म, भावपूर्ण आणि सौंदर्यपूर्ण अर्थ व्यक्त करते.म्हणूनच साहित्याच्या दृष्टीने व्यंजनाशक्तीला विशेष महत्त्व आहे.

१) साहित्याला अर्थगर्भता प्राप्त होते .व्यंजनाशक्तीमुळे एकाच वाक्यातून अनेक अर्थ उलगडतात.

उदा. : आशेचा दिवा विझला. सरळ अर्थ – दिवा विझला,सूचित अर्थ – आशा संपली

२) रसात्मकता वाढते –

व्यंजनाशक्तीमुळे वाचकाला लज्जा, प्रेम, विरह, आनंद, करुणा यांसारख्या भावांचा अनुभव येतो.

३) अल्प शब्दांत व्यापक आशय व्यक्त करता येतो

उदाहरणार्थ : नुपुरे त्वभिजानामि...या एका वाक्यातून लक्ष्मणाचा आदर, भक्ती आणि पावित्र्य व्यक्त होते.

४) वाचकाच्या कल्पनाशक्तीला चालना मिळते –

वाचक शब्दांच्या मागील भावविश्वाचा शोध घेतो. त्यामुळे साहित्याचा आस्वाद अधिक गहिरा होतो.

५) साहित्याला बहुअर्थीपणा प्राप्त होतो–

उदाहरणार्थ :सूर्य अस्ताला गेला.या साध्या वाक्यातून अनेक अर्थ सूचित होतात.

एकंदरीत,

व्यंजना शक्तीमुळे काव्याला गूढता, अर्थगर्भता आणि रसपूर्णता प्राप्त होते. वाच्यार्थ आणि लक्ष्यार्थ यांच्या पलीकडे जाऊन जी अर्थाची सूक्ष्म वलये निर्माण होतात, तीच काव्याला खरे सौंदर्य प्रदान करतात.म्हणूनच आनंदवर्धन यांनी ध्वनी हाच काव्याचा आत्मा आहे असे म्हटले आहे. व्यंजनाशक्तीमुळेच काव्यातील लपलेले सौंदर्य उलगडते आणि रसिकाला काव्याचा परिपूर्ण आनंद अनुभवता येतो.

### १.४ समारोप

शब्दशक्ती हा भारतीय काव्यशास्त्रातील अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. शब्द, अर्थ आणि समाजमान्य संकेत यांच्या परस्परसंबंधातून भाषेचा आणि साहित्याचा पाया निर्माण होतो. एखाद्या शब्दातून व्यक्त होणारा अर्थ हा केवळ त्याच्या उच्चारावर अवलंबून नसून तो समाजमान्यता, परंपरा आणि संदर्भ यांवर आधारित असतो. शब्द आणि अर्थ यांच्यातील या संबंधामुळेच मानवी व्यवहार, ज्ञानप्रक्रिया आणि साहित्यनिर्मिती शक्य होते.

शब्दशक्तीचे अभिधा, लक्षणा आणि व्यंजना हे तीन प्रमुख प्रकार मानले जातात. अभिधा ही शब्दाची मूलभूत शक्ती असून ती शब्दाचा सरळ, संकेताने निश्चित झालेला अर्थ समजावून देते. दैनंदिन व्यवहार, संवाद आणि ज्ञानसंपादन यांचा पाया अभिधेवर उभा आहे. अभिधेच्या योगिक, रूढ आणि योगरूढ या प्रकारांमुळे शब्दांच्या अर्थनिर्मितीची विविध रूपे स्पष्ट होतात.

लक्षणा ही शब्दाची दुसरी शक्ती असून मुख्यार्थ ग्राह्य न ठरल्यास संदर्भानुसार दुसरा अर्थ स्वीकारावा लागतो. मुख्यार्थबाध, मुख्यार्थाशी संबंध आणि रूढी किंवा प्रयोजन या तीन आधारांवर लक्षणा कार्य करते. भाषेला सूचकता, नेमकेपणा आणि प्रभावीपणा प्राप्त करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य लक्षणा करते. काव्यातील अनेक अलंकारिक अर्थ लक्षणेमुळेच स्पष्ट होतात.

व्यंजना ही शब्दशक्तीतील सर्वात सूक्ष्म, गूढ आणि कलात्मक शक्ती मानली जाते. अभिधा आणि लक्षणा यांच्या पलीकडे जाऊन शब्दातून जो भावपूर्ण, सौंदर्यपूर्ण आणि अप्रत्यक्ष अर्थ जाणवतो, तो व्यंजनेमुळे समजतो. याच व्यंजनाशक्तीमुळे काव्यात रस, भाव, ध्वनी आणि अर्थगर्भता निर्माण होते. म्हणूनच आनंदवर्धनांनी काव्यस्य

आत्मा ध्वनिः असे प्रतिपादन करून ध्वनीलाच काव्याचा आत्मा मानले आहे.व्यंजनाशक्तीचे शाब्दी आणि आर्थी असे प्रकार, तसेच वस्तुध्वनी, अलंकारध्वनी आणि रसध्वनी या स्वरूपांतून साहित्याचे बहुआयामी सौंदर्य व्यक्त होते. श्रेष्ठ काव्यातील गूढार्थ, भावसंपन्नता, सूचकता आणि रसात्मकता यांचे मूळ व्यंजनाशक्तीतच आहे. वाचकाच्या कल्पनाशक्तीला चालना देऊन त्याला अधिक गहन साहित्यानुभव देण्याचे सामर्थ्य व्यंजनेत आहे.

अशा प्रकारे, अभिधा भाषेचा पाया आहे, लक्षणा तिची विस्तारशक्ती आहे आणि व्यंजना तिचे सौंदर्यतत्त्व आहे. या तिन्ही शब्दशक्तींच्या समन्वयातूनच भाषा प्रभावी, साहित्य समृद्ध आणि काव्य रसपूर्ण बनते.

**१.५ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ**

१) शब्दशक्ती - शब्दातून अर्थ व्यक्त करण्याची शक्ती.

२) अभिधा - शब्दाचा सरळ, थेट आणि समाजमान्य अर्थ सांगणारी शब्दशक्ती.

३) वाच्यार्थ - शब्दाचा पहिला, मुख्य आणि सरळ अर्थ.

४) समाजमान्यता - समाजाने एखाद्या शब्दाला दिलेली मान्यता किंवा निश्चित अर्थ,सकेत शब्द आणि अर्थ यांच्यातील ठरलेला संबंध.

५) योगिक शब्द - ज्या शब्दांचा अर्थ त्यांच्या अवयवांवरून स्पष्ट होतो.

६) रूढ शब्द - ज्या शब्दांचा अर्थ परंपरेने निश्चित झालेला असतो.

७) योगरूढ शब्द - ज्या शब्दांचा व्युत्पत्तीनुसार व्यापक अर्थ असतो; पण रूढीमुळे तो एका विशिष्ट अर्थापुरता मर्यादित होतो.

८) वाचक शब्द - जे शब्द विशिष्ट वस्तू किंवा व्यक्तीकडे निर्देश करतात.

९) वाच्य - शब्द ज्याचा निर्देश करतो ती वस्तू, व्यक्ती किंवा संकल्पना.

१०) वाच्य-वाचक संबंध-शब्द आणि त्याच्या अर्थातील संबंध.

११) लक्षणा - मुख्यार्थ लागू न पडल्यास संदर्भानुसार घेतला जाणारा दुसरा अर्थ सांगणारी शब्दशक्ती.

१२) मुख्यार्थ - शब्दाचा प्राथमिक अर्थ.

१३) लक्ष्यार्थ - मुख्यार्थ सोडून घेतलेला दुसरा अर्थ.

१४) मुख्यार्थबाध - मुख्य अर्थ लागू न पडण्याची अवस्था

१५) साहचर्य - जवळचा संबंध किंवा सहअस्तित्वावर आधारित अर्थसंबंध.

१६) सादृश्य - दोन गोष्टींतील साम्य.

१७) प्रयोजन - विशिष्ट हेतू किंवा उद्देश

१८) गौणी लक्षणा - सादृश्यावर आधारित लक्षणा.

१९) सारोपा - एका वस्तूवर दुसऱ्या वस्तूचा आरोप करून अर्थ व्यक्त करणे.

२०) साध्यवसाना - उपमेय गाळून थेट उपमानाचा वापर करणे.

२१) शुद्धा लक्षणा - सादृश्येतर संबंधावर आधारित लक्षणा.

२२) उपादान लक्षणा (अजहल्लक्षणा) - मुख्यार्थ टिकून राहतो आणि लक्ष्यार्थाला मदत करतो.

२३) लक्षणलक्षणा (जहल्लक्षणा) – मुख्यार्थाचा पूर्ण त्याग करून दुसरा अर्थ घेणे.

२४) व्यंजना – सरळ अर्थाच्या पलीकडे सूचित होणारा गूढ व सौंदर्यपूर्ण अर्थ व्यक्त करणारी शब्दशक्ती.

२५) व्यंग्यार्थ – सूचित होणारा अप्रत्यक्ष अर्थ.

२६) ध्वन्यार्थ – शब्दातून प्रतीत होणारा सूचक अर्थ.

२७) ध्वनी – व्यंजनेमुळे निर्माण होणारा सूचित अर्थ.

२८) रसध्वनी– कवितेतून थेट न सांगता जाणवणाऱ्या भावना.

२९) वस्तुध्वनी – एखादी वस्तू किंवा कल्पना सूचित करणारा ध्वनी,

३०) अलंकारध्वनी – सूचित स्वरूपात अलंकार व्यक्त होणे.

३१) रस – काव्यातून मिळणारी सौंदर्यपूर्ण भावानुभूती.

**१.६ लेखक / संशोधक / साहित्यिक परिचय**

- **स. रा. गाडगीळ :** मराठीतील प्रसिद्ध साहित्यसमीक्षक व अभ्यासक, त्यांनी 'काव्यशास्त्रप्रदीप' या ग्रंथातून काव्यशास्त्रातील अभिधा, लक्षणा, व्यंजना, ध्वनी यांसारख्या संकल्पना सोप्या पद्धतीने स्पष्ट केल्या आहेत.
- **रा. श्री. जोग :** मराठी साहित्य आणि काव्यशास्त्राचे अभ्यासक, शब्दशक्ती आणि सूचितार्थ याविषयी त्यांनी महत्त्वपूर्ण विवेचन केले आहे.
- **मम्मट :** संस्कृतमधील महान काव्यशास्त्रज्ञ. त्यांचा काव्यप्रकाश हा ग्रंथ प्रसिद्ध आहे. त्यांनी अभिधा, लक्षणा आणि व्यंजना यांचे सखोल विवेचन केले.
- **आनंदवर्धन :** ध्वनी सिद्धांताचे प्रवर्तक. त्यांचा ध्वन्यालोक हा ग्रंथ अत्यंत महत्वाचा आहे. त्यांनी काव्यस्य आत्मा ध्वनिः हा सिद्धांत मांडला.
- **अभिनवगुप्त :** संस्कृत तत्वज्ञ, रससिद्धांतकार आणि ध्वनी सिद्धांताचे महत्त्वपूर्ण भाष्यकार, त्यांनी व्यंजनेला अलौकिक शक्ती मानले.
- **विल्यम शेक्सपिअर :** जगप्रसिद्ध इंग्रजी नाटककार आणि कवी. त्यांच्या नाटकांमुळे इंग्रजी साहित्य समृद्ध झाले.
- **कुसुमाग्रज :** ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी कवी, नाटककार आणि साहित्यिक, त्याची 'समिधाच सख्या' ही कविता प्रसिद्ध आहे.
- **बालकवी :** मराठीतील प्रसिद्ध निसर्गकवी. 'औदुंबर', 'फुलराणी' या कविता विशेष प्रसिद्ध आहेत.
- **केशवसुत :** आधुनिक मराठी कवितेचे जनक मानले जातात. 'झपूर्झा' ही त्यांची प्रसिद्ध कविता आहे.
- **बा. सी. मर्ढेकर :** आधुनिक मराठी कवितेचे महत्त्वाचे कवी. त्यांनी मराठी कवितेत नवे प्रयोग केले.
- **पु. ल. देशपांडे** मराठीतील लोकप्रिय विनोदी लेखक, नाटककार आणि अभिनेते.

### १.७ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

**अ) योग्य पर्याय निवडा**

१) शब्दाचा सरळ, थेट आणि समाजमान्य अर्थ समजावून देणारी शब्दशक्ती कोणती?

अ) लक्षणा ब) व्यंजना

क) अभिधा ड) रसध्वनी

२) पंकज हा कोणत्या प्रकारचा शब्द आहे?

अ) रुढ ब) योगरूढ

क) योगिक ड) वाच्य

३) घरावरून हत्ती गेला या वाक्यात कोणती शब्दशक्ती कार्य करते?

अ) अभिधा ब) लक्षणा

क) व्यंजना ड) ध्वनी

४) मुख्यार्थाला बाध आल्यावर जो दुसरा अर्थ घेतला जातो त्याला काय म्हणतात?

अ) वाच्यार्थ ब) ध्वन्यार्थ

क) लक्ष्यार्थ ड) व्यंग्यार्थ

५) तू शुद्ध राक्षस आहेस हे कोणत्या लक्षणेचे उदाहरण आहे?

अ) सादृश्यमूलक ब) उपादान

क) जहल्लक्षणा ड) रूढी

६) शब्दाचा अर्थ समाजमान्य संकेताने ठरतो, याला काय म्हणतात?

अ) वाचक ब) समाजमान्यता

क) लक्ष्यार्थ ड) प्रयोजन

७) खग हा कोणत्या प्रकारचा शब्द आहे?

अ) रूठ ब) योगिक

क) योगरूड ड) लक्षणा

८) मी शेक्सपिअर वाचला' या वाक्यात कोणता संबंध आहे?

अ) सादृश्य ब) साहचर्य

क) कार्यकारण ड) विरोध

९) शब्दशक्तीची तिसरी आणि महत्वाची शक्ती कोणती?

अ) अभिधा ब) लक्षणा

क) व्यंजना ड) वाच्यार्थ

१०) सूचितार्थ प्रकट करणारी शक्ती असे कोणत्या शक्तीला म्हणतात?

अ) अभिधा ब) लक्षणा

क) व्यंजना ड) तात्पर्य

११) काव्यस्य आत्मा ध्वनिः हे मत कोणी मांडले?

अ) मम्मट ब) आनंदवर्धन

क) अभिनवगुप्त ड) स.रा. गाडगीळ

**उत्तरे**

| | | | |
|---|---|---|---|
| १. क) अभिधा | २. ब) योगरूढ | ३. ब) लक्षणा. | ४. क) लक्ष्यार्थ |
| ५.अ) सादृश्यमूलक. | ६. ब) बसमाजमान्यता | ७. क) योगरूढ. | ८.ब) साहचर्य |
| ९. क) व्यंजना. | १०. क) व्यंजना. | ११ ब) आनंदवर्धन | |

**१.८. सरावासाठी प्रश्न:**

**अ) दीर्घोतरी प्रश्न**

१) अभिधा शब्दशक्तीचे स्वरूप स्पष्ट करून तिचे प्रकार उदाहरणांसह लिहा.

२) लक्षणा शब्दशक्ती म्हणजे काय? तिच्या कार्यासाठी आवश्यक अटी स्पष्ट करा.

३) गौणी लक्षणा आणि शुद्धा लक्षणा यांचे प्रकार उदाहरणांसह स्पष्ट करा.

४) अभिधा आणि लक्षणा या शब्दशक्तींचे महत्त्व स्पष्ट करून त्यांतील फरक लिहा.

५) काव्याचा आत्मा ध्वनी आहे या विधानाचे विवेचन करा.

६) व्यंजना शक्तीची सविस्तर माहिती उदाहरणांसह स्पष्ट करा.

**ब) लघुत्तरी प्रश्न :**

१) अभिधा म्हणजे काय?

२) लक्षणा कार्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या तीन अटी कोणत्या?

३) योगरूढ शब्द म्हणजे काय? उदाहरण दया.

४) लक्षणा भाषेला कशी उपयुक्त ठरते?

५) व्यंजना शक्ती म्हणजे काय?

६) व्यंग्यार्थ म्हणजे काय?

**१.९ क्षेत्रिय कार्य:**

१) दैनंदिन व्यवहारातील लक्ष्यार्थ व्यक्त करणारी वाक्ये शोधून त्याचे संकलन करा.

२) व्यंग्यार्थ सूचित करणाऱ्या कवितांचे उदाहरणांसह संकलन करा व त्यातील सूचित अर्थ स्पष्ट करा.

**१.१० संदर्भ ग्रंथ :**

१) गाडगीळ स.रा.: काव्यशास्त्रप्रदीप, व्हीनस प्रकाशन, पुणे

२) जोग रा.श्री.: अभिनव काव्यप्रकाश, व्हीनस प्रकाशन, पुणे

३) देशपांडे ग.त्र्यं.: भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, प्रा. लि. मुंबई

४) पुंडे, दत्तात्रेय व तावरे, स्नेहल (संपा): साहित्यविचार, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे

❑❑❑

विभाग २

# रसविचार आणि काव्यानंदाची चर्चा

## २.० उद्दिष्टे

विद्यार्थी मित्रांनो, या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास,

१. रस' ही संकल्पना तसेच रस आणि भावना यांतील परस्परसंबंध स्पष्ट होईल.

२. साहित्यातील रसनिष्पत्तीची प्रक्रिया समजेल.

३. काव्यानंदमीमांसेचे स्वरूप स्पष्ट होईल.

४. साहित्यिक व रसिकांना होणाऱ्या आनंदाचे स्वरूप समजेल.

५. करुणरसापासून येणाऱ्या प्रतीतीबाबत भारतीय आणि पाश्चात्त्य अभ्यासकांची मते जाणून घेता येतील.

## २.१ प्रास्ताविक

मागील प्रकरणात आपण शब्दशक्ती, तिचे प्रकार आणि व्यंजनाशक्तीचे साहित्यातील महत्त्व अभ्यासले. शब्दशक्तीचे विवेचन करताना पौर्वात्य आचार्यांनी 'व्यंजना' या तिसऱ्या शक्तीला काव्यामध्ये विशेष महत्त्व दिले आहे. व्यंजनाशक्तीद्वारे व्यक्त होणाऱ्या अर्थास 'व्यंग्यार्थ' किंवा 'ध्वन्यार्थ' असे म्हटले जाते. या व्यंजनाशक्तीचे स्वरूप स्पष्ट करताना त्यांनी 'आर्थी व्यंजना'चा 'रसध्वनी' हा महत्त्वाचा उपप्रकार सांगितला आहे. यावरून साहित्यनिर्मितीत रसाला अत्यंत महत्त्वाचे स्थान असल्याचे स्पष्ट होते.

साहित्यशास्त्रात रसविचाराला केंद्रस्थानी मानले जाते. काव्याचे स्वरूप स्पष्ट करताना अनेक अभ्यासकांनी रसालाच काव्याचे प्राणतत्त्व मानले आहे. विश्वनाथ यांनी 'रसात्मकं वाक्यं काव्यम' अशी काव्याची व्याख्या करून रसाला काव्याचा आत्मा मानले आहे. विविध साहित्य अभ्यासकांनी काव्यलक्षणाबाबत वेगवेगळी मते मांडली असली, तरी रसाचे महत्त्व सर्वांनी मान्य केलेले दिसते.'रस' हा शब्द 'रुचि' किंवा 'आस्वाद घेणे' या अर्थाने वापरला जातो. मात्र साहित्यशास्त्रात या संज्ञेला अधिक व्यापक अर्थ प्राप्त झाला आहे. साहित्यकृतीचा आस्वाद घेताना वाचकाच्या मनात जी आनंददायी, संवेदनशील आणि अनुकूल मानसिक अवस्था निर्माण होते, तिला रसप्रतीती असे म्हणतात. रा. श्री. जोग यांनी 'अभिनव काव्यप्रकाश' या ग्रंथात रसाचे स्वरूप स्पष्ट करताना म्हटले आहे की, रस म्हणजे चर्वणा होय; रस, आस्वाद आणि चर्वणा हे शब्द समानार्थी समजावेत. काव्यात वर्णिलेल्या भावना आपल्या चर्वणेचा विषय झाल्या की त्या रसरूप पावतात आणि त्या चर्वणेत सौख्य असते. (पृ. ८९)

रससिद्धांताची मांडणी भारतीय साहित्यशास्त्रात प्राचीन काळापासून होत आली आहे. भरतमुनी यांनी रसविषयक विचार प्रथम विस्ताराने मांडले. त्यांच्या रससिद्धांतात रस, भाव आणि अभिनय यांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. प्रारंभी रसविचार नाटकाच्या संदर्भात मांडला गेला, कारण नाट्यप्रयोगातून रसाची अनुभूती अधिक प्रभावीपणे व्यक्त होते; परंतु पुढे हा विचार काव्य आणि इतर साहित्यप्रकारांपर्यंत विस्तारला.यावरून रस

ही केवळ संकल्पना नसून साहित्यकृतीच्या सौंदर्याचे, प्रभावाचे आणि आस्वादाचे मूलभूत तत्त्व आहे, हे स्पष्ट होते. काव्य वाचकाच्या मनात रसोत्पत्ती घडवून आणते, म्हणूनच रसाला काव्याचा आत्मा असे संबोधले जाते. प्रस्तुत प्रकरणात आपण 'रस' ही संज्ञा, रससिद्धांत, रसनिष्पत्तीची प्रक्रिया आणि काव्यानंदाशी संबंधित महत्त्वपूर्ण घटकांचा अभ्यास करणार आहोत.

## २.२ विषय विवेचन

रसविचाराची सर्वप्रथम सविस्तर मांडणी भरतमुनी यांनी त्यांच्या नाट्यशास्त्र या ग्रंथात केली. या ग्रंथाच्या सहाव्या अध्यायात रसाच्या स्वरूपाचे विवेचन करण्यात आले असून सातव्या अध्यायात भाव, विभाव, अनुभाव, स्थायीभाव, सात्त्विक भाव आणि व्यभिचारी भाव यांचे स्वरूप स्पष्ट करण्यात आले आहे. भरतमुनींचा रससिद्धांत मुख्यतः नाट्यावर आधारित असून त्यांनी नाट्यप्रयोगाच्या संदर्भात रसविषयक विचार मांडले आहेत. त्यांच्या रसकल्पनेत 'काव्य' किंवा 'साहित्य' या शब्दांचा स्पष्ट उल्लेख आढळत नसला तरी नाटक हा साहित्यप्रकाराचा एक महत्त्वाचा भाग असल्यामुळे त्यांनी मांडलेला रसविचार साहित्याच्या संदर्भातही ग्राह्य धरला जातो. त्यामुळे रससिद्धांताचे महत्त्व केवळ नाट्यापुरते मर्यादित न राहता संपूर्ण साहित्यविश्वासाठी उपयुक्त ठरते.

भरतमुनींनंतर भामह, दंडी आणि वामन यांसारख्या साहित्यमीमांसकांनी काव्यातील रसाचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी नाट्यशास्त्रातील रससिद्धांत काव्याच्या संदर्भात लागू करण्याचा प्रयत्न केला आणि साध्या शब्दांना काव्यातून रसत्व कसे प्राप्त होते, याचा विचार मांडला. पुढे ध्वनिसिद्धांताचे प्रतिपादक आनंदवर्धन यांनी ध्वनीला विशेष महत्त्व दिले असले तरी रसालाही मान्यता दिली. त्यांच्या मते काव्याच्या प्रभावीतेमध्ये ध्वनी आणि रस या दोन्ही घटकांना महत्त्वाचे स्थान आहे.तसेच विश्वनाथ यांनी रसात्मकं वाक्यं काव्यम अशी काव्याची व्याख्या करून रसालाच काव्याचे केंद्रस्थान दिले आहे. यावरून भारतीय काव्यशास्त्रात रसाला अत्यंत महत्त्वाचे स्थान प्राप्त झालेले दिसते. काव्याचा खरा आस्वाद रसाच्या अनुभूतीतूनच प्राप्त होत असल्याने रससिद्धांत हा भारतीय साहित्यचिंतनाचा केंद्रबिंदू मानला जातो.रसाचे महत्त्व आणि त्याचे काव्यातील स्थान समजून घेतल्यानंतर, रसाची निर्मिती नेमकी कोणत्या प्रक्रियेतून होते, याचा विचार करणे आवश्यक ठरते; यालाच रसप्रक्रिया असे म्हणतात.ती पुढिलप्रमाणे आहे,

### २.२.१ रसप्रक्रिया

ललितसाहित्याचे खरे सामर्थ्य रसोत्पत्तीमध्ये दडलेले आहे. रसिक जेव्हा काव्य, नाटक किंवा एकूणच ललितसाहित्याचा आस्वाद घेतो, तेव्हा तो प्रत्यक्षात त्यातून व्यक्त झालेल्या भावनांचा अनुभव घेत असतो. म्हणजेच रसास्वाद ही केवळ वाचनाची प्रक्रिया नसून ती भावनांच्या जागृतीची आणि त्या अनुभूतीच्या आस्वादनाची प्रक्रिया आहे. उदाहरणार्थ, दुष्यंत आणि शकुंतला यांचे शृंगारचित्रण वाचताना रसिकाच्या मनातही तशाच प्रकारची भावनावस्था निर्माण होते. पात्रांच्या भावनांशी रसिक तादात्म्य पावतो आणि त्याच्या मनात त्या भावनांची अनुभूती जागृत होते; यालाच रसास्वाद असे म्हणतात.

काव्यवाचन किंवा ललितसाहित्याच्या वाचनामुळे रसिकाच्या मनावर होणारा परिणाम सामान्यतः भावनिक असला तरी प्रत्येक रसानुसार त्याचे स्वरूप वेगळे असते. कारण रसिकाच्या मनात विशिष्ट भावनांची जागृती होण्यासाठी साहित्यकृतीत त्या भावनांचे प्रभावी, उत्कट आणि जिवंत चित्रण असणे आवश्यक असते. साहित्यकृतीतील भावनांचे चित्रण जितके प्रभावी, तितकी रसोत्पत्ती अधिक परिणामकारक ठरते. त्यामुळे ललितसाहित्याद्वारे रसास्वाद प्राप्त करून द्यायचा असेल, तर त्या साहित्यकृतीतून व्यक्त होणारी भावनाजागृती

उत्कट आणि प्रभावी असणे आवश्यक ठरते. थोडक्यात, रस म्हणजे रसिकाच्या मनात निर्माण होणारी उत्कट भावनाजागृती होय; तसेच अशा भावनाजागृतीस समर्थ ठरणारे काव्यातील किंवा ललितसाहित्यातील वर्णनही रसाच्या संकल्पनेत अंतर्भूत होते.

भारतीय साहित्यपरंपरेतील अभ्यासकांच्या मते, जे साहित्य रसोत्पादन करण्यास समर्थ असते तेच खऱ्या अर्थाने 'सरस' साहित्य मानले जाते. रस म्हणजे एक विशिष्ट प्रकारची चित्तवृत्ती असून तिचे स्वरूप आस्वाद, चर्वणा आणि आल्हादानुभव असे आहे. हा अनुभव रसिकाच्या मनात निर्माण करण्याचे सामर्थ्य काव्य, नाटक आणि ललितसाहित्यामध्ये असते. म्हणूनच रसाला ललितसाहित्याचे मूलभूत सामर्थ्य मानले जाते.

**स्थायीभाव व रस**

भरतमुनी यांच्या 'नाट्यशास्त्र' या ग्रंथापासून 'रस' या संज्ञेला भारतीय साहित्यशास्त्रात अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. भरतमुनींनी काव्येषु नाटकं रम्यम असे म्हटले आहे. याचा अर्थ काव्यप्रकारांमध्ये नाटक हा अत्यंत रमणीय प्रकार आहे. या विधानावरून गद्य, पद्य किंवा गद्य-पद्य मिश्र स्वरूपातील सर्व साहित्य हे काव्यरूपच मानले गेले आहे. या काव्याचा आस्वाद घेताना किंवा त्यानंतर रसिकाच्या मनात जी विशिष्ट अनुभूती निर्माण होते, तिलाच रसानुभूती असे म्हणतात. कवीने काव्यात वर्णिलेली भावना रसिकांच्या मनात कशा प्रकारे संक्रमित होते आणि तिचे स्वरूप कसे असते, याचे शास्त्रीय विवेचन भरतमुनींनी केले. यालाच 'रससिद्धान्त' असे म्हणतात. रससिद्धान्त समजून घेण्यासाठी स्थायीभाव, व्यभिचारी किंवा संचारी भाव आणि अष्ट सात्त्विक भाव यांचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे.

भरतमुनींपूर्वीही रसकल्पनेचा विचार झाला होता. भरतमुनींनी स्वतः नमूद केले आहे की त्यांच्या आधी द्रहिण नावाच्या पूर्वसूरीने आठ रसांचा निर्देश केला होता. तथापि, रस आणि स्थायीभाव, संचारी भाव यांच्या साहाय्याने होणारी रसनिष्पत्ती याची सुसंगत शास्त्रीय मांडणी प्रथम भरतमुनींनीच केली. त्यांनी आठ स्थायीभाव, तेहतीस संचारी भाव आणि आठ सात्त्विक भाव अशी एकूण एकोणपन्नास भावांची योजना मांडली. कोणत्याही साहित्यकृतीत या भावांपैकी कोणत्यातरी भावाचे वर्णन आढळते.

भरतमुनींनी स्थायीभाव आणि त्यांच्याशी निगडित रस यांचे पुढीलप्रमाणे संबंध सांगितले आहेत – रति या स्थायीभावापासून शृंगार रस, उत्साहापासून वीर रस, शोकापासून करुण रस, हास्यापासून हास्य रस, क्रोधापासून रौद्र रस, भयापासून भयानक रस, विस्मयापासून अद्भुत रस, तर जुगुप्सा या स्थायीभावापासून बीभत्स रस निर्माण होतो. यावरून स्पष्ट होते की रस हा स्थायीभावाचे परिष्कृत, कलात्मक आणि आस्वाद्य रूप आहे.

व्यभिचारी किंवा संचारी भाव हे स्थायिभावाला पोषक ठरणारे अल्पकाळ टिकणारे भाव आहेत. भरतमुनींनी असे तेहतीस संचारी भाव सांगितले आहेत. त्यामध्ये ग्लानि, मद, श्रम, आलस्य, जडता, मोह, निद्रा, अपस्मार, व्याधी, उन्माद, शंका, अमर्ष, त्रास, गर्व, औत्सुक्य, दैन्य, विषाद, हर्ष, धृती, चिंता, निर्वेद, ब्रीडा, असूया, चपलता, आवेग, उग्रता, मती, वितर्क, अवहित्थ, स्मृती इत्यादींचा समावेश होतो. हे भाव स्वतंत्रपणे रस निर्माण करत नाहीत; ते स्थायिभावाभोवती फिरून त्याला अधिक प्रभावी बनवतात.

अष्ट सात्त्विक भावांनाही रसप्रक्रियेत विशेष स्थान आहे. हे भाव म्हणजे स्वेद (घाम येणे), स्तंभ (शरीर ताठ होणे), कंप (थरथरणे), रोमांच (अंगावर काटा येणे), स्वरभेद (आवाजात बदल होणे), वैवर्ण्य (चेहऱ्याचा रंग बदलणे), अश्रू (डोळ्यात पाणी येणे) आणि प्रलय (मूर्च्छा येणे). हे भाव मनाच्या तीव्र अवस्थेत आपोआप प्रकट होतात. नाटकात नटाच्या अभिनयातून हे भाव व्यक्त होतात. त्यामुळे हे नाट्यगत अनुभूतीचे अत्यंत प्रभावी लक्षण मानले जाते.

**स्थायी, व्यभिचारी व सात्त्विक भावांचे स्वरूप**

स्थायीभाव म्हणजे मूलभूत, उपजत आणि दीर्घकाळ टिकणारे भाव. भरतमुनींच्या मते हे सर्व भावांमध्ये श्रेष्ठ आहेत. त्यांनी उदाहरण दिले आहे की जसे लोकांमध्ये राजा श्रेष्ठ असतो, शिष्यांमध्ये गुरु श्रेष्ठ असतो, त्याप्रमाणे सर्व भावांमध्ये स्थायीभाव श्रेष्ठ आहेत. स्थायीभाव अन्य सर्व भावांना आपल्या प्रभावाखाली घेतात. जसे सागरात मिसळलेला कोणताही पदार्थ सागररूप होतो, त्याप्रमाणे स्थायिभावाच्या सान्निध्यात आलेले इतर भाव स्थायिभावात विलीन होतात. म्हणूनच विश्वनाथ यांनी स्थायीभावांना 'आस्वाद्यतेचा कंद' असे म्हटले आहे.

व्यवहारात आपण विविध भावनांचा अनुभव घेत असतो. एखाद्या व्यक्तीच्या मनात भय, क्रोध, शोक किंवा प्रेम निर्माण झाले असल्याचे आपण तिच्या चेहऱ्यावरील हावभाव, शारीरिक हालचाली आणि बोलण्यातून ओळखू शकतो. नाटकात नट-नट्या त्या भावांचा अभिनय करतात, तर कथा, कादंबरी किंवा कवितेत पात्रांच्या माध्यमातून त्यांचे वर्णन केले जाते. अशा प्रकारे लौकिक अनुभव साहित्यकृतीत कलात्मक स्वरूप धारण करतो.

व्यभिचारी किंवा संचारी भावांचे वैशिष्ट्य असे की ते क्षणभंगुर असतात. पाण्यावर निर्माण होणारे फेस आणि बुडबुडे जसे क्षणभर दिसतात आणि नाहीसे होतात, त्याप्रमाणे हे भाव काही काळ प्रकट होतात आणि नंतर अदृश्य होतात. मात्र त्यांची उपस्थिती स्थायिभाव अधिक प्रभावी बनवते. म्हणूनच भरतमुनींनी रससूत्रात त्यांना महत्त्वाचे स्थान दिले आहे. सात्त्विक भावही नाट्यगत अभिनयाशी संबंधित आहेत. हे भाव फार काळ टिकणारे नसतात; परंतु ते भावानुभूतीची तीव्रता व्यक्त करतात. मराठी साहित्यचिंतक रा. श्री. जोग यांच्या मते अष्ट सात्त्विक भावांना अनुभाव म्हणण्यास हरकत नाही, कारण तेही भावनांचे बाह्य प्रकटीकरणच आहे.

यावरून असे स्पष्ट होते की, स्थायीभाव, संचारी भाव आणि सात्त्विक भाव यांच्या परस्परसंबंधातूनच रसाची निर्मिती होते. स्थायीभाव हा रसाचा मूलाधार आहे; संचारी भाव त्याला पुष्टी देतात आणि सात्त्विक भाव त्याची तीव्रता वाढवतात. या सर्व घटकांच्या समन्वयातून रसिकाला मिळणारी अलौकिक सौंदर्यानुभूती म्हणजे रस होय. म्हणूनच रससिद्धान्त समजून घेण्यासाठी स्थायीभावांचे स्वरूप समजणे अत्यावश्यक आहे.

**लौकिक भाव आणि नाट्यभाव**

'काव्यशास्त्रप्रदीप'ग्रंथात भरताचा रससिद्धांत स्पष्ट करताना लौकिक भाव व नाट्यभाव या संकल्पना स्पष्ट केलेल्या आहेत. त्यांचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे. भरतमुनी यांनी नाट्यशास्त्र मध्ये रस आणि भाव यांचा विचार करताना नाट्यकलेचे मूलभूत स्वरूप स्पष्ट केले आहे. नाटक किंवा काव्य यांचा मुख्य उद्देश रसिकाच्या ठिकाणी रसनिष्पत्ती घडवून आणणे हा आहे. म्हणूनच भरतमुनींनी नाट्यातील विविध घटकांची चर्चा करताना रसाबरोबर भावांचाही निर्देश केला आहे. त्यांच्या मते रस, भाव, अभिनय, वृत्ती, प्रवृत्ती, स्वर, गान, रंगभूमी इत्यादी सर्व घटक नाट्यसृष्टीचे आवश्यक अंग आहेत. येथे लक्षात घेण्यासारखी महत्त्वाची गोष्ट अशी की नाट्यातील भाव हे लौकिक जीवनातील प्रत्यक्ष भाव नसून ते नाट्यभाव असतात.

लौकिक जीवनात व्यक्तीच्या मनात विविध चित्तवृत्ती निर्माण होत असतात. प्रेम, राग, भय, शोक, आनंद अशा भावना प्रत्यक्ष अनुभवाच्या पातळीवर उत्पन्न होतात. या भावनांच्या उत्पत्तीमागे काही कारणे असतात आणि त्या भावनांचे काही दृश्य परिणामही दिसून येतात. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीला अचानक सर्प दिसल्यास तिच्या मनात भीती निर्माण होते. या भीतीमुळे ती व्यक्ती दचकते, उडी मारण्याचा प्रयत्न करते, तिचा आवाज अडखळतो, हातपाय थरथर कापतात आणि डोळे विस्फारले जातात. येथे सर्प हे कारण आहे आणि थरथरणे, घाबरणे, आवाज बंद होणे ही त्याची दृश्य लक्षणे आहेत. त्याचप्रमाणे एखाद्या व्यक्तीच्या मनात क्रोध निर्माण

झाल्यास ती दात-ओठ खाऊ लागते, चेहरा लाल होतो, भुवया उंचावतात आणि हात क्रियाशील होतात. या चिन्हांवरून आपण त्या व्यक्तीच्या मनातील भावनेचे अनुमान करतो.

या लौकिक व्यवहारात कार्यकारणसंबंध स्पष्टपणे दिसतो. म्हणजे विशिष्ट कारणामुळे विशिष्ट भावना निर्माण होते आणि तिचे दृश्य परिणाम प्रकट होतात. परंतु नाट्य किंवा काव्यात परिस्थिती वेगळी असते. येथे नटाच्या मनात प्रत्यक्ष ती भावना निर्माण झालेली नसते; तो त्या भावनेचा अभिनय करीत असतो. म्हणून नाट्यात दिसणाऱ्या भावना या प्रत्यक्ष लौकिक भावना नसून अभिनीत भावना असतात. यांनाच नाट्यभाव असे म्हणतात.

भरतमुनींच्या भावविवेचनातील हीच अत्यंत महत्त्वाची संकल्पना आहे. लौकिक जीवनातील ज्या गोष्टी कार्यकारणभावाने चित्तवृत्ती निर्माण करतात, त्यांनाच नाट्यसृष्टीत विभाव असे म्हणतात. त्या भावनांचे जे दृश्य परिणाम दिसतात, त्यांना अनुभाव असे म्हणतात. उदाहरणार्थ, लौकिक जीवनात प्रियकराचे दर्शन झाल्यावर युवतीच्या मनात प्रेमभावना जागृत होते आणि तिच्या चेहऱ्यावर लज्जा, स्मित, चंचलता अशी चिन्हे दिसतात. नाट्यातही शकुंतला ही व्यक्तिरेखा साकारताना नटीच्या चेहऱ्यावर हीच चिन्हे दिसतात; परंतु ती प्रत्यक्ष प्रेमभावनेची फलश्रुती नसून अभिनयातून निर्माण झालेली असतात. म्हणून ती नाट्यभावाची उदाहरणे ठरतात.

याचप्रमाणे लौकिक जीवनात प्रेमभावनेबरोबर निर्माण होणारे हर्ष, औत्सुक्य, लज्जा, स्मरण यांसारखे सहचर भाव नाट्यात व्यभिचारी भाव म्हणून प्रकट होतात. अशा प्रकारे विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या संयोगातून नाट्यरसाची निर्मिती होते. हा रस नटाच्या अभिनयातून प्रकट होतो आणि रसिकाच्या मनात आस्वादरूपाने अनुभवला जातो.लौकिक भाव आणि नाट्यभाव यांतील मूलभूत फरक असा की लौकिक भाव प्रत्यक्ष जीवनातील अनुभवाशी संबंधित असतात, तर नाट्यभाव हे अभिनयातून निर्माण झालेले कलात्मक रूप असते. लौकिक जीवनातील भावना सुखदुःखात्मक असतात; त्या नेहमीच आस्वाद्य असतील असे नाही. उदाहरणार्थ, प्रत्यक्ष जीवनातील शोक दुःखदायक असतो; परंतु नाटकातील शोक करुण रसाच्या स्वरूपात आनंददायी ठरतो. याच कारणामुळे रस हा लौकिक अनुभवापेक्षा वेगळा आणि कलात्मक अनुभव मानला जातो.

अभिनवगुप्त यांनी याच संदर्भात नाट्ये एव रसः, न तु लोके असे स्पष्टपणे म्हटले आहे. याचा अर्थ रस हा केवळ नाट्य किंवा काव्यातच अनुभवता येतो; लौकिक जीवनात रसाची निष्पत्ती होत नाही, तेथे केवळ भावजागृती होते. रस ही कलात्मक अनुभूती आहे आणि तिचे अस्तित्व नाट्य-काव्याच्या क्षेत्रातच संभवते.

यावरून असे म्हणता येईल की, भरतमुनींनी लौकिक भाव आणि नाट्यभाव यांच्यातील सूक्ष्म भेद दाखवून रससिद्धान्ताचा पाया अधिक मजबूत केला. नाट्यकलेचे वैशिष्ट्य हेच की ती लौकिक भावनांचे रूपांतर कलात्मक अनुभवात करते आणि त्या माध्यमातून रसिकाला सौंदर्यानुभूती प्रदान करते.

### २.२.१.२ भरताचे रससूत्र

विश्वनाथ यांनी वाक्यं रसात्मकं काव्यम अशी काव्याची व्याख्या केली आहे. या व्याख्येनुसार,ज्या वाक्यात रसात्मकता आहे तेच खरे काव्य होय. म्हणजेच काव्याची खरी ओळख रसामुळेच निर्माण होते. त्यामुळे रस म्हणजे काय आणि तो कसा निर्माण होतो, हा प्रश्न भारतीय काव्यशास्त्रात अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. या प्रश्नाचे उत्तर भरतमुनी यांनी नाट्यशास्त्र या ग्रंथात दिले आहे. त्यांची रसकल्पना जरी नाटकाच्या संदर्भात मांडलेली असली तरी ती संपूर्ण ललितसाहित्याला, विशेषतः काव्य आणि नाटकाला लागू पडते.भरतमुनींचे प्रसिद्ध सूत्र - तत्र विभावानुभावव्यभिचारिसंयोगाद्रसनिष्पत्तिः - असे आहे. या सूत्राचा अर्थ असा की विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या संयोगाने रसाची निर्मिती होते. या सूत्रातून रसप्रक्रियेचे मूलभूत स्वरूप स्पष्ट होते.

## विभाव

रसनिष्पत्तीच्या प्रक्रियेत विभाव हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. विभाव म्हणजे भाव निर्माण होण्यास कारणीभूत ठरणारी परिस्थिती होय. विभावाचे आलंबन आणि उद्दीपन असे दोन प्रकार आहेत. ज्या व्यक्तीमुळे भाव निर्माण होतो ती व्यक्ती आलंबन विभाव असते, तर ज्या बाह्य परिस्थितीमुळे तो भाव उद्दीपित होतो ती परिस्थिती उद्दीपन विभाव असते. उदाहरणार्थ, शृंगार रसात दुष्यंत आणि शकुंतला हे आलंबन विभाव आहेत, तर वनातील रमणीय वातावरण, वसंत ऋतू, कोकिळेचे गायन, चांदणे इत्यादी उद्दीपन विभाव आहेत. विश्लेषणात्मक दृष्टिकोनातून पाहिले असता विभाव हे भावनांच्या उत्पत्तीचे कारण असून ते स्थायिभावाला जागृत करण्याचे कार्य करतात. आलंबन विभाव भावाचा केंद्रबिंदू असतो, तर उद्दीपन विभाव त्या भावाला तीव्रता प्रदान करतो.

## अनुभाव

अनुभाव म्हणजे अंतर्मनातील भावनांचे बाह्य प्रकटीकरण होय. पात्राच्या मनात निर्माण झालेली भावना शरीराच्या हालचालीतून व्यक्त होते. हसणे, लाजणे, अश्रू येणे, रोमांच उठणे, मान खाली घालणे किंवा स्मितहास्य करणे ही अनुभावांची उदाहरणे होत. नाटकात हे अभिनयातून प्रकट होतात, तर कथा-काव्यात शब्दवर्णनातून व्यक्त होतात.उदाहरणार्थ, एखादी नायिका प्रेमभावनेने भारावलेली असल्यास तिच्या गालावर येणारी लाली किंवा तिची लाजरी नजर हे अनुभाव होत. विश्लेषणाच्या दृष्टीने अनुभाव हे अंतर्गत भावांचे दृश्य स्वरूप आहे. त्यांच्यामुळे रसिकाला पात्राच्या मनातील भावना स्पष्टपणे जाणवतात.

## व्यभिचारी किंवा संचारी भाव

व्यभिचारी भाव, ज्यांना संचारी भाव असेही म्हणतात, हे स्थिर स्वरूपाचे नसतात. ते अल्पकाळ टिकतात आणि मुख्य स्थायिभावाला पोषक ठरतात. भरतमुनींनी असे तेहतीस व्यभिचारी भाव सांगितले आहेत. औत्सुक्य, चिंता, शंका, स्मृती, लज्जा, हर्ष, विषाद इत्यादी त्यांपैकी काही उदाहरणे होत. हे भाव स्वतंत्रपणे रस निर्माण करत नाहीत; मात्र ते स्थायिभावाला समृद्ध करतात. उदाहरणार्थ, प्रेमभावनेत औत्सुक्य, लज्जा आणि स्मरण हे संचारी भाव आल्यास प्रेमाची तीव्रता अधिक जाणवते. यावरून असे दिसते की व्यभिचारी भाव हे रसाला गती आणि विविधता प्रदान करतात.

**'अभिनवप्रकाश' या ग्रंथात संचारी भावांची संपूर्ण यादी पुढीलप्रमाणे दिली आहे –**

१) ग्लानि (मनाचा व शरीराचा थकवा),

२) निर्वेद (दारिद्र्य, अपमान असे अधिक्षेप इत्यादि अनेक कारणांनी आलेली खिन्नता),

३) शंका (प्रत्यक्ष भयापेक्षा वांत संकट येईल या भावनेने क्षणोक्षणी येणारी भीरुता),

४) असूया (इतरांविषयी वाटणारा मत्सर),

५) मद (मद्योपयोगाने होणारी मनाची असंबद्ध, विस्कळित, संयम-त्राणहीन स्थिति),

६) श्रम (अतिश्रमाने आलेली शिथिलता),

७) आलस्य (मानसिक पण व शारीरिक आळस),

८) दैन्य (तेजोभंग, लाचारी),

९) चिंता (काळजी),
१०) अमोह (संकटामुळे मनास प्राप्त होणारी शून्यावस्था, क्रियाशून्यता),
११) स्मृती (पूर्वानुभूत सुखदुःखांची स्मृती होऊन त्यांत लीन असणे),
१२) धृती (सुखदुःखांबाबत एका समतेची, काळजीपलीकडे गेल्याची मनोवस्था),
१३) व्रीडा (अनेक कारणांनी अनुभवास येणारी शरमेची भावना),
१४) चपलता (मनाची अस्थिरता, उतावळेपणा),
१५) हर्ष (अनेक घटनांमुळे अनुभवास येणारी मनाची विशेष उल्हसितावस्था),
१६) आवेग (आकस्मिक संकटामुळे होणारी मनाची दीप्तावस्था, अविचारी क्रियेस प्रवृत्त करणारी मनोवस्था),
१७) जडता (प्रसंगाची इष्टानिष्टता, हिताहितत्व लक्षांतच न येण्याची मनाची स्थिति),
१८) गर्व (आपल्यास अनुकूल अशा गोष्टींमुळे दुसऱ्यापुढे तोरा दाखविण्याची मनाची उत्तेजितावस्था),
१९) विषाद (प्रतिकूल घटनांनी वाटणारे दुःख),
२०) औत्सुक्य (वियोग, स्मरण यांमुळे वाटणारी हुरहूर),
२१) निद्रा (अस्वस्थ अशी झोपेची अवस्था),
२२) अपस्मार (स्मृत्यभाव किंवा संज्ञालोप),
२३) सुप्त (झोपेत पडणारी स्वप्ने इत्यादींचा अनुभव),
२४) प्रबोध (झोपेतून अस्वाभाविकपणे जागे होणे),
२५) अमर्ष (राग, असहनवृत्ती),
२६) अवहित्थ (मनांतील भावनांची लपवालपवी),
२७) उग्रता (अपमानाने होणारी तळमळ),
२८) मती (विचारावर्तात सापडणे),
२९) व्याधी (शारीर व मानसिक अनारोग्य),
३०) उन्माद (वेडाची लहर),
३१) मरण (मरणपूर्व अथवा मरणप्राय अवस्था),
३२) त्रास (आकस्मिक व तीव्र भय),
३३) वितर्क (हे की ते या प्रकारची दोलावस्था) इ. (पृ.११०)

**सात्त्विक भाव**

रसप्रक्रियेत सात्त्विक भावांचे विशेष स्थान आहे. भरतमुनींनी स्वेद, स्तंभ, रोमांच, स्वरभंग, कंप, वैवर्ण्य, अश्रू आणि प्रलय असे आठ सात्त्विक भाव सांगितले आहेत. हे भाव मनाच्या अत्यंत तीव्र अवस्थेत आपोआप प्रकट होतात. ते कृत्रिम नसून अंतःकरणाच्या पूर्ण तन्मयतेतून निर्माण होतात. नाटकात नटाने पात्राशी पूर्ण एकरूप होऊन अभिनय केल्यास हे भाव स्वाभाविकपणे व्यक्त होतात. त्यामुळे सात्त्विक भाव हे अभिनयातील परिपक्वतेचे आणि भावानुभूतीच्या तीव्रतेचे द्योतक मानले जातात.

**स्थायिभाव**

स्थायिभाव हा रसाचा मूलाधार आहे. प्रत्येक व्यक्तीच्या मनात काही स्थिर चित्तवृत्ती असतात; त्यांनाच स्थायिभाव म्हणतात. भरतमुनींनी रति, हास, शोक, क्रोध, उत्साह, भय, जुगुप्सा आणि विस्मय हे आठ स्थायिभाव सांगितले आहेत. हे भाव व्यक्तीच्या मनात सुप्तरूपाने अस्तित्वात असतात. विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या साहाय्याने हे जागृत होतात आणि रसस्वरूप धारण करतात. उदाहरणार्थ, रति या स्थायिभावाचे परिष्कृत रूप म्हणजे शृंगार रस, तर शोकाचे रूपांतर करुण रसात होते. यावरून रस हा स्थायिभावाचा सौंदर्यपूर्ण आणि परिष्कृत अनुभव असल्याचे स्पष्ट होते.

रसनिष्पत्तीची प्रक्रिया विश्लेषणात्मक दृष्ट्या पाहिली असता विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या संयोगातून स्थायिभाव जागृत होतो आणि तो रसस्वरूप प्राप्त करतो. उदाहरणार्थ, दुष्यंत–शकुंतला हे आलंबन विभाव, वनातील रमणीय वातावरण हे उद्दीपन विभाव, त्यांचे लज्जित हास्य हे अनुभाव आणि औत्सुक्य व स्मरण हे व्यभिचारी भाव एकत्र आल्यावर रति हा स्थायिभाव उद्दीपित होतो आणि शृंगार रसाची निर्मिती होते. या प्रक्रियेत कोणताही एक घटक स्वतंत्रपणे रस निर्माण करू शकत नाही. सर्व घटकांच्या समन्वित कार्यातूनच रसाची अनुभूती प्राप्त होते.

भरतमुनींच्या रससिद्धान्ताचे महत्त्व भारतीय काव्यशास्त्रात अनन्यसाधारण आहे. या सिद्धान्तामुळे काव्याच्या आत्मतत्त्वाचा शोध लागतो. काव्य किंवा नाटक वाचताना रसिकाला आनंद का मिळतो, याचे शास्त्रीय स्पष्टीकरण या सिद्धान्तातून मिळते. वास्तविक जीवनातील दुःख त्रासदायक वाटते; परंतु,काव्यातील दुःख करुण रसाचा आनंद देते. हीच रसाची अलौकिकता आहे. त्यामुळे रस हा केवळ भावना नसून भावनांचे सौंदर्यपूर्ण, परिष्कृत आणि अलौकिक रूप आहे.यावरून असे स्पष्ट होते की भरतमुनींचा रससिद्धान्त हा भारतीय साहित्यशास्त्राचा पाया आहे. विभाव, अनुभाव, व्यभिचारी भाव, सात्त्विक भाव आणि स्थायिभाव यांच्या परस्परसंबंधातून रसाची निर्मिती कशी होते, याचे अत्यंत सूक्ष्म आणि वैज्ञानिक विश्लेषण त्यांनी केले आहे. म्हणूनच विश्वनाथांनी 'वाक्यं रसात्मकं काव्यम्' असे म्हणत रसालाच काव्याचे आत्मतत्त्व मानले आहे.

**अभिनवगुप्ताचे रसविवेचन**

अभिनवगुप्त यांनी भरतमुनींच्या रससिद्धान्ताचे अत्यंत सूक्ष्म आणि प्रभावी स्पष्टीकरण केले. त्यांनी रसप्रक्रियेत निर्माण होणाऱ्या अंतिम मनोवस्थेचे स्वरूप स्पष्ट करताना सांगितले की, नाट्यप्रयोगातून उत्पन्न होणारी चित्तवृत्ती ही व्यक्तिसंबद्ध नसते; तिचे साधारणीकरण झालेले असते. साधारणीकरण म्हणजे भावनांना व्यक्तिगत मर्यादांपासून मुक्त करून त्यांना सार्वत्रिक स्वरूप प्राप्त करून देणे. या प्रक्रियेमुळे प्रेक्षक किंवा रसिक आपल्या वैयक्तिक अनुभव, स्वार्थ आणि मर्यादांपासून मुक्त होऊन संपूर्णपणे नाट्यप्रयोगाशी एकरूप होतो.

अशा प्रकारे साधारणीकरणाच्या आधारे नाट्यप्रयोगाशी तन्मय झालेल्या रसिकाला शेवटी जी विशिष्ट मनोवस्था प्राप्त होते, तिला अभिनवगुप्तांनी 'विश्रांती' असे म्हटले आहे. ही विश्रांती म्हणजे मनाची समाधानपूर्ण, शांत आणि परिपूर्ण अवस्था होय. ज्या प्रक्रियेमुळे ही अवस्था निर्माण होते, त्या प्रक्रियेला त्यांनी रसना व्यापार किंवा आस्वाद असे संबोधले आहे. म्हणजेच,रसाचा अनुभव हा केवळ भावना जाणवण्यापुरता मर्यादित नसून तो एक परिपूर्ण सौंदर्यानुभव आहे.

अभिनवगुप्तांनी भरताची रसकल्पना अधिक स्पष्ट करताना नाटक पाहणाऱ्या रसिकाच्या मानसिक अवस्थेचे द्वंद्वात्मक स्वरूप सांगितले आहे. नाटक पाहताना रसिक एका विशिष्ट भूमिकेत प्रवेश करतो. तो रंगमंचावरील नटाला प्रत्यक्ष नट म्हणून न पाहता राम, सीता किंवा इतर पात्रांच्या रूपात स्वीकारतो. या स्वीकारामागे नटांचा वेष, रंगमंचावरील वातावरण, अभिनयकौशल्य आणि नाट्यरचना हे घटक कारणीभूत असतात. त्याचबरोबर रसिकाची अंतर्मनातील तयारी आणि कल्पनाशक्तीही महत्त्वाची भूमिका बजावते. परंतु,या प्रक्रियेत रसिकाला हेही माहीत असते की रंगमंचावर दिसणारे राम किंवा सीता हे खरे ऐतिहासिक राम-सीता नाहीत. ही जाणीव कायम असतानाही तो त्या पात्रांशी भावनिक एकरूपता साधतो. यामुळे नाट्याचा आस्वाद निर्विघ्नपणे घेता येतो. याच अवस्थेत नाटकातून निर्माण होणाऱ्या भावना साधारणीभूत होतात. त्या केवळ पात्रांच्या व्यक्तिगत भावना राहत नाहीत, तसेच त्या रसिकाच्या वैयक्तिक भावनाही राहत नाहीत. त्या सर्वसामान्य मानवी अनुभवांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या भावना बनतात. यालाच साधारणीकरणाची प्रक्रिया म्हणतात.

या प्रक्रियेमुळे नाट्यकृतीतील भावनांमध्ये रसिकाचा अनुप्रवेश होतो. कारण अशा भावना रसिकाच्या मनातही सुप्तरूपाने अस्तित्वात असतात. त्यामुळे तो त्या भावनांशी सहज तादात्म्य साधू शकतो. ही प्रतिसादक्षमतेची अवस्था रसास्वादासाठी अत्यंत आवश्यक आहे. ज्याच्या मनात अशी संवेदनशीलता आहे, तोच रसिक नाटकाचा किंवा काव्याचा योग्य प्रकारे आस्वाद घेऊ शकतो. अभिनवगुप्तांच्या मते,रसानुभव म्हणजे लौकिक भावानुभवाचे अलौकिक पातळीवरील रूपांतर होय. लौकिक जीवनातील भावना सुख-दुःखात्मक आणि व्यक्तिनिष्ठ असतात; परंतु नाट्य किंवा काव्यात त्या भावनांचे परिष्करण होऊन त्या अलौकिक आणि आस्वाद्य बनतात. तथापि, या प्रक्रियेत त्या भावनांचा लौकिक आधार नष्ट होत नाही. उलट,वास्तवाचे कल्पनाशक्तीच्या माध्यमातून केलेले कलात्मक रूपांतरच रस बनते.

म्हणजेच, अभिनवगुप्तांनी रससिद्धान्ताला तत्त्वज्ञानाची भक्कम बैठक दिली. त्यांनी साधारणीकरण, तन्मयता, अनुप्रवेश आणि विश्रांती या संकल्पनांच्या साहाय्याने रसास्वादाचे स्वरूप अत्यंत नेमकेपणाने स्पष्ट केले. त्यामुळे भरतमुनींची रसकल्पना अधिक परिपूर्ण झाली आणि भारतीय काव्यशास्त्रात रससिद्धान्ताला सार्वत्रिक मान्यता प्राप्त झाली.

### २.२.२ काव्यानंदमीमांसा म्हणजे काय?

काव्याच्या आस्वादातून प्राप्त होणाऱ्या आनंदाचे स्वरूप द्विविध मानले जाते. एक म्हणजे काव्यरचना करणाऱ्या कवीला प्राप्त होणारा आनंद आणि दुसरा म्हणजे काव्याचा आस्वाद घेणाऱ्या सहृदय रसिकाला मिळणारा आनंद. काव्यनिर्मिती करताना किंवा एकूणच ललितसाहित्याची निर्मिती करताना कवी अथवा लेखकाला जो अंतःप्रेरणेतून मिळणारा आनंद अनुभवास येतो, तो साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेचा अत्यंत महत्त्वाचा भाग असतो. त्याचप्रमाणे रसिक वाचक जेव्हा काव्यवाचन करतो किंवा नाटकाचा आस्वाद घेतो, तेव्हा त्यालाही उच्च प्रतीच्या सौंदर्यानंदाची अनुभूती प्राप्त होते. ही गोष्ट अनुभवसिद्ध असली, तरी या आनंदाचे नेमके स्वरूप निश्चितपणे सांगणे सोपे नाही. म्हणूनच विविध साहित्यचिंतकांनी या विषयावर भिन्न मते मांडलेली दिसतात.

काव्यानंद हा प्रामुख्याने रसिकाच्या मनोवृत्तीशी संबंधित असा अनुभव आहे. एका अर्थाने ती एक मानसिक प्रक्रिया आहे. काव्य किंवा नाटकातील नायक-नायिकांची सुखदुःखे, प्रसंग किंवा घटना या कल्पनानिर्मित असल्या, तरी रसिकाला त्यांचा प्रत्यय वास्तवदर्शी स्वरूपात येतो. याचे कारण असे की साहित्यकृतीत व्यक्त

झालेल्या भावना रसिकाच्या अंतर्मनाशी संवाद साधतात आणि त्याच्या संवेदनांना स्पर्श करतात. म्हणजे,जीवनातील विविध अनुभव, घटना आणि प्रसंग पाहून कवीच्या मनात विशिष्ट प्रकारच्या संवेदना व चित्तवृत्ती निर्माण होतात. आपल्या प्रतिभेच्या साहाय्याने तो त्या अनुभवांना शब्दरूप देतो आणि साहित्यकृतीची निर्मिती करतो. रसिक जेव्हा त्या साहित्यकृतीचा आस्वाद घेतो, तेव्हा त्याला त्यातील अनुभवांची प्रत्ययकारी जाणीव होते.

या प्रक्रियेत कवीची किंवा लेखकाची व्यक्तिसापेक्षता गळून पडते आणि त्यातून निर्माण झालेली अनुभूती विश्वात्मक स्वरूप धारण करते. म्हणजेच ती सार्वत्रिक बनते. यालाच साहित्यमीमांसकांनी 'कवी-रसिक हृदयसंवाद' असे म्हटले आहे. या हृदयसंवादामुळे कवीच्या अनुभूती रसिकाच्या मनात पुनःनिर्मित होतात आणि त्यातून सौंदर्यानंदाची निर्मिती होते. त्यामुळे काव्य किंवा ललितसाहित्याद्वारे प्राप्त होणाऱ्या आनंदाचे स्वरूप द्विविध मानले जाते.

पहिला आनंद हा साहित्यनिर्मितीच्या वेळी कवी किंवा लेखकाला मिळणारा सर्जनानंद आहे, तर दुसरा आनंद हा साहित्याचा आस्वाद घेताना रसिक-वाचकाला मिळणारा रसानंद आहे. हे दोन्ही आनंद साहित्याच्या अस्तित्वासाठी आणि त्याच्या प्रभावासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत.कवी आणि रसिक यांना ललितसाहित्याद्वारे प्राप्त होणाऱ्या आनंदाचे स्वरूप, तसेच या आनंदास कारणीभूत असणारे घटक यांचा सविस्तर विचार 'काव्यानंदमीमांसा' या संकल्पनेअंतर्गत केला जातो. म्हणूनच काव्यानंदाचा अभ्यास हा साहित्याच्या सौंदर्यशास्त्रीय आकलनासाठी अत्यंत आवश्यक मानला जातो.त्यातील महत्वाच्या घटकांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे अभ्यासू.

### २.२.२.१ कवीचा आनंद

कवी हा मूलतः एक कलावंत असतो आणि काव्य ही एक श्रेष्ठ कला मानली जाते. त्यामुळे काव्यकृती ही कलात्मक अभिव्यक्तीचे परिपूर्ण रूप मानली जाते. कवीच्या मनात जेव्हा काव्यबीज स्फुरते, तेव्हापासून साहित्यनिर्मितीची प्रक्रिया सुरू होते. ही प्रक्रिया पूर्णत्वास जाऊन जेव्हा ती साहित्यकृतीच्या स्वरूपात साकारते, तेव्हा कवीला एक विशिष्ट प्रकारचा आनंद प्राप्त होतो. म्हणून कवीला मिळणाऱ्या आनंदाचे स्वरूप, त्याची कारणे आणि त्याची अनुभूती यांचा विचार करणे आवश्यक ठरते. मनामध्ये सुखद संवेदना जागृत होणे म्हणजे आनंद होय. साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेत कवी अशाच प्रकारच्या सूक्ष्म आणि गहन आनंदाचा अनुभव घेत असतो. काव्यरचना करताना कवीची अवस्था एका प्रकारच्या समाधीसमान तन्मयतेची असते. त्या वेळी तो आपल्या साहित्यविषयाशी इतका एकरूप झालेला असतो की त्याला स्वतःचे, आजूबाजूच्या व्यक्तींचे किंवा परिस्थितीचे भान राहत नाही. त्याचे संपूर्ण मन साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेत गुंतलेले असते. या अवस्थेत त्याला अनुभवास येणाऱ्या संवेदना अत्यंत सूक्ष्म, गूढ आणि अनिर्वचनीय स्वरूपाच्या असतात. याच संवेदनांतून त्याला अद्वितीय आनंदाची अनुभूती प्राप्त होत असते.

कवीच्या आनंदाचे स्वरूप नेमके शब्दांत व्यक्त करणे कठीण आहे. आनंद म्हणजे सुखद अनुभूती एवढेच त्याचे सामान्य स्वरूप सांगता येते; परंतु त्याचा सूक्ष्म अनुभव वर्णन करणे अवघड असते. काव्यनिर्मितीच्या वेळी कवी स्वतःचे भान विसरतो, बाह्य जगापासून अलिप्त होतो आणि एक प्रकारच्या सर्जनशील तल्लीनतेत प्रवेश करतो. हीच अवस्था त्याच्या आनंदाचे एक महत्त्वाचे लक्षण मानली जाते. तथापि, ही लक्षणे असली तरी प्रत्यक्ष आनंदाची अनुभूती शब्दांत पूर्णपणे व्यक्त करता येत नाही. ती केवळ अनुभवातूनच जाणता येते.काव्यरचना पूर्ण झाल्यानंतरही कवीला समाधानाचा एक वेगळाच आनंद मिळतो. आपण हाती घेतलेले कार्य यशस्वीपणे पूर्ण केले, आपल्या हातून एक चांगली साहित्यकृती निर्माण झाली, या भावनेतून त्याला समाधान आणि उल्हासाची

अनुभूती प्राप्त होते. हा आनंद निर्मितीनंतरचा असतो. तो कवीच्या सर्जनशील प्रयत्नांचे फलित म्हणून निर्माण होतो.मात्र साहित्यनिर्मितीच्या वेळी मिळणारा आनंद अधिक महत्त्वाचा मानला जातो. कारण तो सर्जनप्रक्रियेच्या केंद्रस्थानी असतो. या अवस्थेत कवी अनुभवत असलेला आनंद हा अत्यंत अंतर्मुख, सूक्ष्म आणि अनिर्वचनीय असतो. म्हणूनच त्याचे नेमके विश्लेषण करणे कठीण आहे. तथापि, साहित्यमीमांसकांनी या आनंदाचे स्वरूप कसे असते याविषयी विवेचन केले आहे.

**क्रीडानंद**

हर्बर्ट स्पेन्सर या पाश्चात्य साहित्यमीमांसकाने लेखकाच्या आनंदाचे स्वरूप स्पष्ट करताना 'क्रीडानंदाची उपपत्ती' मांडली आहे. या उपपत्तीमध्ये त्यांनी लेखकाला साहित्यनिर्मितीतून मिळणाऱ्या आनंदाचा संबंध क्रीडेशी जोडला आहे. त्यांच्या मते, मनुष्याच्या जीवनधारणेसाठी आवश्यक असलेली शक्ती खर्च झाल्यानंतरही त्याच्याकडे काही अतिरिक्त शक्ती शिल्लक राहते. या उर्वरित शक्तीचा विनियोग करण्यासाठी मनुष्य क्रीडेकडे वळतो. ही शक्ती जीवनोपयोगी कार्यासाठी आवश्यक नसल्यामुळे तिचा उपयोग क्रीडेत झाला की व्यक्तीला आनंदाची अनुभूती मिळते.

स्पेन्सर यांच्या मते, जीवनावश्यक गरजांशी थेट संबंध नसणे हेच क्रीडेचे आणि कलेचे वैशिष्ट्य आहे. ज्या प्रकारे अतिरिक्त शक्ती क्रीडेद्वारे व्यक्त होते, त्याच प्रकारे ती कला आणि साहित्यनिर्मितीतूनही अभिव्यक्त होते. जर या अतिरिक्त शक्तीला योग्य अभिव्यक्तीचे साधन मिळाले नाही, तर व्यक्तीच्या शरीरात किंवा मनात विकृती निर्माण होऊ शकते. त्यामुळे या शक्तीला कलेच्या निर्मितीचे स्वतंत्र क्षेत्र मिळाल्याने लेखकाला आनंद प्राप्त होतो. साहित्यनिर्मिती ही अशा अतिरिक्त ऊर्जेचा सर्जनशील विनियोग असल्याचे स्पेन्सर मानतात.या उपपत्तीनुसार, जसे क्रीडेमुळे व्यक्तीला उत्साह, समाधान आणि आनंद प्राप्त होतो, त्याचप्रमाणे साहित्यनिर्मितीतून लेखकाला विलक्षण आनंद मिळतो. साहित्यनिर्मिती ही एक प्रकारची बौद्धिक आणि भावनिक क्रीडा आहे. लेखक आपल्या अंतर्मनातील उर्जेला शब्दांच्या माध्यमातून अभिव्यक्त करतो आणि या सर्जनप्रक्रियेतून त्याला आनंदाची अनुभूती प्राप्त होते.

हर्बर्ट स्पेन्सर यांनी या उपपत्तीत कलावंताच्या मनोवस्थेचा शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही स्तरांवर विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. या दृष्टीने त्यांची ही उपपत्ती महत्त्वपूर्ण ठरते. ती कलेच्या निर्मितीकडे केवळ भावनिक अनुभव म्हणून न पाहता, मानवी ऊर्जेच्या सर्जनशील अभिव्यक्तीच्या रूपात पाहते.तथापि, क्रीडानंद आणि कलानंद यांचा विचार एकाच अर्थाने करता येत नाही. परिश्रम, कृती किंवा खेळ यांतून मिळणारा आनंद आणि साहित्यनिर्मितीतून मिळणारा आनंद यांत मूलभूत फरक आहे. उदाहरणार्थ, एखादा लहान मुलगा नदीकिनारी वाळूचे घर बांधतो. त्या कृतीतून त्याला मिळणारा आनंद हा क्रीडानंद असतो; परंतु लेखकाला साहित्यनिर्मितीतून मिळणारा आनंद हा केवळ शक्तीचा विनियोग नसून नवनिर्मितीचा आनंद असतो.

लेखकाला जे अनुभवले, जाणवले किंवा अंतर्मनात स्फुरले, त्याला शब्दरूप देताना त्याला वेगळ्याच प्रकारचा समाधानकारक आनंद मिळतो. हा आनंद कलानंद असतो. तो केवळ कृतीचा आनंद नसून सर्जनशीलतेचा आनंद आहे. या आनंदात लौकिक लाभ, प्रतिष्ठा किंवा आर्थिक अपेक्षा गुंतलेल्या नसतात. नवीन, परिणामकारक आणि जिवंत साहित्यनिर्मिती करता आली, हीच त्याच्या आनंदाची खरी प्रेरणा असते.लेखक साहित्यनिर्मिती करताना रसिकांचाही विचार करीत असतो. आपण व्यक्त करीत असलेला अनुभव रसिकांपर्यंत प्रभावीपणे

पोहोचेल का, याची त्याला जाणीव असते. त्यामुळे तो स्वतःच्या निर्मितीकडेही रसिकदृष्टिकोनातून पाहतो. अशा प्रकारे तो स्वतःच आपल्या साहित्याचा प्रथम आस्वादक बनतो आणि त्या प्रक्रियेत कलानंदाचा अनुभव घेतो.

स्पेन्सर यांच्या उपपत्तीवर, एक महत्त्वाची टीका अशी केली जाते की, साहित्यनिर्मिती नेहमीच अतिरिक्त ऊर्जेच्या विनियोगातून होत नाही. अनेक साहित्यिक अत्यंत प्रतिकूल आर्थिक, मानसिक किंवा सामाजिक परिस्थितीतही उत्कृष्ट साहित्यनिर्मिती करतात. अशा वेळी त्यांच्या सर्जनशीलतेचे मूळ केवळ उरलेल्या ऊर्जेत नसून अंतर्मनातील तीव्र अनुभव, अस्वस्थता आणि अभिव्यक्तीची गरज यात असते. क्रीडानंदाच्या उपपत्तीचा दुसरा विचार असा की, क्रीडेत केवळ अतिरिक्त शक्तीचा व्यय होत नाही, तर त्यात सक्रिय कृतीतून समाधान मिळते. मनुष्य क्रीडा करताना जाणूनबुजून श्रम करतो आणि त्या श्रमांतून त्याला आनंद मिळतो. त्याचप्रमाणे साहित्यनिर्मितीतही कवी किंवा लेखक मानसिक श्रम करतो. हे श्रम जरी कष्टदायक वाटले, तरी ते सर्जनशील असल्याने त्यातून समाधान आणि आनंद निर्माण होतो.

एकंदरीत ,स्पेन्सरची क्रीडानंदाची उपपत्ती लेखकाच्या आनंदाचे एक महत्त्वपूर्ण स्पष्टीकरण देते. ती साहित्यनिर्मितीला मानवी उर्जेच्या सर्जनशील अभिव्यक्तीचे रूप मानते. तथापि, लेखकाला मिळणारा आनंद हा केवळ क्रीडानंद नसून तो नवनिर्मिती, अभिव्यक्ती आणि कलासाधनेतून प्राप्त होणारा अधिक सूक्ष्म व उन्नत असा कलानंद आहे.

**निर्मितीचा आनंद**

कवीला होणाऱ्या आनंदाचे स्वरूप समजून घेताना निर्मितीचा आनंद स्वतंत्रपणे विचारात घ्यावा लागतो. कवीला मिळणारा आनंद हा केवळ कृती, हालचाल किंवा परिश्रम यांमुळे होत नाही; तर त्या कृतीतून काहीतरी नवीन, सुंदर आणि अर्थपूर्ण निर्माण होते, यामध्येच त्याच्या आनंदाचे खरे स्वरूप दडलेले असते.जर केवळ श्रम किंवा कृती यांतच आनंद असता, तर प्रत्येक शारीरिक किंवा बौद्धिक श्रम करणाऱ्या व्यक्तीला कलानंदाची अनुभूती समान प्रमाणात झाली असती. परंतु तसे दिसून येत नाही. कारण साहित्यनिर्मितीतील आनंद हा नवनिर्मितीच्या प्रक्रियेशी संबंधित असतो. कवी आपल्या प्रतिभेच्या साहाय्याने नवीन अनुभव, नवीन विचार आणि नवीन सौंदर्याची निर्मिती करतो. ही सर्जनशीलता त्याला विशेष आनंद देते.

व्यवहारातील अनेक उदाहरणांतूनही निर्मितीच्या आनंदाचे स्वरूप स्पष्ट होते. बागकाम करून फुले-फळे निर्माण करणे, घर किंवा इमारत उभारणे, एखादी योजना यशस्वीपणे पूर्णत्वास नेणे यांत एक प्रकारचा समाधानकारक आनंद मिळतो. याचे कारण त्या कृतीतून काहीतरी साकार झाल्याची जाणीव होय. साहित्यनिर्मितीतही हाच आनंद अधिक सूक्ष्म आणि उन्नत स्वरूपात अनुभवास येतो.कवितेला कवीची 'दुहिता' किंवा ग्रंथाला 'अपत्य' असे संबोधले जाते, त्यामागेही निर्मितीची हीच भावना असते. जसे पालकाला आपल्या अपत्याबद्दल आत्मीयता आणि अभिमान वाटतो, तसेच कवीला आपल्या साहित्यकृतीबद्दल समाधान आणि आनंद वाटतो. ही साहित्यकृती त्याच्या प्रतिभेची आणि सर्जनशीलतेची साक्ष असते.

कवीला आपल्या साहित्यकृतीला रसिकांची दाद मिळावी, ती प्रशंसनीय ठरावी, अशी अपेक्षा असते. मात्र बाह्य मान्यता मिळाली नाही, तरीही तो साहित्यनिर्मिती करत राहतो. याचे कारण म्हणजे निर्मितीची उपजत प्रेरणा. साहित्यनिर्मिती ही त्याच्यासाठी केवळ बाह्य यशासाठी नसून अंतःसंतोषासाठी असते. निर्मितीचा आनंद हा साहित्यनिर्मितीच्या प्रक्रियेदरम्यानही अनुभवास येतो आणि साहित्यकृती पूर्णत्वास गेल्यानंतरही टिकून राहतो. निर्मितीच्या प्रक्रियेत कवीला सर्जनशील तन्मयतेचा आनंद मिळतो; तर निर्मिती पूर्ण झाल्यावर त्यातून समाधानाचा आनंद प्राप्त होतो.

यश, कीर्ती किंवा आर्थिक लाभ हे या आनंदात भर घालू शकतात; परंतु ते दुय्यम स्वरूपाचे असतात. कवीचा खरा आनंद हा काहीतरी नवीन आणि अर्थपूर्ण निर्माण करण्यातच असतो.म्हणजेच ,निर्मितीचा आनंद हा कवीच्या सर्जनशीलतेचा मूलाधार आहे. नवनिर्मितीची प्रेरणा, तिच्यातील समाधान आणि तिच्यामुळे मिळणारा अंतर्मनाचा आनंद हेच साहित्यनिर्मितीमागील प्रमुख घटक आहेत.

**आत्माविष्कार अथवा अभिव्यक्ती**

निर्मितीच्या आनंदाचे एक महत्त्वपूर्ण अंग म्हणजे आत्माविष्कार अथवा अभिव्यक्ती होय. मनुष्य जे काही कार्य करतो, त्यातून त्याचे व्यक्तिमत्त्व, विचार आणि अनुभव प्रकट होत असतात. विशेषतः जेव्हा एखादी कृती स्वतःच्या प्रेरणेने आणि स्वतंत्र सर्जनशीलतेने केली जाते, तेव्हा त्यामध्ये आत्माविष्कार अधिक स्पष्टपणे दिसून येतो. साहित्यकृती किंवा काव्य हे आत्माविष्काराचे अत्यंत प्रभावी माध्यम मानले जाते.

कवी जगातील विविध अनुभव, घटना आणि सौंदर्य यांचे सूक्ष्म निरीक्षण करतो. या अनुभवांचे ग्रहण करून त्याला ते शब्दबद्ध स्वरूपात समाजासमोर मांडावेसे वाटते. या प्रक्रियेत तो केवळ बाह्य जगाचे वर्णन करीत नाही, तर आपल्या अंतर्मनातील संवेदना, विचार आणि दृष्टिकोन यांची अभिव्यक्ती करीत असतो. म्हणून साहित्यनिर्मिती ही केवळ वर्णनात्मक प्रक्रिया नसून ती आत्मप्रकटीकरणाची प्रक्रिया आहे.कवी अनेकदा नवीन सौंदर्याची निर्मिती करतो. तो वास्तव अनुभवांना कल्पनाशक्तीची जोड देऊन त्यांना कलात्मक रूप प्रदान करतो. या सर्जनशीलतेतून त्याचे स्वतंत्र व्यक्तिमत्त्व प्रकट होते. कवीच्या साहित्यकृतीतून त्याचा जीवनदृष्टिकोन, संवेदनशीलता आणि सौंदर्यदृष्टी यांचा प्रत्यय येतो. हीच त्याच्या आत्माविष्काराची खरी ओळख असते.

आत्माविष्कारातून कवीला विशेष प्रकारचा आनंद प्राप्त होतो. कारण स्वतःच्या अंतर्मनातील अनुभवांना शब्दरूप देणे ही त्याच्यासाठी समाधानकारक प्रक्रिया असते. या अभिव्यक्तीतून त्याच्या मनावरील भावनात्मक दडपण कमी होते आणि त्याला अंतःशांतीची अनुभूती मिळते. व्यवहारातही व्यक्तीला स्वतंत्रपणे विचार मांडण्याची, निर्णय घेण्याची किंवा स्वतःच्या कल्पनांची अंमलबजावणी करण्याची संधी मिळाली, तर त्यातून समाधान मिळते. यामागील कारण म्हणजे आत्माविष्काराची संधी होय. साहित्यनिर्मितीतही हेच तत्त्व लागू पडते.कलेच्या क्षेत्रात बाह्य बंधने अनेकदा जाचक वाटतात, कारण ती आत्माविष्काराच्या स्वातंत्र्यावर मर्यादा आणतात. कवीला मुक्तपणे व्यक्त होता आले, तरच त्याच्या प्रतिभेला योग्य अभिव्यक्ती मिळते.

**२.३ रसिकाचा आनंद**

रसिकाला होणारा आनंद हा कवीला होणाऱ्या आनंदापेक्षा वेगळ्या स्वरूपाचा असतो. रसिक स्वतः साहित्यनिर्मिती करीत नसल्यामुळे त्याच्या आनंदामागे निर्मितीचा किंवा आत्माविष्काराचा भाग नसतो. त्याची कृती मुख्यतः वाचन, श्रवण किंवा नाट्यप्रयोगाचा आस्वाद घेण्यापुरती मर्यादित असते. काही विचारवंतांच्या मतानुसार रसिक साहित्यकृतीचा आस्वाद घेताना मनोमन पुनर्निर्मिती करीत असतो; त्यामुळे सूक्ष्म स्वरूपाचा आत्माविष्कार त्यात संभवतो. तथापि, ही निर्मिती अत्यंत अमूर्त असल्याने रसिकाच्या आनंदाची कारणे इतर घटकांमध्ये शोधावी लागतात.

रसिकाला होणाऱ्या आनंदाचा मुख्य आधार म्हणजे भावनाजागृती किंवा रसास्वाद होय. साहित्यकृतीतील आशय पूर्णपणे समजून घेतल्यानंतर रसिकाच्या अंतःकरणात विशिष्ट भावनांची जागृती होते आणि त्यातून आनंदाची निर्मिती होते. काव्यातील शृंगार, करुण, वीर, अद्भुत अशा विविध रसांचा अनुभव घेताना रसिकाच्या मनात निर्माण होणारी ही भावस्थिती त्याला अलौकिक आनंद प्रदान करते. त्यामुळे रसिकाच्या आनंदाचा प्रधान

भाग हा भावनिक स्वरूपाचा असतो.तथापि, रसिकाचा आनंद केवळ भावनिक नसतो. साहित्यकृतीचा अर्थ समजून घेण्यासाठी बुद्धीची आवश्यकता असते. कथानकाची मांडणी, प्रसंगांची गुंतागुंत, त्यातील उकल, तसेच अर्थालंकारांतील चमत्कृती यांचा आस्वाद रसिक बुद्धीच्या साहाय्याने घेतो. विशेषतः श्लेष, विरोध, उत्प्रेक्षा यांसारख्या अर्थालंकारांमुळे निर्माण होणारा आनंद हा बौद्धिक स्वरूपाचा असतो. लेखकाच्या कल्पकतेचे आणि रचनाकौशल्याचे दर्शन घडल्याने रसिकाला बौद्धिक समाधान लाभते.

याशिवाय, काव्यातील शब्दसौंदर्यामुळे रसिकाला ऐंद्रिय आनंदही मिळतो. अनुप्रास, यमक, छंद, लय, गेयता आणि मधुर शब्दयोजना यांमुळे श्रवणेंद्रियांना सुखद अनुभव प्राप्त होतो. शब्दांच्या माधुर्यामुळे काव्याचा परिणाम अधिक प्रभावी होतो आणि रसिकाचा आस्वाद अधिक समृद्ध बनतो.

**ज्ञानानंद**

काव्याचे वाचन आणि त्यातील रसास्वाद यामध्ये बुद्धीचे कार्य अत्यंत महत्त्वाचे असते. या बुद्धीच्या कार्यातून जो आनंद प्राप्त होतो, त्याला ज्ञानानंद असे म्हणतात. साहित्यकृती वाचताना वाचकाला नवीन गोष्टी समजतात, नवीन अनुभव प्राप्त होतात आणि जगाकडे पाहण्याची दृष्टी अधिक व्यापक होते. त्यामुळे काव्यानंदामध्ये ज्ञानानंदाचाही मोठा वाटा असतो.मनुष्याच्या स्वभावात जिज्ञासा ही उपजत प्रवृत्ती असते. नवीन काही जाणून घेणे, समजून घेणे आणि त्यातून समाधान मिळवणे ही मानवी वृत्ती आहे. साहित्यकृती वाचताना ही जिज्ञासा तृप्त होते. म्हणूनच अनेक वाङ्मयप्रकारांची निर्मिती जिज्ञासातृप्तीसाठी झालेली दिसते. वाचकाला एखाद्या साहित्यकृतीतून जीवनाचे नवे पैलू, मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण किंवा समाजजीवनाचे वास्तव समजते. या ज्ञानप्राप्तीतून जो आनंद मिळतो तो ज्ञानानंद होय.

रा.श्री.जोग 'अभिनव काव्यप्रकाश' या ग्रंथात म्हणतात की, काव्यात व इतर ललित वाङ्मय प्रकारांत जिज्ञासूतृप्ती करण्याचे जे सामर्थ्य आहे, ते इतर ललित कलांमध्ये आहे असे म्हणता येणार नाही. जगातील व्यवहार हा असाच असतो किंवा 'जग हे असे आहे' अशी जी मनाची वृत्ती होते ती ज्ञानाच्या स्वरूपाचीच असते. (पृ.१२१)म्हणजे असे म्हणता येईल की, काव्य वाचताना 'जगातील व्यवहार असा असतो' किंवा 'जीवनाचे स्वरूप असे आहे' अशी जाणीव निर्माण होते. सत्याचे दर्शन झाल्याने मनाला समाधान लाभते. एखाद्या साहित्यकृतीत औचित्यदर्शन घडते, उच्च नैतिक मूल्यांचा प्रत्यय येतो किंवा जीवनविषयक गूढ सत्य उलगडते, तेव्हा वाचकाच्या मनात प्रसन्नता निर्माण होते. हा आनंद भावनिकतेपेक्षा बौद्धिक स्वरूपाचा असतो.

तसेच, लेखकाच्या कृतिकौशल्याचे सूक्ष्म निरीक्षण, वक्रोक्तीतील चमत्कृती, ध्वन्यार्थाची सूचकता, कल्पनावैचित्र्य आणि अर्थगर्भ मांडणी यांचा आस्वाद घेताना वाचकाला विशेष प्रकारचा बौद्धिक आनंद मिळतो. अशा वेळी वाचकाची भूमिका तुलनेने तटस्थ असते. तो भावनिक दृष्ट्या गुंतून न पडता विचारपूर्वक साहित्यकृतीचा आस्वाद घेत असतो. या प्रक्रियेतून त्याला जी समाधानाची अनुभूती मिळते, तिलाच ज्ञानानंद असे म्हणतात.

अशा प्रकारे ज्ञानानंद हा काव्यानंदाचा एक महत्त्वाचा घटक आहे. तो ऐंद्रिय आनंद किंवा भावनिक आनंदापेक्षा वेगळा असून बुद्धीच्या समाधानाशी संबंधित आहे. साहित्यकृती वाचताना वाचकाच्या जिज्ञासेची पूर्तता होऊन त्याला ज्ञान, समज आणि बौद्धिक समाधान प्राप्त होते; हाच ज्ञानानंदाचा मूलाधार होय.

**साधारणीकरणाचा आनंद (अभिनवगुप्त)**

रसप्रक्रियेचे विवेचन करताना 'रसनिष्पत्ती' या संज्ञेचा अर्थ कोणत्या पद्धतीने समजून घ्यावा, याचा विचार भारतीय साहित्यशास्त्रात विशेष महत्त्वाचा मानला जातो. 'निष्पत्ती म्हणजे अभिव्यक्ती' हे सूत्र लक्षात घेतल्यास अभिनवगुप्तांची रसकल्पना अधिक स्पष्ट होते.पूर्वीच्या काही आचार्यांनी रसाचा संबंध नायक-नायिकांच्या स्थायीभावांशी जोडला होता; परंतु अशा विवेचनात रसिकाला गौण स्थान मिळते. अभिनवगुप्तांनी मात्र रसिकाला रसप्रक्रियेच्या केंद्रस्थानी स्थान देऊन रस-आनंद प्रक्रियेचे अधिक सूक्ष्म आणि परिपूर्ण स्पष्टीकरण केले.

अभिनवगुप्तांच्या मते 'काव्यर्थान् भावयन्ति इति भावाः' या सूत्रातील 'काव्यार्थ' म्हणजे काव्यगत भाव अथवा रस होय. या रसाची साधारण्याने येणारी प्रतीती म्हणजे 'भावना'. जे घटक रसाची ही साधारण प्रतीती निर्माण करतात, तेच भाव होत. त्यामुळे अभिनवगुप्तांच्या रसप्रक्रियेचे मर्म साधारणीकरणाच्या प्रक्रियेत आहे.कवीच्या अंतःकरणातील भाव जेव्हा काव्यरूप धारण करतात, तेव्हा ते त्याचे व्यक्तिगत भाव राहात नाहीत. व्यक्तिगत अनुभूतीचे साधारणीकरण झाल्याशिवाय त्या अनुभूतीला रमणीयत्व प्राप्त होत नाही.

कवीच्या प्रतिभाशक्तीमुळे त्याची व्यक्तिगत अनुभूती विश्वात्मक बनते. अभिनवगुप्तांनी या प्रक्रियेचे वर्णन 'स्वात्मद्वारेण विश्वं तथा पश्यन' असे केले आहे. म्हणजे कवी स्वतःच्या अनुभवातून संपूर्ण विश्वाचे दर्शन घडवितो. ही अनुभूती देश, काल आणि व्यक्तिसंबंध यांच्या मर्यादांपलीकडे जाऊन सार्वत्रिक बनते.

विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या साहाय्याने ही विश्वात्मक अनुभूती रसिकासाठी आस्वाद्य बनते. रसिकाच्या बाबतीतही अशीच प्रक्रिया घडते. रसास्वादाच्या वेळी रसिकाचे अधिष्ठान लौकिक सुख-दुःखाच्या पातळीवरून साधारणीकरणाच्या उच्च स्तरावर पोहोचते. त्याशिवाय कवी आणि रसिक यांच्यात हृदयसंवाद घडू शकत नाही.आस्वादाच्या क्षणी रसिकाच्या मनातील स्व-पर-तटस्थ भाव नाहीसे होतात. त्याच्या परिमित प्रमातृत्वाचा परिहार होऊन देश-काल-व्यक्तिनिरपेक्ष असे अपरिमित प्रमातृत्व निर्माण होते.या अवस्थेत रसिक काव्यगत स्थायीभावाचा आस्वाद घेतो. त्या वेळी त्याची जाणीव व्यक्तिसंबद्ध राहत नाही, तर ती सार्वत्रिक आणि अलौकिक स्वरूप धारण करते. म्हणून काव्याचा आस्वाद हा व्यक्तिगत आवडीनिवडीप्रमाणे घेतला जाणारा लौकिक उपभोग नसतो.जर रति, भय, क्रोध यांसारखे भाव व्यक्तिसंबद्ध स्वरूपातच रसिकाच्या जाणिवेत प्रकट झाले, तर काव्यसृष्टीचा अलौकिक अनुभव संपुष्टात येतो. यासाठीच अभिनवगुप्तांनी 'भावजागृती' हा शब्द अत्यंत जपून वापरला आहे. रसिकाची अलौकिक अवस्था सुटून त्याला लौकिक, व्यक्तिनिष्ठ भावनांचा प्रत्यय येण्याचा धोका त्यांनी ओळखला होता. म्हणूनच त्यांनी 'रसविघ्न' या संकल्पनेचा विचार मांडला.

रसास्वादात अडथळा आणणाऱ्या या विघ्नांमुळे रसिक साधारणीकरणाच्या पातळीवर पोहोचू शकत नाही. अशा प्रकारे अभिनवगुप्तांची रस-आनंद-प्रक्रिया साधारणीकरण, हृदयसंवाद, तादात्म्य आणि अलौकिक आस्वाद या तत्त्वांवर आधारलेली आहे. त्यांच्या या विवेचनामुळे रस हा केवळ पात्रांच्या भावनांचा अनुभव नसून रसिकाच्या अंतःकरणात निर्माण होणारा अलौकिक आनंद आहे, हे स्पष्ट होते. भारतीय साहित्यशास्त्रातील ही रसमीमांसा अत्यंत सूक्ष्म, सखोल आणि सर्वमान्य मानली जाते.

**रसविघ्ने**

रसास्वाद ही अत्यंत सूक्ष्म आणि अनुभवप्रधान प्रक्रिया आहे. रसिकाला काव्य किंवा नाट्याचा आस्वाद निर्विघ्नपणे घेता आला पाहिजे. आस्वाद घेताना रसिकाची विशिष्ट मनःस्थिती टिकून राहणे आवश्यक असते. ही अवस्था ढळली, तर रसप्रतीतीमध्ये अडथळे निर्माण होतात. अशा अडथळ्यांना अभिनवगुप्त यांनी 'रसविघ्ने' असे म्हटले आहे. रसामध्ये निर्विघ्न रसनात्मक प्रतीती होण्यास अडथळा आणणारी कविगत, काव्यगत, नटगत किंवा रसिकगत कोणतीही गोष्ट म्हणजे रसविघ्न होय. अभिनवगुप्तांनी रसविघ्नांचे सात प्रकार सांगितले आहेत.

**(१) संभावना विरह**

संभावना विरह म्हणजे कल्पनाशक्तीचा अभाव होय. ज्याला काव्यवस्तू किंवा नाट्यवस्तूची योग्य कल्पना करता येत नाही, त्याला रसास्वाद होऊ शकत नाही. साहित्यकृतीचा हृदयंगम अनुभव घेण्यासाठी रसिकाकडे कल्पकता आणि संवेदनशीलता असणे आवश्यक असते.

**(२) स्वपरगत देशकालविशेषावेश**

हे रसिकगत विघ्न आहे. रसिक जर काव्य किंवा नाटकातील प्रसंग स्वतःच्या वैयक्तिक सुख-दुःखाशी जोडून पाहू लागला, तर तो साधारणीकरणाच्या अवस्थेत पोहोचू शकत नाही. त्यामुळे तो तटस्थ रसिक न राहता वैयक्तिक पातळीवर विचार करू लागतो आणि रसास्वादात अडथळा निर्माण होतो.

**(३) निजसुखादिविवशीभाव**

रसिक जर स्वतःच्या वैयक्तिक चिंता, दुःख किंवा मानसिक व्यग्रतेमध्ये गुरफटलेला असेल, तर त्याला साहित्याचा योग्य आस्वाद घेता येत नाही. त्याचे मन सतत इतर विचारांकडे वळत राहिल्यामुळे रसप्रतीती घडत नाही.

**(४) प्रतीत्युपायवैकल्य**

विभाव, अनुभाव आणि संचारी भाव हे रसप्रतीतीचे प्रमुख साधन आहेत. यांची योग्य सांगड न घातल्यास रसाची निर्मिती होत नाही. हा दोष मुख्यतः कवी किंवा लेखकाचा मानला जातो. साहित्यकृतीची मांडणी प्रभावी नसल्यास रसिकाला अपेक्षित रसास्वाद मिळत नाही.

**(५) स्फुटत्वभाव**

विभाव आणि अनुभाव यांची प्रतीती स्पष्ट आणि ठळक असणे आवश्यक असते. ती अस्पष्ट राहिल्यास रसिकाला अपेक्षित भाव समजत नाहीत आणि रसप्रतीती होत नाही. हा दोष कधी कविगत तर कधी नटगत असू शकतो.

**(६) अप्रधानता**

काव्य किंवा नाट्यातील मुख्य आशय बाजूला पडून गौण बाबींवर अधिक भर दिल्यास रसास्वाद बाधित होतो. त्यामुळे रसिकाचे लक्ष प्रधान स्थायिभावापासून विचलित होते आणि अपेक्षित रसनिष्पत्ती घडत नाही.

**(७) संशययोग**

विभाव, अनुभाव आणि संचारी भाव यांची मांडणी अशी असावी की कोणता स्थायिभाव अभिव्यक्त होत आहे हे स्पष्टपणे जाणवावे. जर त्याबाबत संभ्रम निर्माण झाला, तर रसप्रतीती होत नाही. उदाहरणार्थ, अश्रू हे शोकाचेही द्योतक असू शकतात आणि आनंदाचेही; योग्य संदर्भ नसल्यास रसिक संभ्रमित होतो.

एकंदरीत, रसिकाला निर्विघ्नपणे रसप्रतीती अनुभवता यावी यासाठी ही सातही रसविघ्ने दूर असणे आवश्यक आहे. रसास्वाद ही साधारणीकरणावर आधारित प्रक्रिया असल्याने रसिक, कवी आणि नट या तिघांच्याही पातळीवर आवश्यक सुसंगती असणे गरजेचे आहे. तेव्हाच खऱ्या अर्थाने रसनिष्पत्ती घडते.

**पुनःप्रत्ययाचा आनंद**

ना. सी. फडके यांनी काव्यानंदाच्या संदर्भात 'पुनःप्रत्यय' ही महत्त्वपूर्ण उपपत्ती मांडली आहे. पुनःप्रत्यय म्हणजे पूर्वी अनुभवलेला अनुभव पुन्हा एकदा जाणवणे होय. साहित्यकृतीचा आस्वाद घेताना रसिकाच्या मनात जागृत होणाऱ्या भावना आणि अनुभव अनेकदा अशा पुनःप्रत्ययाचे स्वरूप धारण करतात.प्रा. फडके यांच्या मते, मनुष्याला आपल्या आयुष्यातील काही सुखद, आनंददायी आणि हवेहवेसे वाटणारे अनुभव पुन्हा अनुभवण्याची नैसर्गिक इच्छा असते. परंतु वास्तव जीवनात ते अनुभव पूर्ववत प्राप्त होणे शक्य नसते. अशा वेळी ललित साहित्य रसिकाला कल्पनाविश्वाच्या माध्यमातून ते अनुभव पुन्हा जगण्याची संधी देते.

साहित्यकृतीतील प्रसंग, व्यक्तिरेखा आणि वातावरण यांच्या साहाय्याने रसिकाच्या मनात पूर्वानुभव जागृत होतात आणि त्यातून त्याला विशेष आनंद प्राप्त होतो. उदाहरणार्थ, व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'शाळा' या कथेचा आस्वाद घेताना अनेक वाचकांच्या स्वतःच्या शालेय जीवनातील आठवणी जागृत होतात. त्या आठवणींच्या पुनःअनुभवातून त्यांना आनंद मिळतो. तथापि, या उपपत्तीला काही मर्यादाही आहेत. साहित्यातील सर्व अनुभव रसिकांना पुनःप्रत्यय देतातच असे नाही. अनेकदा साहित्यकृती रसिकाला पूर्णपणे नवीन अनुभवही देतात. उदाहरणार्थ, 'एकच प्याला' मधील सुधाकर आणि सिंधू यांच्या जीवनानुभवांचा प्रत्यय सर्व रसिकांना पूर्वानुभवाच्या स्वरूपात येईलच असे नाही. तरीही त्या साहित्यकृतीचा आस्वाद घेताना रसिकाला आनंद मिळतो.

याशिवाय, पुनःप्रत्ययात केवळ सुखद अनुभवच येतात असे नाही; काही वेळा दुःखद अनुभवही पुन्हा जागृत होऊ शकतात. तथापि, अशा अनुभवांतूनही रसिकाला काव्यानंद प्राप्त होतो. प्रत्येक व्यक्तीचे अनुभवविश्व, संवेदनाक्षमता आणि आस्वादक्षमता भिन्न असल्यामुळे प्रत्येक रसिकाला पुनःप्रत्ययाचा अनुभव सारखाच येईल असे म्हणता येत नाही.

**२.४ करुणरसानंद**

करुण रसप्रधान साहित्याच्या आस्वादातून रसिकाला जो आनंद प्राप्त होतो, त्याचे स्वरूप समजून घेतल्याशिवाय काव्यानंदमीमांसा पूर्ण होत नाही. पौर्वात्य साहित्यशास्त्रज्ञांनी करुणरसाच्या संदर्भात स्वतंत्र विचार मांडले आहेत.भरतमुनींच्या रससूत्रानुसार 'रसनिष्पत्ती' म्हणजेच काव्यानंदाची अनुभूती होय. रसिकाच्या मनात काही उपजत भावना असतात. जीवनातील अनुभवांमुळे या भावनांवर विविध संस्कार होत असतात. काव्य किंवा नाटकामध्ये जेव्हा अशा भावनांचे प्रभावी चित्रण केले जाते, तेव्हा त्या रसिकाच्या अंतर्मनातील भावनांना आवाहन करतात. परिणामी त्या भावना जागृत होतात आणि मनात जी विशेष अवस्था निर्माण होते, तिलाच 'रस' असे म्हणतात. म्हणजेच रस हा नव्याने निर्माण होत नाही; तो आधीपासून असलेल्या भावनांची अभिव्यक्ती असते.

अभिनवगुप्तांच्या मते, काव्य किंवा नाट्यातील भाव प्रारंभी विशिष्ट व्यक्तींशी संबंधित असले तरी कवीच्या प्रतिभेमुळे त्यांचे साधारणीकरण होते. उदाहरणार्थ, राम–सीता किंवा कच–देवयानी ही पात्रे विशिष्ट न राहता सर्वसामान्य स्त्री–पुरुषांचे प्रतीक बनतात. त्यांच्या माध्यमातून व्यक्त होणारे शोक, भय, प्रेम किंवा करुणा हे वैयक्तिक न राहता सार्वत्रिक बनतात. त्यामुळे रसिक त्या भावनांचा आस्वाद व्यक्तिगत पातळीवर न घेता साधारणीकरणाच्या पातळीवर घेतो.

करुणरसाच्या बाबतीतही हीच प्रक्रिया लागू होते. करुणरसप्रधान साहित्याचा आस्वाद घेताना रसिकाला प्रत्यक्ष दुःखाचा अनुभव येत नाही; तर त्या दुःखाचे कलात्मक रूप अनुभवास येते. म्हणूनच करुणरसातून आनंद कसा मिळतो हा प्रश्न अभिनवगुप्तांच्या विचारसरणीनुसार गौण ठरतो. कारण काव्यातील शोक, भय किंवा करुणा या लौकिक भावना राहात नाहीत; त्या अलौकिक, आस्वाद्य आणि कलात्मक रूप धारण करतात.रसिकाची मनःस्थिती या वेळी अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असते. तो न तटस्थ असतो, न वैयक्तिकरीत्या गुंतलेला असतो; तर साधारणीकरणाच्या भूमिकेतून भावांचा अनुभव घेत असतो. त्यामुळे करुणरसात्मक काव्य–नाटकांतील दुःखद प्रसंगही त्याला क्लेशदायक वाटत नाहीत; उलट त्यातून त्याला मानसिक समधातता आणि विश्रांती लाभते. अभिनवगुप्तांनी यालाच 'विश्रांतिकारिणी चित्तवृत्ती' असे म्हटले आहे.

याच कारणामुळे हॅम्लेट, किंग लियर, उत्तररामचरित किंवा एकच प्याला यांसारख्या करुणरसप्रधान कलाकृती रसिकांना पुन्हा पुन्हा अनुभवाव्याशा वाटतात. जर त्या केवळ दुःखद अनुभूती देणाऱ्या असत्या, तर रसिक त्यांच्याकडे आकर्षित झाला नसता.

काही विचारवंतांनी करुणरसातील आनंदाचे स्पष्टीकरण कवीच्या कौशल्यात किंवा नटाच्या अभिनयात शोधण्याचा प्रयत्न केला आहे. हे घटक महत्त्वाचे असले तरी गौण आहेत. करुणरसाचा खरा उलगडा भावनांच्या साधारणीकरणात आहे. प्रारंभी भय, शोक किंवा करुणा जागृत होते; परंतु हळूहळू त्या भावनांचे व्यवस्थीकरण होऊन त्यांचे क्लेशदायक स्वरूप नाहीसे होते आणि त्याजागी आस्वाद्य, समतोल व विश्रांत मनोवस्था निर्माण होते.

### सारांश

करुणरसातून मिळणारा आनंद हा दुःखाच्या प्रत्यक्ष अनुभवातून मिळणारा आनंद नसून त्या दुःखाच्या कलात्मक रूपाच्या आस्वादातून मिळणारा अलौकिक अनुभव आहे. भावनांचे साधारणीकरण आणि रसिकाच्या चित्तवृत्तीतील समधातता यांमुळे करुणरसही इतर रसांप्रमाणेच आनंददायी ठरतो. हाच करुणरसानंदाचा मूलभूत अर्थ आहे.

### केवलानंदवाद

संस्कृत काव्यशास्त्रातील विश्वनाथ हे केवलानंदवादाचे प्रमुख पुरस्कर्ते होते. करुण रसात्मक काव्याच्या आस्वादातून रसिकाला अत्यंत सुख किंवा आनंद प्राप्त होतो, हे पटवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला.विश्वनाथांच्या मते, करुण रसातही केवल आनंद प्राप्त होतो; परंतु हा अनुभव केवळ सहृदय रसिकालाच येतो. ज्याला करुण रसातून आनंदाची अनुभूती येत नाही, तो खऱ्या अर्थाने रसिक नाही.त्यांच्या मते, कोणताही सहृदय रसिक स्वतःला दुःख व्हावे म्हणून शोकात्म नाटक पाहण्यास जात नाही. तरीही अनेक रसिक अशा काव्य–नाटकांचा आस्वाद घेतात. यावरून त्यांना त्या साहित्यकृतींतून आनंदच प्राप्त होत असावा, हे स्पष्ट होते.

व्यवहारातील दुःखदायक घटना जेव्हा काव्यात किंवा नाटकात चित्रित केल्या जातात, तेव्हा कल्पनाव्यापारामुळे त्यांना अलौकिक स्वरूप प्राप्त होते. त्यामुळे त्या घटना प्रत्यक्ष दुःखद न राहता आस्वाद्य ठरतात. करुण रसाच्या प्रसंगांचा आस्वाद घेताना रसिकांच्या डोळ्यांत अनेकदा अश्रू येतात. विश्वनाथांच्या मते, हा अश्रुपात दुःखामुळे नसून आनंदामुळे होतो.त्यांच्या मते, करुण रसाचा अनुभव घेताना रसिकाला वरकरणी दुःख जाणवत असले तरी अंतर्मनात त्याला उत्कट आनंदाचीच अनुभूती येत असते. हीच त्यांची केवलानंदवादाची भूमिका आहे.

**केवलानंदवादाच्या मर्यादा**

विश्वनाथांचा केवलानंदवाद प्रभावी असला तरी काही अभ्यासकांना तो पूर्णतः पटत नाही. त्यांच्या मते, करुण रसाचा अनुभव हा प्रत्यक्ष दुःखदायक असतो. उदाहरणार्थ, रामायणातील रामाने केलेला सीतेचा त्याग, तसेच मराठीतील एकच प्याला, नटसम्राट, स्वामी, पानिपत यांसारख्या शोकात्म साहित्यकृतींचा आस्वाद घेताना रसिकांचे अंतःकरण हेलावून जाते. अशा वेळी येणारे अश्रू हे सुखाचे नसून दुःखाचे वाटतात.

आचार्य जगन्नाथ यांनी स्पष्टपणे सांगितले की, करुण रसाचा स्थायीभाव शोक असल्यामुळे तो सहृदयालाही दुःखदायक ठरू शकतो. त्यांनी उदाहरण देताना सांगितले की, जसे दोरीला सर्प समजल्यावर कल्पित असूनही भय वाटते, तसेच काव्यातील शोक कल्पित असला तरी तो दुःखदायक वाटू शकतो. तसेच रामचंद्र आणि गुणचंद्र यांनी करुण रसाची अनुभूती केवळ दुःखपूर्ण असल्याचे मत मांडले. तथापि, ही भूमिका एकांगी वाटते.म्हणूनच करुण रसाचा अनुभव हा पूर्णपणे सुखद किंवा पूर्णपणे दुःखद नसून अलौकिक आणि कलात्मक स्वरूपाचा असतो, असे म्हणणे अधिक योग्य ठरते.

**⁕ विरेचन (कॅथार्सिस)**

ग्रीक तत्त्वज्ञ ॲरिस्टाटल यांनी शोकांतिकेच्या संदर्भात मांडलेला प्रसिद्ध सिद्धांत म्हणजे कॅथार्सिस होय. मराठीत याचा अर्थ विरेचन, शुद्धीकरण, मोकळेपणा किंवा भावनांचा निचरा असा होतो. ॲरिस्टॉटल यांच्या मते, शोकांतिकेमुळे रसिकांच्या मनात भय आणि अनुकंपा या भावना जागृत होतात. या भावनांना योग्य प्रकारे अभिव्यक्ती मिळाल्याने त्यांचा निचरा होतो आणि मन शुद्ध, हलके व संतुलित होते. त्यामुळे रसिकाला समाधानाचा अनुभव मिळतो.

कॅथार्सिसविषयी विविध अभ्यासकांची मते पुढीलप्रमाणे आहेत,

१. **लेसिंग. –**

कॅथार्सिस म्हणजे भावनांचे शुद्धीकरण होय. शोकांतिकेच्या आस्वादामुळे भय आणि अनुकंपा या भावनांना योग्य स्थान प्राप्त होते.

२. **मिल्टन –**

शोकांतिकेमुळे मनातील भय आणि अनुकंपा या भावना व्यक्त होऊन नाहीशा होतात. त्यामुळे मन हलके होते.

३. **क्रोचे –**

मनुष्य आपल्या वैयक्तिक भावनांना व्यापक स्वरूप देतो आणि त्यातून स्वतःची मुक्तता करतो. हीच कॅथार्सिस प्रक्रिया आहे.

**४. बूचर –**

व्यवहारातील भय आणि काव्यातील भय यांत फरक असतो. काव्यातील भय कल्पनारूप असल्याने ते अलौकिक बनते व आस्वाद्य ठरते.

**५. रिचर्ड्स –**

भय आणि अनुकंपा यांच्या संतुलनातून समाधानाची अवस्था निर्माण होते.

**६. विंचेस्टर –**

शोकांतिकेतील नायकाचे धैर्य, तितिक्षा, निष्ठा आणि संघर्ष पाहून रसिकाच्या मनात आदर निर्माण होतो. हाच कॅथार्सिसचा परिणाम आहे.

**७. जॉन डेनिस –**

शोकांतिकेतून सद्गुणांचा गौरव आणि दुर्गुणांचे दमन दिसते. त्यामुळे रसिकाला नैतिक समाधान मिळते.

**८. रूसो –**

दुसऱ्यांच्या दुःखातून माणसाच्या मनातील आसुरी प्रवृत्तीला समाधान मिळते. मात्र हे मत सर्वमान्य नाही.

**९. ल्यूकस**

शोकांतिका जीवनातील कठोर सत्यांची जाणीव करून देते आणि जीवनसमज समृद्ध करते.

**१०. शोपेनहॉवर**

शोकांतिकेमुळे जीवनाचे दुःखमय स्वरूप समजते आणि त्यातून बौद्धिक समाधान प्राप्त होते.

वरील विवेचनावरून असे म्हणता येईल की, करुणरसाच्या आस्वादातून मिळणाऱ्या आनंदाचे स्पष्टीकरण करण्यासाठी केवलानंदवाद आणि कॅथार्सिस हे दोन्ही सिद्धांत महत्त्वाचे आहेत. केवलानंदवाद करुण रसातील अलौकिक आनंदावर भर देतो, तर कॅथार्सिस भावनांच्या शुद्धीकरणावर भर देतो. या दोन्ही सिद्धांतांवरून करुणरसात्मक साहित्याचा अनुभव हा केवळ दुःखद नसून मानसिक, बौद्धिक आणि कलात्मक आनंद देणारा उच्च प्रतीचा अनुभव आहे, हे स्पष्ट होते.

**२.४ समारोप**

रसविचार आणि काव्यानंद या भारतीय साहित्यशास्त्रातील अत्यंत महत्त्वाच्या संकल्पना आहेत. भरतमुनींनी मांडलेल्या रससिद्धांतामुळे साहित्याच्या आस्वादप्रक्रियेला सैद्धांतिक अधिष्ठान प्राप्त झाले. स्थायीभाव, विभाव, अनुभाव, संचारी भाव आणि सात्त्विक भाव यांच्या संयोगातून रसाची निर्मिती होते आणि रसिकाला अलौकिक आनंदाची अनुभूती प्राप्त होते.

अभिनवगुप्तांनी साधारणीकरणाच्या सिद्धांताद्वारे रसास्वादाची प्रक्रिया अधिक स्पष्ट केली. त्यांच्या मते, काव्याचा आस्वाद घेताना रसिक आपल्या वैयक्तिक अनुभवांच्या पलीकडे जाऊन सार्वत्रिक अनुभूतीच्या पातळीवर पोहोचतो. हीच अवस्था काव्यानंदाची असते.काव्यानंदाचे स्वरूप समजावून सांगण्यासाठी विविध विचारवंतांनी अनेक उपपत्ती मांडल्या आहेत. हर्बर्ट स्पेन्सर यांनी क्रीडानंदाची उपपत्ती मांडून साहित्यनिर्मितीतील

अतिरिक्त ऊर्जेच्या विनियोगावर भर दिला. निर्मितीचा आनंद, आत्माविष्कार, पुनःप्रत्ययाचा आनंद, केवलानंदवाद आणि कॅथार्सिस यांसारख्या संकल्पनांमधून काव्यानंदाचे विविध पैलू स्पष्ट होतात.

करुणरसाच्या संदर्भात विश्वनाथांचा केवलानंदवाद आणि ॲरिस्टॉटल यांचा कॅथार्सिस सिद्धांत विशेष महत्त्वाचे ठरतात. या सर्व चर्चेतून हे स्पष्ट होते की, काव्यानंद हा लौकिक आनंदापेक्षा वेगळा, सूक्ष्म, अलौकिक आणि उच्च प्रतीचा अनुभव आहे. साहित्याचा आस्वाद हा केवळ मनोरंजनासाठी नसून तो मानवी मनाच्या संवेदनशीलतेला पुरस्कृत करणारा अनुभव आहे.

## २.५ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

| | | |
|---|---|---|
| रस | : | काव्याच्या आस्वादातून प्राप्त होणारा अलौकिक आनंद |
| स्थायीभाव | : | मनातील मूलभूत व कायमस्वरूपी भावना |
| विभाव | : | रस उत्पन्न होण्यासाठी कारणीभूत घटक |
| अनुभाव | : | भावनांचे बाह्य प्रकटीकरण |
| संचारी भाव | : | क्षणिक स्वरूपाच्या भावना |
| सात्त्विक भाव | : | तीव्र भावनांमुळे होणारे शारीरिक विकार |
| साधारणीकरण | : | व्यक्तिगत भावनेचे सार्वत्रिकीकरण |
| रसास्वाद | : | काव्याचा भावपूर्ण अनुभव घेण्याची प्रक्रिया |
| काव्यानंद | : | साहित्याच्या आस्वादातून मिळणारा आनंद |
| रसविघ्न | : | रसास्वादात अडथळा आणणारे घटक |
| केवलानंदवाद | : | करुण रसातूनही आनंद मिळतो ही संकल्पना |
| कॅथार्सिस | : | भावनांचे शुद्धीकरण किंवा विरेचन |
| पुनःप्रत्यय | : | पूर्वानुभवाची पुन्हा येणारी अनुभूती |
| आत्माविष्कार | : | साहित्याद्वारे व्यक्तिमत्त्वाचे प्रकटीकरण |
| निर्मितीचा आनंद | : | साहित्यनिर्मितीतून मिळणारा समाधानकारक आनंद |

## लेखक/ संशोधक/साहित्यिक परिचय

### १. भरतमुनी

भारतीय नाट्यशास्त्राचे आद्य प्रवर्तक म्हणून भरतमुनी यांना मानले जाते. त्यांनी ‘नाट्यशास्त्र’ या ग्रंथामध्ये रससिद्धांत मांडला. स्थायीभाव, विभाव, अनुभाव आणि संचारी भाव यांच्या साहाय्याने रसाची निर्मिती होते, असे त्यांनी स्पष्ट केले. भारतीय साहित्यशास्त्रातील रसविचाराचा पाया त्यांच्या सिद्धांतावर उभा आहे.

**२. अभिनवगुप्त**

अभिनवगुप्त हे भारतीय साहित्यशास्त्रातील महत्त्वाचे आचार्य होते. त्यांनी भरतमुनींच्या रससिद्धांताचे सखोल विवेचन केले. साधारणीकरण आणि रसास्वाद या संकल्पना त्यांनी अधिक स्पष्ट केल्या. रस हा रसिकाच्या अंतःकरणात निर्माण होणारा अलौकिक आनंद आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

**३. विश्वनाथ**

विश्वनाथ हे संस्कृत काव्यशास्त्रातील महत्त्वाचे आचार्य होते. त्यांनी 'साहित्यदर्पण' हा ग्रंथ लिहिला. करुण रसातूनही आनंदच प्राप्त होतो, हा केवलानंदवाद त्यांनी मांडला. त्यांच्या मतानुसार खरा सहृदय रसिक करुण रसाचाही आनंद घेतो.

**४. आचार्य जगन्नाथ**

आचार्य जगन्नाथ हे संस्कृत काव्यशास्त्रातील प्रसिद्ध विद्वान होते. त्यांनी 'रसगंगाधर' हा ग्रंथ लिहिला. करुण रसाचा स्थायीभाव शोक असल्यामुळे तो काही प्रमाणात दुःखदायकही ठरू शकतो, असे त्यांनी सांगितले.

**५. ना. सी. फडके**

ना. सी. फडके हे प्रसिद्ध मराठी साहित्यिक, कादंबरीकार आणि समीक्षक होते. त्यांनी पुनःप्रत्ययाचा आनंद ही उपपत्ती मांडली. साहित्यकृती वाचताना पूर्वानुभव पुन्हा जागृत होऊन रसिकाला आनंद मिळतो, असे त्यांचे मत होते.

**६. रा. श्री. जोग**

रा. श्री. जोग हे मराठीतील महत्त्वाचे साहित्यसमीक्षक होते. त्यांनी 'अभिनव काव्यप्रकाश' या ग्रंथातून काव्य, रस आणि ज्ञानानंद यांचे सखोल विवेचन केले. काव्यातील जिज्ञासातृप्ती आणि बौद्धिक आनंद यांवर त्यांनी विशेष भर दिला.

## २.६ स्वयंमध्यनासाठी प्रश्न

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१. 'रसनिष्पत्ती'चा अर्थ अभिनवगुप्तांनी कोणता मानला आहे?

अ) निर्माण. ब) अभिव्यक्ती.

क) अनुकरण. ड) कल्पना

२. 'क्रीडानंदाची उपपत्ती' कोणत्या विचारवंताने मांडली?

अ) विश्वनाथ. ब) ॲरिस्टॉटल.

क) हर्बर्ट स्पेन्सर. ड) क्रोचे

३. 'पुनःप्रत्ययाची उपपत्ती' कोणी मांडली?

अ) प्रा. ना. सी. फडके. ब) अभिनवगुप्त.

क) जगन्नाथ. ड) बूचर

४. करुणरसातही 'केवलानंद' होतो, असे कोणाचे मत आहे?

अ) भरतमुनी. ब) विश्वनाथ.

क) लेसिंग. ड) रूसो

५. रसास्वादातील अडथळ्यांना काय म्हणतात?

अ) रसदोष. ब) रसविघ्ने.

क) रससूत्र. ड) रसप्रवाह

६. अभिनवगुप्तांच्या मते रसप्रक्रियेचे मर्म कशात आहे?

अ) अलंकार. ब) साधारणीकरण.

क) कथानक. ड) कल्पनाशक्ती

७. 'कॅथार्सिस' या सिद्धांताचा संबंध कोणाशी आहे?

अ) विश्वनाथ. ब) अभिनवगुप्त.

क) ॲरिस्टॉटल. ड) स्पेन्सर

८. रसिकाच्या आनंदाचा प्रमुख भाग कोणता मानला जातो?

अ) शारीरिक आनंद. ब) आर्थिक आनंद.

क) भावनिक आनंद. ड) लौकिक आनंद

९. रसिकाच्या कल्पनाशक्तीच्या अभावामुळे निर्माण होणारे रसविघ्न कोणते?

अ) संभावना विरह. ब) संशययोग.

क) अप्रधानता. ड) स्फुटत्वभाव

१०. कवीला साहित्यनिर्मितीत मिळणारा आनंद मुख्यतः कशामुळे मिळतो?

अ) पैशामुळे. ब) प्रसिद्धीमुळे.

क) नवनिर्मिती व आत्माविष्कारामुळे. ड) स्पर्धेमुळे

**उत्तरे :**

१- ब) अभिव्यक्ती २-क) हर्बर्ट स्पेन्सर ३-अ) प्रा. ना. सी. फडके ४-ब) विश्वनाथ

५- ब) रसविघ्ने ६- ब) साधारणीकरण ७- क) ॲरिस्टॉटल. ८-क) भावनिक आनंद

९- अ) संभावना विरह. १०- क) नवनिर्मिती व आत्माविष्कारामुळे

## २.७ सरावासाठी प्रश्न

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. रससिद्धांताची संकल्पना स्पष्ट करून स्थायीभाव, संचारी भाव आणि सात्त्विक भाव यांचे स्वरूप स्पष्ट करा.

२. अभिनवगुप्तांच्या साधारणीकरण सिद्धांताच्या आधारे रस-आनंद-प्रक्रिया स्पष्ट करा.

३. काव्यानंदाच्या विविध उपपत्तींचे विवेचन करा.

४. केवलानंदवाद आणि कॅथार्सिस या सिद्धांतांची तुलना करा.

५. करुणरसानंदाची संकल्पना स्पष्ट करून त्यावरील विविध विचारवंतांची मते स्पष्ट करा.

### ब) लघुत्तरी प्रश्न

१. स्थायीभाव म्हणजे काय?

२. रसविघ्ने कोणती?

३. साधारणीकरण म्हणजे काय?

४. पुनःप्रत्ययाची संकल्पना स्पष्ट करा.

५. काव्यानंदाचे स्वरूप काय आहे?

## २.८ क्षेत्रीय कार्य :

१. एखाद्या मराठी नाटकाचा किंवा चित्रपटाचा आस्वाद घेऊन त्यातील प्रमुख रस ओळखा व त्याचे विश्लेषण करा.

२. करुण रसप्रधान मराठी साहित्यकृतींची उदाहरणे संकलित करा व त्यातील काव्यानंद स्पष्ट करा.

## २.९ संदर्भ ग्रंथ :


१. गाडगीळ, स. रा : काव्यशास्त्रप्रदीप , व्हीनस प्रकाशन, पुणे, १९७१

२. गोविलकर, लीला : भारतीय साहित्यविचार, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, २००३

३. जोग, रा. श्री : अभिनव काव्यप्रकाश, पॉप्युलर प्रकाशन, पुणे, १९०१

४. देशपांडे, ग. त्र्यं : भारतीय साहित्यशास्त्र, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २०२०

५. पाटणकर, रा. भा : कांटची सौंदर्यामीमांसा, मौज प्रकाशन गृह, मुंबई, १९७७

६. पुंडे, दत्तात्रय व तावरे, स्नेहल (संपा.): साहित्यविचार, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे, १९९५


❑❑❑